सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर
सोमवार, २८ एप्रिल २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १७० । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



www.tarunbharat.net
तरुण भारत




## महत्त्वाचे

### भारतीय महिला क्रिकेटपटूंकडून हल्ल्यातील बळींना आदरांजली

**कोलंबो** : पहलगाम येथे अलिकडेच झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील बळींना आदरांजली म्हणून रविवारी श्रीलंकेविरुद्धच्या तिरंगी



मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाच्या खेळाडूंनी काळ्या हातावर पट्ट्या बांधल्या. काश्मीर खोऱ्यातील लोकप्रिय ठिकाण असलेल्या बैसरन कुरणात मंगळवारी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात किमान २६ जणांचा मृत्यू झाला, यात बहुतेक पर्यटक होते. पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या लष्कर-ए-तैयबा (एलईटी) दहशतवादी गटाचा एक गट असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या हल्ल्याचा जगभरातून तीव्र निषेध करण्यात आला आहे. या स्पर्धेत सहभागी होणारा दक्षिण आफ्रिका हा तिसरा संघ आहे. पावसामुळे तीन तास उशिर झाल्यामुळे भारताने ३९ षटकांचा सामना कमी करून प्रथम गोलंदाजी केली आहे.

### ख्रिस युबँक ज्युनियर विजयानंतर रुग्णालयात



**लंडन** : लंडनच्या टोटेनहॅम हॉटस्पर स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या रोमांचक मिडलवेट ग्रुज मुष्टियुद्ध लढतीत ब्रिटनच्या ख्रिस युबँक ज्युनियरने सहकारी कोनोर बेनला एकमताने गुणांच्या निर्णयावर पराभूत केले, मात्र या लढतीनंतर ख्रिस युबँक ज्युनियरला सावधगिरीच्या तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले.६५ हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत खेळल्या गेलेल्या १२ फेऱ्यांच्या धमाकेदार लढतीत तिन्ही पंचांनी न्यायाधीशांनी ख्रिस युबँक ज्युनियरला ११६-११२ अशा गुणांनी विजयी घोषित केले. विजेत्याला लढतीस्थळी उपस्थित डॉक्टरांच्या शिफारशीनुसार रुग्णवाहिकेने रुग्णालयात नेण्यात आले आहे, असे युबँकच्या प्रमोटरने सांगितले.

### आणखी एका सलामीच्या सामन्यात जोकोविचचा पराभव

**माद्रिद** : येथे प्रारंभ झालेल्या माद्रिद ओपन टेनिस स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविचला मॅतिओ अर्नाल्डीकडून सरळ सेटमध्ये ६-३, ६-४ असा पराभव पत्करावा लागला. जोकोविचला सलग दुसऱ्या सलामीच्या सामन्यात व एकूण तीन सलग सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. मी आपल्या दोन दशकांच्या व्यावसायिक टेनिस कारकिर्दीत नवीन वास्तवचा सामना करत आहे, असे ३७ वर्षीय जोकोविच या पराभवानंतर म्हणाला. २४ ग्रॅण्ड स्लॅम विजेत्या जोकोविचला पुढील महिन्यात होणाऱ्या फ्रेंच ओप स्पर्धेपूर्वी संघर्ष करावा लागत असून त्याला कारकिर्दीतील १०० वे जेतेपद पटकावण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. जोकोविच माझा आदर्श आहे, तो नेहमीच राहील, असे अर्नाल्डीने जोकोविचबद्दल सांगितले. अर्नाल्डीचा पुढील सामना दामिर इझुमहूरशी होईल. दामिरने सेबास्टियन बेझचा १-६, ६-१, ६-२ असा पराभव केला. सहाव्या मानांकित ॲलेक्स डी मिनौरने लोरेन्झो सोनेगोचा ६-२, ६-३ असा पराभव केला आणि कॅनेडियन खेळाडूने केई निशिकोरीचा ६-१, ६-४ असा पराभव केल्यानंतर डेनिस शापोवालोव्हशी खेळेल.

### क्रिस्टल पॅलेस तिसऱ्यांदा एफए चषकाच्या अंतिम फेरीत

**लंडन** : वेम्बली स्टेडियमवर क्रिस्टल पॅलेसने ॲस्टन व्हिलाचा ३-० असा पराभव करून एफए चषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. क्रिस्टल पॅलेसची अंतिम फेरी गाठण्याची ही तिसरी वेळ असून त्यांना एफए चषक जिंकण्याची आणखी एक संधी मिळाली आहे. क्रिस्टल पॅलेसला अंतिम फेरीत मॅन्चेस्टर युनायटेडशी सामना करावा लागणार आहे. पॅलेसने १७ मे रोजी इंग्लिश फुटबॉलच्या घरच्या मैदानावर होणाऱ्या जेतेपदाच्या सामन्यात प्रवेश केला. १९९० आणि २०१६ नंतर दक्षिण लंडन क्लबचा अंतिम सामन्यात तिसरा सहभाग असेल. दोन्ही वेळा पॅलेसला मॅन्चेस्टर युनायटेडकडून पराभव पत्करावा लागला. ईस्माइला सानेने उत्तरार्धात नोंदविलेल्या दोन गोलच्या बळावर क्रिस्टल पॅलेसने ॲस्टन व्हिलावर मात केली. एबेरेची एझेने ३१ व्या मिनिटाला मैदानाच्या काठावरून फटका मारून पहिला गोल केला. साने ५८ व्या आणि पुन्हा स्टॉपेज वेळेच्या चौथ्या मिनिटाला गोल केला.

# मुंबई इंडियन्सचा सलग पाचवा विजय

### अष्टपैलू विल जॅक्स सामनावीर

**मुंबई, २७ एप्रिल**

रियान रेक्लेटन (५८) व सूर्यकुमार यादवची (५४) दमदार अर्धशतके आणि जसप्रीत बुमराह (२२ धावांत ४ बळी), ट्रेंट बोल्ट (२० धावांत ३ बळी व विल जॅक्सच्या (१८ धावांत २ बळी) प्रभावी गोलंदाजीच्या बळावर मुंबई इंडियन्सने रविवारी आयपील सामन्यात लखनौ सुपर जायण्ट्सवर ५४ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. २१ चेंडूंत २९ धावा व १८ धावांत २ बळी टिपणारा अष्टपैलू विल जॅक्स सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

मुंबई इंडियन्सचा हा सलग पाचवा व एकूण सहावा विजय ठरला. या विजयाबरोबरच मुंबईने १२ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप मारली आहे. गुजरात टायटन्स (१२ गुण) अव्वल स्थानावर, तर दिल्ली कॅपिटल्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे प्रत्येकी १२ गुण असून सरस धावगतीच्या आधारे ते तिसऱ्या व चौथ्या स्थानावर आहे.

**मयंक यादव प्रथमच खेळला**

दुसऱ्या डावात खेळपट्टी चांगली होईल या आशेने लखनौ सुपर जायण्ट्सचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून मुंबई इंडियन्सला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले. पाठीच्या दुखापतीमुळे आयपीएल हंगामाचा पहिला भाग गमावल्यानंतर लखनौचा मयंक यादव पहिल्यांदाच खेळण्यास सज्ज झाला आहे. त्याने गत तीन सामन्यांमध्ये एक बळी टिपणाऱ्या शार्दुल ठाकूरची जागा घेतली.



रियान रिक्लेटनची दमदार अर्धशतकी खेळी

रियान रिक्लेटन व रोहित शर्माने (१२) पहिल्या गड्यासाठी ३३ धावांची भागीदारी करून मुंबई इंडियन्सच्या डावाची चांगली सुरुवात केली. पुढे रिक्लेटनसह विल जॅक्स (२९) व सूर्यकुमार यादवने संघ मित्रांच्या साथीने छोट्या-छोट्या भागीदारी करत मुंबईच्या धावसंख्येला आकार दिला. यादरम्यान रिक्टेलन व सूर्यकुमारने आपले अर्धशतक साजरे केले. रिक्लेटनने ३२ चेंडूंत ६ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ५८ धावांची खेळी केली, तर सूर्यकुमारने लौकीकास साजेशी फलंदाजी करत अवघ्या २८ चेंडूंत ५४ धावांची खेळी केली, यात त्याने प्रत्येकी ४ चौकार व षट्कार हाणलेत. जॅक्सने २१ चेंडूंत २९ धावांची भर घातली. नमन धर व कॉर्बिन बॉशने खंबीरपणे खेळत मुंबई इंडियन्सला ७ बाद २१५ धावांचा टप्पा गाठून दिला. नमन धरने ११ चेंडूंत २ चौकार व २ षट्कारांसह नाबाद २३ धावांची खेळी केली, तर कार्बिनने १० चेंडूंत २० धावांची भर घातली. लखनौकडून मयंक यादव व आवेश खानने प्रत्येकी २ बळी, तर प्रिन्स यादव, दिग्वेश राठी व रवी बिश्नोईने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना लखनौ सुपर जायण्ट्सची सुरुवात निराशाजनक झाली. सलामीचा जोडीदार एडन मार्कराम ९ धावा काढून बाद झाला. मिचेल मार्श (३४) व निकोलस पूरनने (२७) दुसऱ्या गड्यासाठी ४२ धावांची भागीदारी केली. कर्णधार ऋषभ पंत ४ धवांवर खेळत असताना विल जॅक्सच्या गोलंदाजीला बळी पडला. पुढे आयुष बदोनी (३५) व डेव्हिड मिलरने (२४) थोडी फार झुंज देत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या, परंतु तळाच्या फळीतील फलंदाज बुमराह व बॉशच्या प्रभावी माऱ्यापुढे फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत आणि लखनौचा संपूर्ण संघ २० षटकांत १६१ धावांत बाद झाला. मुंबई कडून बुमराहने ४ बळी, बोल्टने ३ बळी, विल जॅक्सने २ बळी टिपले. (वृत्तसंस्था)

# गुजरातचे प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्याचे लक्ष्य

**जयपूर, २७ एप्रिल**

जबरदस्त फॉर्ममध्ये असलेला गुजरात टायटन्स संघ सोमवारी इंडियन प्रीमियर लीगमध्ये राजस्थान रॉयल्सशी सामना करताना आपले अव्वल स्थान बळकट करून प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतील.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स आठपैकी सहा विजयांसह दहा संघांच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. आता गुजरात संघाला प्ले-ऑफमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी केवळ दोन विजयांची गरज आहे.

एक उत्तम रन मशीन म्हणून काम करणाऱ्या गुजरात टायटन्स संघाला या हंगामात केवळ दोनदा पराभवाचा सामना करावा लागला आहे. यात साई सुदर्शन व प्रसिध कृष्णा अनुक्रमे ऑरेंज आणि पर्पल कॅपच्या शर्यतीत आघाडीवर आहेत.

गुजरातच्या फलंदाजी वर्चस्वाच्या केंद्रस्थानी गिल, सुदर्शन व जोस बटलर हे त्रिकूट आहेत. एकत्रितपणे, त्यांनी केवळ ३०० पेक्षा जास्त धावा केल्या नाहीत, तर १५० पेक्षा जास्त प्रभावी स्ट्राईक रेट तसेच सातत्य आणि आक्रमक हेतू देखील राखला आहे.

हंगामाच्या सुरुवातीला वैयक्तिक कारणांमुळे मायदेशी परतलेल्या कॅगिसो रबाडाला

शुभमन गिल रियान पराग

गमावल्यानंतरही गुजरात टायटन्सची गोलंदाजी त्यांची प्रमुख ताकद झाली.

दुखापतींमुळे अनेक वेळा संघाबाहेर राहिल्यानंतर पुनरागमन केलेला प्रसिध कृष्णा लक्षवेधक कामगिरी करत आहे, त्याने आठ सामन्यात १४.१२ च्या सरासरीने १६ बळी घेतले. फलंदाजांना बाद करण्याची क्षमता ही त्याच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

मोहम्मद सिराजनेही चेंडू प्रभावीपणे झळकावला आहे, त्याने आतापर्यंत १२ बळी घेतले असून तो सर्वाधिक बळी टिपणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत संयुक्तपणे पाचव्या स्थानावर आहे.

डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोर सुद्धा या हंगामात अव्वल पाच बळी टिपणाऱ्या गोलंदाजांमध्ये सहभागी झाला आहे, त्याने ८.२२ च्या इकॉनॉमीने १२ बळी घेतले आहेत. याशिवाय गुजरात टायटन्सची संघाची संघरचना चांगली आहे. त्यांनी परिस्थितीनुसार आपले प्रभावी खेळाडू - ईशांत शर्मा, वॉशिंग्टन सुंदर किंवा कुलवंत खेजरोलिया - बदलले आहेत.

याउलट, राजस्थान रॉयल्स या आठवड्याच्या सुरुवातीला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून ११ धावांनी पराभूत झाल्यानंतर स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला. हा त्यांचा सलग पाचवा पराभव आणि नऊ सामन्यांतील सातवा पराभव होता.

ते आता गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहेत. पहिल्या आवृत्तीतील विजेत्यांना संपूर्ण हंगामात लय मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. ते गत तीन सामन्यांमध्ये विजयाच्या जवळ पोहोचले होते, परंतु शेवटच्या सामन्यांमध्ये त्यांना अपयश आले. त्यांना सुपर ओव्हरमध्ये झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून पराभवाला सामोरे जावे लागले. यशस्वी जयस्वाल, रियान पराग व नितीश राणा हे फॉर्मात आहे. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**राजस्थान रॉयल्स**
**वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# भारताची श्रीलंकेविरुद्ध विजयी सलामी

### प्रतिका रावलचे अर्धशतक

**कोलंबो, २७ एप्रिल**

स्नेह राणाची प्रभावी फिरकी गोलंदाजी आणि प्रतिका रावलच्या नाबाद अर्धशतकी खेळीच्या बळावर भारतीय महिला क्रिकेट संघाने येथे खेळल्या गेलेल्या तिरंगी मालिकेतील पहिल्या सामन्यात यजमान श्रीलंका संघावर ५६ चेंडू शिल्लक ठेवत ९ गड्यांनी शानदार विजय नोंदविला. ६२ चेंडूंत नाबाद ५० धावांची खेळी करणारी प्रतिका सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

सकाळच्या पावसामुळे या सामन्याची षटकांची मर्यादा ५० वरून ३९ षटके करण्यात आली. भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून श्रीलंकेला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. श्रीलंकेने ३८.१ षटकांत सर्वबाद १४७ धावा केल्या. भारताने २९.४ षटकांत १ बाद १४९ धावा काढून आपला पहिला विजय साकार केला.

श्रीलंकेकडून सलामीवीर हसिन परेराने सर्वाधिक ३० धावांचे योगदान दिले. कविशा दिलहारीने २५ धावांची, तर अनुष्का संजीवनीने २२ धावांची भर घातली, परंतु कर्णधार चामरा अथापथू (७) हिच्यासह उर्वरित फलंदाज भारतीय गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्या समोर खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरु शकल्या नाहीत.

भारताकडून स्नेहा राणाने ३ बळी, तर दीप्ती शर्मा व श्री चरणीने प्रत्येकी २ बळी आणि अरुंधती रेड्डीने १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना प्रतिका रावल व स्मृती मंधानाने ५४ धावांची भागीदारी करत भारताच्या विजयाचा इरादा स्पष्ट केला. ४६ चेंडूंत ४३ धावांची खेळी करणाऱ्या स्मृती मंधानाला रणवीराने आपल्याच गोलंदाजीत झेलबाद केले. नंतर प्रतिका व हर्लिन देओलने नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. प्रतिकाने ६२ चेंडूंत ७ चौकारांच्या मदतीने नाबाद ५० धावांची, तर देओलने ७१ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ४८ धावांची विजयी खेळी केली.

आता भारताचा दुसरा सामना मंगळवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. (वृत्तसंस्था)



प्रतिका रावल व हर्लिन देओलची विजयी खेळी

# या हंगामात प्रभसिमरन अधिक परिपक्वता दाखवतोय् : सुनील जोशी

**कोलकाता, २७ एप्रिल**

पंजाब किंग्जचा सलामीवीर प्रभसिमरन सिंग या आयपीएल हंगामात 'अधिक परिपक्वता' दाखवत असून तो संघ व्यवस्थापनाने त्याच्यावर दाखवलेल्या विश्वासाची परतफेड करत आहे, असा विश्वास त्यांचे फिरकी गोलंदाजी प्रशिक्षक सुनील जोशी यांनी व्यक्त केला.

शनिवारी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध पंजाब किंग्जने ४ बाद २०१ धावांपर्यंत मजल मारली. सावध सुरुवात करून पंजाबचा अनुभवी फलंदाज प्रभसिमरन सिंगने ४९ चेंडूत सर्वाधिक ८३ धावांचे योगदान दिले. एका वेळी ३२ चेंडूत ३४ धावा करणाऱ्या प्रभसिमरनने त्याच्या पुढील १७ चेंडूत ४९ धावा काढत शानदार गती वाढवली.

आयपीएल हंगाम प्रारंभ होण्यापूर्वी प्रभसिमरन आपल्या फलंदाजीवर किती मेहनत घेतो, हे खूप महत्त्वाचे आहे. अर्थात त्याला मुख्य प्रशिक्षक रिकी पॉण्टिंग व फलंदाजी प्रशिक्षकांसह सकारात्मक वातावरण लाभले, असेही जोशी म्हणाले. २०१९ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पणापासून संघाचा भाग असलेला प्रभसिमरन हा मेगा लिलावापूर्वी पंजाब किंग्जच्या राखीव खेळाडूंमध्ये होता.



प्रभसिमरन सिंग

तो टी-२० क्रिकेट मध्ये सातत्याने कामगिरी करत आहे. गत वर्षीही त्याने सातत्य दाखवले आहे, हे त्याच्या आकडेवारीवरून दिसते. पण या वर्षी तो अधिक परिपक्व झाला आहे व त्याच्या आत्मविश्वासातही भर पडली आहे, असेही ते म्हणाले.

प्रभसिमरनच्या साथीने युवा खेळाडू प्रियांश आर्यनेही प्रभावित केले. प्रियांशने ३५ चेंडूत ६९ धावांची खेळी केली व या दोघांनी सलामीच्या गड्यासाठी १२० धावांची दमदार भागीदारी केली.

चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध शतक झळकावून प्रसिद्धीच्या झोतात आलेला प्रियांश आर्य या हंगामात पंजाब किंग्जच्या सर्वात मोठ्या कामगिरीत वाटा उचलला आहे. त्याने या भागीदारीत आक्रमकाची भूमिका बजावली आहे. प्रभसिमरन सिंग व प्रियांश आर्य या दोघांसाठी पुढे जाण्याची वेळ आहे, असे जोशी म्हणाले. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला हॉकी संघाचा दुसरा पराभव

**पर्थ, २७ एप्रिल**

भारतीय महिला हॉकी संघाने रविवारी पर्थ हॉकी स्टेडियमवर ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील दुसऱ्या सामन्यात दृढनिश्चयी आणि धाडसी कामगिरी केली पण त्यांना ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध २-३ असा पराभव पत्करावा लागला.

भारताने ज्योती सिंग (१३ मिनिटे) द्वारे आघाडी घेतली, त्यानंतर ऑस्ट्रेलिया अ संघाने एका गोलने पिछाडीवर असतानाही पुनरागमन केले. एव्ही स्टॅन्सबी (१७ मिनिटे), डेल डोल्केन्स (४८ मिनिटे) आणि जेमी-ली सुरहाने (५२ मिनिटे) गोल केले. भारताचा दुसरा गोल सुनीलिता टोप्पो (५९ मिनिटे) हिने केला.

भारतीय संघ ऑस्ट्रेलिया अ संघापेक्षा वेगाने गोल करत होता, त्यांनी आक्रमक खेळात उत्तम हेतू आणि नियंत्रण दाखवले. तथापि, ऑस्ट्रेलिया अ संघाला स्वतःचे स्थान राखता आले आणि भारतीय संघाला कठोर परिश्रम करायला भाग पाडले पहिल्या चरणाच्या . शेवटच्या टप्प्यात भारताने पेनॉल्टी किक मिळविली व ज्योती सिंगने भारतीय संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

दबावाखाली, ऑस्ट्रेलिया अ संघाने दुसऱ्या चरणात परतफेड केली. त्यांनी पेनॉल्टी स्ट्रोक ला गोलमध्ये रुपांतर केले. ए. व्ही. स्टॅन्सबीने १७ व्या मिनिटाला गोल केला. त्यानंतर, भारतीय संघाने यजमान संघांवर आक्रमण सुरूच ठेवले व मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ १-१ अशा बरोबरीत होते.

शेवटच्या चरणाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलिया अ संघाकडून डेल डोल्केन्स (४८ मिनिटे) ने गोल करून २-१ अशी आघाडी घेतली आणि त्यानंतर लगेचच जेमी-ली सुरहा (५२ मिनिटे) हिने आणखी एक गोल केला. यजमान संघाने ३-१ अशी आघाडी घेतली, परंतु भारतीय संघाने झुंज दिली कारण सुनीलिता टोप्पो (५९ मिनिटे) ने गोल केला. तथापि, भारतीय संघाला बरोबरीचा गोल करता आला नाही व ऑस्ट्रेलिया विजयी झाला. अभारताचा दौऱ्यातील तिसरा सामना १ मे, गुरुवारी ऑस्ट्रेलियाशी होईल. (वृत्तसंस्था)

### सूर्यकुमार यादवच्या ४ हजार धावा पूर्ण

**मुंबई, २७ एप्रिल**

मुंबई इंडियन्सचा फलंदाज सूर्यकुमार यादव रविवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये ४००० धावा पूर्ण करणारा दुसरा सर्वात जलद फलंदाज ठरला. त्याने वानखेडे स्टेडियमवर लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्धच्या ४५ व्या सामन्यात हा विक्रम केला.

त्याच्या ४००० धावा २७१४ चेंडूत झाल्या आणि तो या यादीत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात जलद फलंदाज आहे. ख्रिस गेल आणि एबी डिव्हिलियर्स यांनी संयुक्तपणे हा विक्रम केला आहे. या दोघांनीही २६५८ चेंडूत हा विक्रम केला आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने २८०९ चेंडूत ४००० धावा केल्या, तर चेन्नई सुपर किंग्जचा दिग्गज सुरेश रैनाने २८८६ चेंडूत हा टप्पा गाठला. (वृत्तसंस्था)

# भारताचा डेन्मार्ककडून १-४ ने पराभव

### सुदीरमन चषक बॅडमिंटन

**झियामेन, २७ एप्रिल**

येथे सुरु असलेल्या सुदीरमन चषक बॅडमिंटन स्पर्धेत रविवारी तनिषा क्रॅस्टो व श्रुती मिश्रा या महिला दुहेरीच्या जोडीने शानदार विजय मिळविला, परंतु ड गटाच्या सलामीच्या सामन्यात भारतीय संघाला बलाढ्य डेन्मार्ककडून १-४ असा पराभव पत्करावा लागला.

अखेरच्या दुहेरीच्या सामन्यात तनिषा व श्रुतीने नतासिया ॲन्थोनीसेन व अलेक्झांड्रा बोजे या डेन्मार्कच्या जोडीवर २१-१३, २१-१८ असा विजय नोंदविला. तत्पूर्वी, माजी विश्वविजेती पी.व्ही. सिंधूला लिने कायर्सफेल्टकडून २०-२२, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीच्या सामन्यात भारताच्या कपिला ध्रुव व तनिषा क्रॅस्टो या जोडीला जेस्पेर टॉफ्ट व ॲमेलिया मॅगेलुंड या जोडीकडून १३-२१, १४-२१ असा पराभव स्विकारावा लागला. सामन्याच्या प्रारंभी कपिला व तनिषाने चिवट झुंज दिली होती. आशियाई कांस्यपदक विजेत्या एच. एस. प्रणॉयला पुरुष एकेरीच्या सामन्यात ॲण्डर्स ॲन्टोनसेनकडून १५-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. हरिहरन आमसाकरुनन व आर. रुबान कुमार या जोडीला किम ॲस्ट्रुप व ॲण्डर्स रासमूसेनकडून ७-२१, ४-२१ असा पराभव पत्करावा लागला.

आता मंगळवारी फेंगहुआंग जिम्नॅशियम हॉलमध्ये भारताचा पुढील सामना बलाढ्य इंडोनेशियाशी होणार आहे. (वृत्तसंस्था)

# बार्सिलोनाने जिंकले कोपा डेल रे

### अतिरिक्त वेळेत रिअल माद्रिदवर मात

**माद्रिद, २७ एप्रिल**

ज्युल्स कौंडेने अतिरिक्त वेळेच्या शेवटच्या मिनिटांत केलेल्या गोलच्या बळावर बार्सिलोनाने कोपा डेल रेच्या अंतिम सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी रिअल माद्रिदवर ३-२ असा नाट्यमय विजय मिळवला आणि विजेतेपद पटकावले.

सेव्हिलच्या ला कार्टुजा स्टेडियमवर रोमांचक वातावरणात खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात फ्रेंच डिफेंडरने ११६ व्या मिनिटाला २५ यार्डवरून खालच्या कोपऱ्यात लो ड्राइव्हवर गोल करून बार्सिलोनाला विक्रमी ३२ वे स्पॅनिश चषक जेतेपद जिंकून दिले.


हा सामना रिअल माद्रिदसाठी निराशाजनक राहिला, कारण पंचांनी आडदांड खेळाबद्दल ॲण्टिनियो रुएडिगर, लुकास वाझक्वेझ व ज्यूड बेलिंगहॅमला लाल कार्ड देऊन मैदानाच्या बाहेर केले होते.

पहिल्या सत्रात पेड्रीने २८ व्या मिनिटाला बॉक्सच्या बाहेरून शानदार कर्लिंग स्ट्राईक करून बार्सिलोनाला आघाडी मिळवून दिली.

तथापि, दुसऱ्या सत्रात रिअल माद्रिदने नियंत्रण मिळवले. कायलियन एमबाप्पेने ७० व्या मिनिटाला फ्री किकवरून बरोबरीचा गोल केला.

ऑरेलियन चौमेनीने सात मिनिटांनंतर कॉर्नरवरून केलेल्या जबरदस्त हेडरने रिअल माद्रिदला आघाडी मिळवून दिली, तर ८४ व्या मिनिटाला फेरान टोरेसने चोख प्रत्युत्तर देत बरोबरीचा गोल केला.

त्यामुळे सामना अतिरिक्त वेळेत गेला. अतिरिक्त वेळेतील अखेरच्या क्षणी ज्युल्स कौंडेने विजयी गोल केला. जर्मन व्यवस्थापक हन्सी फ्लिकच्या मार्गदर्शनाखाली बार्सिलोनाला पहिले मोठे जेतेपद मिळाले. (वृत्तसंस्था)



कोपा डेल रे विजेतेपद पटकावल्याचा आनंद साजरा करताना बार्सिलोनाचे खेळाडू

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोमवार, २८ एप्रिल २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

RAJASTHAN ROYALS VS GUJARAT TITANS

**राजस्थान रॉयल्स वि. गुजरात टायटन्स**

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर

## विचारपुष्प



व्यक्ती, समाज, निसर्ग आणि परंपरा यांच्यातील संबंध नियमित करणारे जितकेही नियम आहेत, ते केवळ हिंदुस्थान किंवा हिंदूसाठीच नाही, तर संपूर्ण विश्वासाठी योग्य आहेत, तेव्हाच तर त्याला मानव धर्म म्हटले आहे. त्याचे सिद्धान्त कालही योग्य होते, आजही योग्य आहेत आणि भविष्यातही योग्य राहतील. सनातन धर्म, हिंदू धर्म, मानव धर्म हे सर्व समानार्थी शब्द आहेत.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### ६ कंपन्यांच्या बाजारमूल्यात १.१८ लाख कोटींनी वाढ

**नवी दिल्ली :** गेल्या आठवड्यातील शेअर बाजारातील व्यवहारात देशातील टॉप १० कंपन्यांपैकी ६ कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल १.१८ लाख कोटी रुपयांनी वाढले. टीसीएसचे मार्केट कॅप १२.४७ लाख कोटींवर पोहोचले. रिलायन्सचे ३४,५०७ कोटी, इन्फोसिसचे २४,९१९ कोटी आणि एचडीएफसी बँकेचे बाजार भांडवल २,९०७ कोटींनी वाढले. एसबीआयचे बाजार भांडवल १,४७२ कोटींनी वाढून ७.१२ लाख कोटी झाले आणि आयटीसीचे बाजार भांडवल ५.३५ लाख कोटी झाले.

# हल्लेखोरांना मदत करणाऱ्या देशद्रोह्यांना बडगाममध्ये अटक

## पोलिसांची कारवाई, जेवणासह राहण्याची केली होती व्यवस्था

**जम्मू, २७ एप्रिल**

पहलगाम हल्ल्यानंतर काश्मीरातील विविध भागात सुरक्षा दलांचे जवान छापे टाकत आहेत. आतापर्यंत दहशतवाद्यांचे अनेक अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले असून १७५ जणांना अटक करण्यात आली. अशातच शनिवारी रात्री स्थानिक पोलिसांना कोम्बिंग ऑपरेशनवेळी हल्लेखोरांना रसद पुरविणे, त्यांची राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करणाऱ्या बडगाम येथील दोन स्थानिक नागरिकांना पकडले. ताहिर अहमद आणि शब्बीर अहमद गनई अशी त्यांची नावे आहेत.

पहलगाम हल्ल्यातील अतिरेक्यांना पकडण्यासाठी शोधमोहिम राबवत असताना गोपनीय माहितीच्या आधारे बडगाम पोलिसांनी हल्लेखोरांना मदत करणाऱ्या दोन स्थानिक नागरिकांना अटक केली. दोन्ही आरोपी काश्मीर खोऱ्यात सक्रिय असलेल्या दहशतवादी संघटनांना पाठिंबा देण्यात सहभागी होते आणि भारतात घुसखोरी करणाऱ्या अतिरेक्यांना माहिती पुरविणे, आश्रय आणि रसद पुरविण्यात त्यांचा सहभाग असल्याचे चौकशीत समोर आली. देशविरोधी कारवायांमध्ये आणि स्थानिक तरुणांना दहशतवादी संघटनांमध्ये सामील होण्यास प्रवृत्त करण्यात त्यांचा समावेश होता, असे जिल्हा पोलिस अधिक्षकांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### पुन्हा तीन दहशतवाद्यांची घरे जमीनदोस्त

रविवारी सकाळी सुरक्षा दलांनी तीन अतिरेक्यांची घरे पाडली. यात बांदीपोरातील दहशतवादी जमील अहमद शिर गोजरी याचे दुमजली घर जमीनदोस्त केले. जमील २०१६ पासून अतिरेकी संघटनेत सक्रिय आहे. याशिवाय जैनापोरा भागातील वांडीना येथील दहशतवादी अदनान शफीचे घरही पाडले. तो वर्षभरापासून दहशतवादी संघटनेत सक्रिय आहे. लष्करचा अतिरेकी शाहिद अहमद कुट्टे याचेही घर उद्ध्वस्त करण्यात आले.



बांदीपोरातील दहशतवादी जमील अहमद शिर गोजरीचे घर जमीनदोस्त केले

### ६३ अड्ड्यांवर छापे, १७५ अटकेत

काश्मीर खोऱ्यात सुरक्षा यंत्रणांनी ६३ दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर छापे टाकले आणि १,५०० हून अधिक संशयितांना ताब्यात घेतले. एकट्या अनंतनागमधून अतिरेक्यांना मदत करणाऱ्या १७५ स्थानिक नागरिकांना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेले आरोपी पाकिस्तानातून येणाऱ्या दहशतवाद्यांना सर्व प्रकारची मदत करीत होते.

## पहलगाम : तपास एनआयएच्या हाती

**नवी दिल्ली, २७ एप्रिल**

पहलगाम येथील हल्ल्याचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) आपल्या हाती घेतला असून घटनास्थळी असलेल्या साक्षीदारांकडून माहिती घेतली जाणार आहे. गृहमंत्रालयाच्या आदेशानुसार एनआयएने तपासाला प्रारंभ केला आहे.

तपास संस्थेतील दहशतवादविरोधी पथकातील पोलिस महानिरीक्षक, उपपोलिस महानिरीक्षक आणि पोलिस अधिक्षक यांच्या नेतृत्वातील पथक प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदविणार आहे. दहशतवादी जेथून बैसरण येथे घुसले आणि जेथून बाहेर पडले त्या ठिकाणची कसून तपासणी केली जात आहे.

**हल्ल्याच्या घटनेचे चित्रीकरण मिळाले**

हल्ला झाला तेव्हा एक स्थानिक पत्रकार झाडावर होता आणि त्याने घटनेचे संपूर्ण चित्रीकरण केले. प्रथम दोन दहशतवादी हे दुकानाच्या मागे लपले होते. या दोघांनीच नागरिकांना कलमा म्हणावयास लावले आणि त्यानंतर चौघांना गोळ्या घातल्या. यानंतर नागरिकांची पळापळ सुरू झाल्याचे रेकॉर्डिंगमध्ये दिसून आले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानची घाबरगुंडी, रेल्वे स्थानकांवर ताबा

### गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये युद्धसराव, सुट्ट्या रद्द



**इस्लामाबाद, २७ एप्रिल**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दिलेल्या कारवाईच्या इशाऱ्यानेच पाकिस्तानी सैन्यात गोंधळ उडाला आहे. पाकिस्तानी सैन्याने सर्व सैनिकांच्या सुट्ट्या रद्द करून मुख्यालयात परतण्याचे आदेश दिले. पंजाब प्रांतातील रेल्वे स्थानकांचा ताबा सैन्याकडे सोपविण्यात आला. याशिवाय गिलगिट-बाल्टिस्तानामध्ये सैन्याचा जोरदार युद्धसराव सुरू असल्याची माहिती पाकिस्तानचे दैनिक डॉनमधून देण्यात आली.

पाकिस्तानी लष्करासह हवाई दल आणि नौदललातील सर्व कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्याचे आदेश संरक्षण मंत्रालयाने काढले आहे. अतिरिक्त रसद सामग्रीने भरलेली सैन्याची वाहने व्याप्तक काश्मीराकडे रवाना करण्यात आली. आवश्यकता भासल्यास सैन्याला तातडीने रवाना करण्यासाठी पंजाब प्रांतातील बहुतांश रेल्वे स्थानकांचा ताबा सैन्याकडे देण्यात आला. कारगिल युद्धानंतर पहिल्यांदाच पाकिस्तानी सेनेच्या हालचाली वाढल्या असल्याचे वृत्त डॉनने दिले आहे. (वृत्तसंस्था)

### एअर स्ट्राईकच्या भीतीने मदरसे, मशिदी ओस

पुलवामा हल्ल्यावेळी भारताने व्याप्त काश्मीरमध्ये एअर स्ट्राइक करीत अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले होते. तशीच कारवाई आता होणार या भीतीने तेथील मदरसे, मशिदींमध्ये वास्तव्यास असलेल्या दहशतवाद्यांना बाहेर काढण्यात आले. यामुळे गिलगिट बाल्टिस्तानमधील मशिदी, मदरसे ओस पडले आहेत. दहशतवाद्यांचे म्होरके देखील पळाले आहेत. मुरीदके येथील तोयबाच्या मदरशांमध्ये शिकणारे सुमारे २००० विद्यार्थी आणि मौलवी-मौलाना येथून निघून गेल्याची माहिती पाकच्या एका वृत्तवाहिनीने दिली आहे.

# एकही बेपत्ता नाही, मायदेशी पाठविणारच

### पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार : मुख्यमंत्री

**पुणे, २७ एप्रिल**

महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी आमच्याकडून असून त्यातील कुणाही बेपत्ता नाही. सर्वांची ओळख पटविण्यात आली असून नियमाप्रमाणे ठरलेल्या मुदतीत सर्वांना मायदेशी पाठविण्याची तयारी झाली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्पष्ट केले आहे.

येथे पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले की, पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याच्या चुकीच्या बातम्या प्रकाशित करू नका. कारण, जेवढे पाकिस्तानी राज्यात आहेत त्यांची संपूर्ण यादी तयार आहे. ज्यांचा पत्ता लागत नव्हता त्यांनाही शोधण्यात आले आहे. आज सायंकाळ किंवा उद्यापर्यंत एकही पाकिस्तानी महाराष्ट्रात राहणार नाही. पुणे मनपाने आयोजित एका कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री आले होते. (वृत्तसंस्था)



### पाणीसाठा घटतोय

राज्यातील पाणीटंचाईबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, एप्रिल आणि मे महिन्यात धरणांमधील पाणीसाठा घटत आहे. परिस्थिती पाहून नियोजन केले जात आहे. सध्या राज्यातील धरणांमध्ये ३८ टक्के जलसाठा असल्याचे त्यांनी सांगितले.




तुमची पल्सर निवडा आणि ट्राइबमध्ये सामील व्हा

डाउन-पेमेंट सुरू ₹5 370/-*

| | 125 NEON | NS125 BASE | NS160 BASE | NS200 BASE |
|---|---|---|---|---|
| बचत | - | - | ₹9 075/- | ₹8 448/- |
| खास किंमत (बचत झाल्यावर) | ₹86 278/- | ₹99 994/- | ₹1 30 355/- | ₹1 40 307/- |

*एक्स-शोरूम क्रीमत

pulsar
DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE | BAJAJ CREDIT

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स-शोरूम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स-शोरूम किंमत 31 मार्च 2025 नुसार. *पल्सर 125 निऑनसाठी डाऊन-पेमेंट म्हणजे मार्जिन मनी. मार्जिन मनीमध्ये DCC शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत आणि ते क्रेडिट पॅरामीटर्सच्या पूर्ततेवर आधारित आहे. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road AHERKAR BAJAJ 9689899840 • Hotgi Road AHERKAR BAJAJ 8956 069 355 • Akkalkot Road AHERKAR BAJAJ 8956 320 060 • Pandharpur PANDURANG BAJAJ 8600024805 • Jeur SHIVRATNA BAJAJ 9922044676 • Barshi AHERKAR BAJAJ 8308004007.
Authorised Service Centre: Mangalwedha 9890214155, Marwade 9028703555, Akkalkot 9011556800, Karkamb 7057447777, Vairag 8308006007, Sangola 8888109109, Karmala 8888984084, Kandar 9673005524, Rashin 9975704778, Mirajgaon 7774826060, Akluj 7756999799, Natepute 9850738876, Mohol 8830070701.

## अग्रलेख...

# पाकिस्तानची दुखरी नस

काश्मीरसाठी हिंसाचार, कटकारस्थान, विद्रोह नवीन नाही. कधीकाळी हिंदू सम्राट आणि राजांच्या काळात धरतीवरील स्वर्ग असलेल्या काश्मीरला यवनांचे पाय लागले अन् पाठोपाठ अवकळाही आली. तेव्हापासून भारताच्या शिरावरील हा मुकुट रक्ताने माखतो आहे. बैसरणच्या हिरव्या कुरणावर सुटी साजरी करण्यासाठी आलेल्या निष्पाप पर्यटकांवर हल्ला करून आणि फक्त हिंदूंचे जीव घेऊन दहशतवाद्यांनी क्रूरतेच्या सर्व सीमा पार केल्या. पत्नी, मुलं आणि आईवडिलांसमोर हिंदू व्यक्तीला उभे करून त्यांच्यावर बेछूट गोळ्या घातल्या तेव्हा तेथील परिस्थिती काय असेल याची कल्पना केली तरी अंगावर शहारे उभे राहतात. ५ ऑगस्ट २०१९ रोजी ३७० कलम हटविल्यानंतर गेल्या चार वर्षांत मोदी सरकारने विकासाची कामे, रोजगार आणि पर्यटनाच्या बळावर उभ्या केलेल्या काश्मीरसाठी हा मोठा धक्काच. गेल्या ७५ वर्षांपासून रक्तरंजित संघर्षाचा सामना करीत असलेले कश्यप ऋषींचे हे काश्मीर स्वर्गासमान भासत असतानाच पुन्हा एकदा पाकसमर्थित दहशतवाद्यांनी डाव साधला आणि निष्पाप नागरिकांचे जीव घेतले. हा हल्ला केवळ पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या मानबिंदूवर केलेला प्रहार होय. भले तुम्ही १४० कोटी लोकसंख्या असलेला देश असाल, आम्ही तुम्हाला मोजत नाही, हे पुन्हा एकदा दहशतवाद्यांनी दाखवून दिले आहे. वारंवार हल्ले करून जखमी करण्याचे कारण एकच आणि ते म्हणजे हिंदूंमध्ये असलेली सहिष्णुता. म्हणूनच तर आता शांतता नांदेल, सर्व काही ठीक होईल, रक्तपात योग्य नाही, अशा भ्रमात आपण राहिलो आणि तिकडे दहशतवाद्यांनी डाव साधला. खरे तर १९४७-४८ मध्येच काश्मीरचा प्रश्न निकाली काढण्याची संधी चालून आली होती. पण, तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भूमिका आड आली. भारतीय सैन्य व्याप्त काश्मीरची राजधानी मुजफ्फराबादपासून अवघ्या ७० किलोमीटर अंतरावर होते. उरी जिंकून डोमेलच्या दिशेने भारतीय लष्कराने कूच केले होते. अवघे काही तास जरी मिळाले असते तर मुजफ्फराबादमध्ये तिरंगा फडकला असता. पण, युद्धबंदी स्वीकारण्याचा जवाहरलाल नेहरू यांचा अवसानघातकी निर्णय आड आला. १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळीही काश्मीरचा मुद्दा निकाली काढण्याच्या संधी आल्या होत्या, पण तत्कालीन राजकीय नेतृत्वामुळे त्याही गमावल्या. वारंवार जखमा आणि धोके मिळूनही आपण त्यापासून धडा घेतला नाही. १९९९ मध्ये तर विश्वासघातकीपणाचा पाकिस्तानने कळस केला. एकीकडे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी शांतता बस घेऊन लाहोरला गेले असता दुसरीकडे पाकिस्तानी लष्कर कारगिलच्या टेकड्यांवर मोर्चेबंदी करण्यात गुंतले होते. यावेळीही भारताला मर्यादित युद्ध करावे लागले. नियंत्रण रेषा पार न करण्याच्या सूचना लष्कराला देण्यात आल्या होत्या. पाकिस्तानला नियंत्रण रेषेचे पावित्र्य राखण्याचे देणेघेणे नसल्यास भारताने तरी ते का करावे? एकतर्फी शांततेला काडीचेही महत्त्व नसते. दुर्दैवाने भारत सातत्याने शांततेचे तुणतुणे वाजवत आला आहे. त्याचे परिणाम आपण भोगत आहोत.

वर्तमान काळात कुठल्याही देशाला थेट युद्धात उतरणे परवडणारे नसले तरी युद्ध न करता शत्रू राष्ट्राच्या मुसक्या आवळणे शक्य आहे. पुलवामा, उरी घटनेनंतर भारतीय जवानांनी बालाकोटवर झडप घातली आणि आमच्या वाटेला जाल तर तुमची नखे उपटून फेकू, असा इशाराच मोदी सरकारने दिला. नेतृत्व कणखर असेल, आघाडीवर राहणारे असेल तर सैन्यालाही हुरूप येत असतो. पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला करून पाकिस्तानधार्जिण्या दहशतवाद्यांनी फार मोठी चूक केली आहे. याचे परिणार फार भयंकर होतील, याची धास्ती पाकिस्तानला बसली आहे. त्याचे परिणामही दिसू लागले असून आम्ही पहलगाम घटनेच्या निष्पक्ष चौकशीला सहकार्य करण्यास तयार आहोत, असे वक्तव्य पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केले आहे. या वक्तव्याला भारताने अद्याप अधिकृतपणे उत्तर दिले नाही. हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या नसा आवळणे सुरू केल्यानेच शाहबाज 'शरीफ' होण्याचा प्रयत्न करीत आहेत. एकीकडे पाकिस्तान भारताला प्रत्युत्तर देण्यास तयार असल्याचा आव आणत असला तरी पाकिस्तानी लष्कर आणि राजकीय यंत्रणा आतून पुरती हादरली आहे. खरे तर भारताने केलेल्या जलकोंडीमुळे पाकिस्तानी नेते चिथावणीखोर विधाने करीत सुटले आहेत. ही परिस्थिती कुणामुळे निर्माण झाली याचा विचार प्रथम करणे आवश्यक आहे. सिंधू पाणी वाटप करार स्थगित करून मोदी सरकारने पाकिस्तानविरोधात एकही गोळी न झाडता युद्ध जिंकले असे म्हणावे लागेल. वाजपेयी सरकारच्या काळात तत्कालीन लष्करशहा परवेज मुशर्रफ भारतभेटीवर आले असता पत्रकारांशी वार्तालाप करताना, झालेच तर पुढील युद्ध पाण्यासाठी होईल, असे वक्तव्य केले होते. सिंधू नदी ही पाकिस्तानची जीवनदायिनी आहे. भारतातून वाहत जाणारी ही नदी अरबी समुद्राला मिळते. या नदीच्या पाण्यावर पाकिस्तानची ९० टक्के शेती अवलंबून आहे. मोठमोठी धरणे या नदीवर बांधली आहेत. जलविद्युत प्रकल्प आहेत. मोठमोठ्या उद्योगांना याच नदीतील पाण्याचा पुरवठा होतो. आता सिंधू पाणी वाटप करार स्थगित केल्याने भविष्यात आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना पाकिस्तानला आली असेल. युद्ध झालेच तर ते कधीतरी संपेल पण पाणीच नसेल तर काय? पाकिस्तानसाठी उन्हाळा फार भयंकर असतो. त्यात बर्फ वितळून तयार होणारे शुद्ध पाणी जर मिळाले नाही तर आपली काय अवस्था होईल, याची भीती पाकिस्तानला वाटत आहे. आधीच बलुचिस्तानात स्वातंत्र्यलढा सुरू असताना फौजेला नियंत्रण रेषेवर उतरविणे धोक्याचे असल्याची जाणीव शरीफ सरकारला झाली आहे. ज्या तालिबानला पाकिस्तान लष्कराने पोसले, पोक्त केले तेच तालिबानी आज पाकिस्तानी सैनिकांवर हल्ले करीत आहेत. पण, 'गिरे तो भी टांग उपर' या म्हणीप्रमाणे आपण घाबरलेलो नाही हे दाखविण्यासाठी पाकिस्तानी रेंजर्स गेल्या तीन रात्रींपासून नियंत्रण रेषेवर गोळीबार करीत आहेत. हे धारिष्ट्य केवळ जनतेचे मनोबल टिकून राहावे यासाठी असले तरी सध्या भारताशी थेट दोन हात करणे म्हणजे मरण ओढवून घेणे आहे, याची जाणीव त्यांनाही आहेच.

भारतात जसे काही बोलघेवडे आहेत तसेच पाकिस्तानातही आहेतच. पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान दिवंगत बेनझीर भुट्टो यांचे पुत्र बिलावल यांनी शुक्रवारी सिंधू नदीच्या किनारी सक्कर येथील सभेत बोलताना सिंधू नदीतून एक तर पाणी वाहील किंवा भारतीयांचे रक्त, अशी धमकी दिली. सिंधू करारात केवळ सिंधूच नव्हे तर झेलम, चिनाब, रावी, सतलज आणि बियास या नद्यांचाही उल्लेख आहे, हे बिलावल विसरले असतील. वास्तविक दोन्ही देशांत जो नवा संघर्ष उभा ठाकला आहे तो पाकिस्तानसमर्थित दहशतवाद्यांमुळेच. एवढेच नव्हे तर बिलावलची जन्मदात्री बेनझीर यांनाही प्रचारसभेत असताना दहशतवाद्यांनीच बॉम्बस्फोट घडवून ठार मारले होते. तशीही भुट्टो कुटुंबीयांनी भारताबरोबर शत्रुत्वाची भावना मनात जपून ठेवली आहे. बेनझीर भुट्टो जेव्हा पहिल्यांदा पंतप्रधान झाल्या होत्या तेव्हा गरज पडल्यास काश्मीरसाठी भारताबरोबर एक हजार वर्षे युद्ध करू असे दर्पोक्तियुक्त विधान केले होते. बिलावलही मातेच्याच पावलावर पाऊल ठेवत आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पाच दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील भेद स्पष्ट करणारे अनावश्यक आणि मध्ययुगीन काळातील मानसिकता दर्शविणारे विधान इस्लामाबाद येथे केले. द्विराष्ट्र सिद्धांत हा किती आवश्यक आहे हे सांगतानाच काश्मीर ही पाकिस्तानची जग्युलर व्हेन असल्याचे म्हटले. ही नसच मेंदू आणि हृदयाला रक्तपुरवठा करते. अर्थात काश्मीरशिवाय पाकिस्तान अपूर्ण असल्याचा त्याचा अर्थ निघतो. पण, मुनीर यांना हे काय माहीत की नरेंद्र मोदी ही दुखरी नसच वेगळ्या पद्धतीने दाबतील?

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# पहलगामचा मास्टरमाईंड!

मुंबई हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणा याला भारतात आणून आठ दिवसही झाले नसताना, झेलम पुन्हा एकदा लाल झाली. पहलगाममध्ये करण्यात आलेल्या दहशतवादी हल्ल्यात २८ भारतीय पर्यटक ठार झाले. हे सारे हिंदू होते. या हल्ल्याचा मास्टरमाईंड कोण? पाकिस्तानचे लष्करप्रमुख-जनरल असीम मुनीर? पाकिस्तान सरकार? एखादी दहशतवादी संघटना? नाही! जनरल मुनीर हे तर या खेळातील फक्त एक प्यादे आहेत. काश्मीरमधील घटनाक्रमाचा खरा मास्टरमाईंड आहे- चीन!

**जनरल मुनीर यांचे गरळ :** कुराण शरीफ कंठस्थ असणारे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या एका ताज्या भाषणानंतर पहलगाम हत्याकांड घडले. जनरल मुनीर यांनी आपल्या भाषणात काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. विशेष म्हणजे त्यांचे भाषण सुरू असताना पंतप्रधान शाहबाज शरीफ उपस्थित होते. 'काश्मीरमधील बांधवांचा पाकिस्तानात येण्यासाठी संघर्ष सुरू आहे. आमचा त्यांना पूर्ण पाठिंबा आहे. काश्मीरला पाकिस्तानपासून कुणीही वेगळे करू शकत नाही' असे प्रतिपादन जनरल मुनीर यांनी केले.

जनरल असीम मुनीर यांचे हे भाषण बहुधा अनिवासी पाकिस्तानींसमोर झाले असावे असे दिसते. जगात फक्त दोनच देश कुराणामधील आयतांच्या आधारांवर स्थापन झाले असून, त्यातील पाकिस्तान एक आहे. पाकिस्तानच्या निर्मितीची कथा संस्मरणीय अशी आहे, या कथेचा विसर कुणालाही पडता कामा नये असे प्रतिपादन करताना जनरल मुनीर यांनी पाकिस्तानी नागरिकांना नव्या पिढीस पाकिस्तान निर्मितीची कथा सांगण्याचा आग्रह केला. पाकिस्तानची निर्मिती धर्माच्या आधारवर झाली असून, हिंदूंपासून आपण कसे वेगळे आहोत हे उपस्थितांना समजावून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जनरल मुनीर यांना कुराण कंठस्थ असल्याने कुराणमधील काही आयता म्हणून दाखवीत त्यांनी आपली भूमिका मांडली.

**पाकिस्तान प्रगतिपथावर? :** पाकिस्तान प्रगतिपथावर आहे. पाकिस्तान जगात सर्वोच्च स्थान प्राप्त करणार आहे. त्या मार्गावर पाकिस्तानचे मार्गक्रमण सुरू झाले आहे. त्यात आता माघार नाही, असे म्हणत जनरल मुनीर यांनी टाळ्या मिळविल्या. पाकिस्तानचे लष्कर अतिशय मजबूत आहे. बलुचिस्तान आर्मी वा आणखी काही फुटीर गटांना आम्ही चिरडून टाकू असेही त्यांनी टाळ्यांच्या गजरात सांगून टाकले. जनरल मुनीर यांनी आपल्या भाषणात अनेक वेळा टाळ्या तर मिळविल्या पण, पाकिस्तानच्या रिकाम्या खजिन्याचे काय, या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याजवळ स्वाभाविकच नसावे.

**भारताचा आक्षेप :** जनरल मुनीर यांच्या भाषणावर भारताने जोरदार आक्षेप घेत, त्यांच्या भूमिकेचा प्रतिवाद केला. जनरल मुनीर यांची भूमिका दोन्ही देशांच्या संबंधांसाठी सलोखा निर्माण करणारी नाही असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सांगितले.

**चीनचे पाठबळ? :** पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी अचानक काश्मीरचा मुद्दा उपस्थित करणे आणि बांगलादेशने उघडउघड भारतविरोधी भूमिका घेणे याला चीनचे पाठबळ असल्याचे मानले जात आहे. पाकिस्तान सरकारने मागील काही महिन्यांपासून काश्मीरचा मुद्दा थंड्याबस्त्यात टाकल्यासारखे दिसत होते. मात्र, राष्ट्रपती वा पंतप्रधान यांनी यावर बोलण्याऐवजी लष्करप्रमुखांनी त्यावर भाष्य करणे याकडे वेगळ्या भूमिकेतून पाहिले जात आहे. जनरल मुनीर यांच्या या विधानाचा अर्थ म्हणजे येणाऱ्या काळात, पाकिस्तान काश्मीरमधील वातावरण पुन्हा गढूळ करण्याचा प्रयत्न करील असा काढला जात आहे.

**नवी व्यूहरचना :** जनरल मुनीर यांच्या भाषणाचे साद-पडसाद विरण्यापूर्वीच पहलगामचा नरसंहार घडला. पाकिस्तानची ही नवी व्यूहरचना असल्याचे दिसते. मागील काही वर्षांत पाकिस्तानने नागरिकांवर हल्ले न करता भारतीय सुरक्षा दळांवर हल्ले करण्याची व्यूहरचना राबविणे सुरू केले होते. आपल्या कारवाया काश्मीर खोऱ्यात करण्याऐवजी जम्मू भागात सुरू केल्या होत्या. डोडा- पूंछ-राजौरी या भागांत भारतीय लष्करावर हल्ले केले जात होते. आता त्यात बदल करून काश्मीर खोऱ्याची निवड करण्यात आली व नागरिकांचे शिरकाण करण्यात आले.

**बांगलादेशचे फुत्कार :** दुसरीकडे बांगलादेशनेही भारताविरोधात फुत्कार काढणे सुरू केले आहे. कालपर्यंत भारताला दबून राहणारा बांगलादेश भारताच्या अंतर्गत मामल्यांवर भाष्य करू लागला आहे. बांगलादेशने पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे झालेल्या हिंसाचाराबाबत भाष्य केले असून या हिंसाचाराबाबत चिंता व्यक्त केली आहे. भारतानेही बांगलादेशला सुनावले असून, बांगलादेशने प्रथम आपल्या अंतर्गत परिस्थितीकडे पाहावे असे म्हणत भारताने बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित केला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश यांना अचानक भारताविरोधात बोलण्याचे बळ कसे व कुठून मिळाले?

**चीनची दुहेरी चाल :** चीन एकीकडे भारताशी संबंध सामान्य- सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि दुसरीकडे त्याने भारतावर दबाव कायम ठेवण्यासाठी पाकिस्तान व बांगलादेश या आपल्या मांडलिक देशांचा वापर सुरू केला आहे असे मानले जाते. चीनच्या चिथावणीशिवाय पाकिस्तान-बांगलादेश यांना अचानक भारताच्या विरोधात भूमिका घेण्याचे स्वप्न पडू शकत नाही हे भारताच्याही लक्षात आले असावे. पाकिस्तान तर भारताच्या विरोधात होताच. पाकिस्तानच्या भूमिकेत नवे काही नाही. मात्र, बांगलादेशची भारताच्या विरोधातील आक्रमक भूमिका भारतासाठी चिंतेची बाब ठरणार आहे.

**राष्ट्रपती ट्रम्पही दोषी :** पहलगाममध्ये झालेल्या नरसंहारात अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प हेही दोषी आहेत. आजवर अमेरिका जगातील सर्वांत मोठी महाशक्ती होती. याने रशिया व आता चीन दोन्ही महाशक्ती अमेरिकेला वचकून असत. राष्ट्रपती ट्रम्प यांनी १०० दिवसांत अमेरिकेचा हा दरारा-दबदबा संपविला. त्यांनी नाटोला संपविले. याचे दोन परिणाम झाले. रशियाला युक्रेनमध्ये हैदोस करण्याची मोकळीक मिळाली. युक्रेन आता आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहे. अमेरिकेचे माजी परराष्ट्र मंत्री अंटोनी ब्लिंकन यांनी सध्याच्या स्थितीचे फार नेमके विवेचन केले आहे. एका मुलाखतीत ते म्हणतात, अमेरिका फर्स्ट हे ट्रम्प प्रशासनाचे धोरण आहे. पण, आता आम्ही 'अमेरिका फर्स्ट' ऐवजी 'अमेरिका अलोन' म्हणजे अमेरिका एकाकी या स्थितीत आलो आहोत.

**चीनला बळ :** अमेरिका एकाकी झाल्याचा परिणाम म्हणजे चीन शिरजोर होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर तत्कालीन सोवियत युनियन व अमेरिका दोघांनीही आपल्या मित्र राष्ट्रांचे गट तयार केले. आता रशियाची जागा चीनने घेतली आहे. चीन आपले हातपाय पसरण्याचा एक प्रयत्न करीत असताना, अमेरिकेने आपल्या मित्र राष्ट्रांना झिडकारले. याने चीन सुखावला. रशियाच्या डोळ्यात ज्याप्रमाणे युक्रेन सलत होते, चीनच्या डोळ्यात भारत सलत आहे.

**जागतिक महासत्ता होण्यासाठी :** जागतिक महासत्ता होणे हे चीनचे स्वप्न आहे. जागतिक महासत्ता होण्यासाठी आशियाची महासत्ता होणे आवश्यक आहे आणि आशियाची महासत्ता होण्यासाठी भारतावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. यासाठी चीनने आपला मोर्चा भारताकडे वळविला. पाच वर्षांपूर्वी त्याने लडाखमध्ये सरळसरळ लष्करी हस्तक्षेप केला होता. नंतर त्याने बांगलादेशमधील भारत समर्थक मानले जाणारे शेख हसीना सरकार उलथविले. आता त्याने पाकिस्तानला हाताशी धरून काश्मीर पुन्हा तापविले. चीन, पाकिस्तान व बांगलादेश असे तिहेरी आव्हान आता भारताला हाताळावे लागणार आहे.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# खिसा आपला, नफा बँकेचा...

भारतातील सरकारी बँकांमध्ये ११ बँका आहेत. विशेष म्हणजे या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया नाही. ती १२ वी सरकारी बँक असून, सर्वांत मोठी आहे. इतर सर्व ११ बँकांच्या बरोबरीची कदाचित स्टेट बँक एकटीच असावी. या बाराही बँकांचे दंडवसुलीचे सारखेच नियम आहेत. काही वर्षांपासून 'मिनिमम बॅलन्स', 'आवश्यक किमान शिल्लक रक्कम' नसल्यास या बँका आपल्या ग्राहकाला, खातेदाराला दंड ठोकण्याचा नियमच केला आहे. असा नियम करण्याची बँकांना गरज का भासली, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर कधीच मिळाले नाही किंवा कोणा बँक कर्मचाऱ्याला सांगता आले नाही. मुळातच या सर्वच बँका चांगला नफा कमावत असल्याचेच दिसून आले आहे. मध्यंतरी यापैकी काही बँका अडचणीत आल्या होत्या. बँक हा एक व्यवसाय आहे. या व्यवसायाच्या काही गरजा आहेत. त्यांना ग्राहक सेवा द्यावी लागते, व्यवस्थापन खर्च करावा लागतो, ते नियमित उत्पन्नात भागत नसल्यामुळे हा शिल्लक किमान रकमेचा नियम आल्याचे सांगतात. तर दुसरीकडे, बँकांचा नफा थोडाफार कमी झाला तर बिघडते कुठे, असाही प्रश्न सामान्य ग्राहक विचारतो. आणखी एक महत्त्वाचा दंड बँका आकारत असतात, तो म्हणजे जास्तीचा एटीएम वापर. एटीएम या अतिशय सोयीस्कर अशा सुविधेचा वापर अनेकदा खातेदारच बेलगाम पद्धतीने करतो. ही सुविधा देण्यास बँकांना मोठा खर्च करावाच लागतो. ही एटीएम सुविधा किती, कशी, कुठे वापरल्यास किती पैसे लागतात हे बँकांनी आधीच सांगितले असते. त्यामुळे त्याचा वापर खातेदाराने त्या हिशेबाने करणे आणि त्यानुसार पैसे मोजण्याची तयारी अपेक्षित आहेच.

'किमान शिल्लक'च्या नियमातून स्टेट बँक सोडून या ११ बँकांनी २०२० ते २०२४ दरम्यान आपल्याच खातेदारांकडून तब्बल ८५०० कोटी रुपयांची दंडवसुली केली आहे. २०२३-२४ या एकाच वर्षातील वसुली २३२६ कोटी रुपये इतकी आहे. यात बडोदा बँक ३८६, बँक ऑफ इंडिया १९४, महाराष्ट्र बँक १२६, कॅनरा बँक २८४, सेंट्रल बँक १२८, इंडियन बँक ३६९, इंडियन ओव्हरसीज बँक ४, पंजाब ॲण्ड सिंध बँक ३९, पंजाब नॅशनल बँक ६३३, युको बँक ३६ आणि युनियन बँक १२६ कोटी असा वाटा आहे. एकट्या स्टेट बँकेने २०१९-२० या आर्थिक वर्षात अशा दंडापोटी ६३३ कोटी रुपये वसूल केले आणि पुढे हा दंड घेणे २०२० पासून थांबवले. स्टेट बँकेने हा स्वागतार्ह निर्णय घेतला. पण इतर बँका तो का घेत नाहीत, हा प्रश्न सर्वसामान्य खातेदारांना सतावत असतो. या बँका तोट्यात नसतानाही केवळ नफा वाढविण्यासाठी ही दंड तरतूद गोंजारत असतात. २०१८ ते २०२३ या पाच वर्षांत या सर्व बँकांनी किमान शिल्लक आणि एटीएमचा अतिवापर या दोनच दंडांपोटी तब्बल ३५ हजार कोटी रुपये वसूल केले आहेत. ही आकडेवारी सरकारी ११-१२ बँकांचीच आहे. याशिवाय एचडीएफ, आयडीबीआय, अशा मोठ्या बँकांचे नियमही तसेच मोठे आणि महागडे आहेत. सध्या तर जगातील एक मोठी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एचडीएफसी बँकेत तर म्हणे १० हजार रुपये शिल्लक ठेवावे लागतात. ती कमी झाली की दंडही आपोआपच संगणकीय पद्धतीने ठोकला जातो.

एटीएमचा अतिवापर एकवेळ समजू शकतो, पण किमान शिलकीवर दंड हा तर अयोग्य, अन्याय्य आणि बेकायदेशीरच आहे. या बँका विविध प्रकारच्या ७० ते ८० सेवांच्या नावावर पैसे वसूल करतात. त्यावर जीएसटीसारखा १८ टक्के करही खातेदारच देतो. यापैकी अनेक सेवा यापूर्वी विनाशुल्क होत्या. मग आताच ही वसुली कशासाठी, या प्रश्नाला कोणी विचारत नाही, की विचारल्यास कोणी उत्तर देत नाही. या सर्व सरकारी बँकांनी २०२३-२४ या वर्षात सुमारे १.५० लाख कोटींचा नफा कमावला आहे. १५ हजारांपेक्षा जास्त शाखा आणि २.५ लाखांवर कर्मचारी असलेल्या एकट्या स्टेट बँकेचा २०२३-२४ चा नफा ६७,०८५ कोटी रुपयांचा आहे. याशिवाय या साऱ्याच बँकांमध्ये असलेल्या कोणीच मायबाप दावा करत नसलेल्या रकमांचा तर हिशेबच नाही. असे असतानाही नकळतपणे, कधी कधी काहीही संबंध नसताना 'सायबर भामटे' सर्वसामान्यांच्या खात्यातून पैसे उडवतात तेव्हा या बँका काय करतात? काही नशीबवान आणि हुशार खातेदार सोडले तर अशा लुबाडल्या गेलेल्या खातेदारांकडे त्या दुर्लक्षच करतात. त्यांच्या तक्रारींची दखलच घेत नाहीत. कधी काही महिन्यांनी, पाठपुरावा केल्यास 'प्रतिसाद' देऊन तुमची तक्रार किंवा 'डिस्प्युट' आम्ही अमुक कारणासाठी नाकारल्याचे 'स्टिरिओटाईप' छापील उत्तर देऊन मोकळे होतात. उलटपक्षी, स्टेट बँकेने तर १ लाखापर्यंतची 'उडवली' गेलेली रक्कम त्या खातेदाराला प्राथमिक खातरजमा करून कोणत्याही 'डिस्प्युट'विनाच परत देऊन टाकायला हवी. कारण या स्टेट बँकेचा सर्वसाधारण वार्षिक नफा आहे, ५० हजार कोटींपेक्षा जास्त..! मग आहे की नाही बरोबर..?

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# दहशतवादाचे समूळ उच्चाटन आवश्यक

नुकताच काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर जिहादी इस्लामी आतंकवाद्यांनी गोळीबार केला व त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले. हा दहशतवाद पाकिस्तान पुरस्कृत आहे. पाकिस्तानच्या जन्मापासूनच त्याने भारताशी वैर मांडलेले आहे. त्यामुळे तो सातत्याने भारताला अस्थिर करण्यासाठी काही ना काही कारवाया करीत असतो. गेल्या अकरा वर्षांमध्ये मोदी सरकारच्या अस्तित्वामुळे तसेच ३७० कलम निष्प्रभ केल्यामुळे पाकिस्तानचा काश्मीरमधील उपद्रव खूपच कमी झालेला होता. परंतु मरणासन्न नागाने पुन्हा एकदा फणा काढून डंख मारावा तशा पद्धतीची ही आतंकवादी घटना घडलेली आहे. पाकिस्तान आमच्याशी १९४८, १९६५, १९७१, १९९९ हे चार युद्ध हरलेला आहे त्यामुळे त्याला या गोष्टीची जाणीव आहे की सरळ रणांगणावर आपण भारताशी युद्ध जिंकू शकत नाही. त्यामुळेच असे छुपे युद्ध आतंकवादाचा आश्रय घेऊन तो सातत्याने करीत असतो.

पूर्वी एक काळ असा होता की, ज्या काळामध्ये काश्मीर हे भारताचे अंग केवळ सैन्याच्या उपस्थितीमुळेच होते. तिथल्या प्रत्येक माणसाकडे तो आतंकवादी आहे की काय याच संशयाच्या नजरेने संपूर्ण जग बघत होते. तिथला तरुण हा भारतीय सैन्यावर दगडफेक करण्यासाठी ओळखला जात होता. तिथले नेते हे भारतविरोधी जहर ओकण्यासाठीच ओळखले जात होते.

३७० कलम निष्प्रभ होणे ही एक अशक्यप्राय गोष्ट आहे असे सर्व राजकीय पक्षांना वाटत होते. परंतु मोदी सरकारने सहा वर्षांपूर्वीच हे करून दाखविले. आणि त्यानंतर सर्वसामान्य भारतीय सुद्धा काश्मीरमध्ये जमीन विकत घेण्याच्या पात्रतेचा झाला. काश्मीरमध्ये पर्यटन उद्योग बहरला त्यामुळे सर्वसामान्य दगडफेक करणाऱ्या काश्मिरी तरुणाला सुद्धा काम मिळाले. जोपर्यंत काश्मीर केंद्रशासित होते तोपर्यंत सैन्याच्या हातामध्ये असल्यामुळे आतंकवादी आतमध्ये शिरकाव करू शकले नाही. भारतामध्ये विशेषत: हिंदू समाजामध्येच असे अनेक राजकीय पुढारी आहेत, वकील आहेत, कलाकार आहेत, ब्रिगेडी लोक आहेत, कम्युनिस्ट आहेत हे सर्वच नेहमीच मोदी सरकार आणि हिंदुत्व विचार करणाऱ्यांना आपले लक्ष्य करीत असतात. काश्मीरमध्ये सैन्याच्या गोळीने एखादा माणूस मारला गेला तरी सुद्धा मानवाधिकारचे किती उल्लंघन झाले असे छाती पिटून हे लोक रडत संपूर्ण जगाला सांगत असतात. सैन्यावर दगडफेक करणाऱ्या लोकांना जर रबराच्या गोळ्या मारल्या तरी सुद्धा त्या त्यांना जोरात लागतात व त्यामुळे



मानवाधिकाराचे उल्लंघन होते असे म्हणणारे लोक आहेत. यांच्या मते सैनिकाचा जीव हा जीव नाही आणि दगडफेक करणाऱ्याचा जीव हा जीव आहे. त्याला दिलेली शिक्षा ही मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. १९९० मध्ये तीन लाख काश्मिरी हिंदूंना काश्मीर सोडून भारतामध्ये पळ काढावा लागला, त्यांना निर्वासितांच्या छावण्यांमध्ये आपले जीवन काढावे लागले, ५०००० पेक्षा अधिक नागरिकांना, सैनिकांना आतंकवादामध्ये आपला जीव गमवावा लागलेला आहे. आताही हिंदू पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यानंतरही हे लोक काश्मिरातील कोणत्या ड्रायव्हरने कशी मदत केली, कोणी कोणाला कसे जेवू घातले या कथा सांगत आहेत. वास्तविकता ही आहे की आतंकवाद्यांनी प्रत्येकाला त्याचा धर्म विचारून, तो हिंदू आहे हे समजल्यानंतरच त्याला गोळी घातलेली आहे. काही लोक म्हणतात की हा द्वेष त्यांच्या मनामध्ये मोदीमुळेच निर्माण झालेला आहे. ही वैचारिक दिवाळखोरी आहे. हा मोदीद्वेष आहे. यापूर्वीही जेव्हा काश्मीरमध्ये काँग्रेसचे शासन असताना आतंकवादी हल्ले झाले त्यावेळेस हिंदुत्ववादी लोकांनी तर असे म्हटले नाही की मनमोहन सिंहमुळे हल्ले झालेले आहेत. मार्च २००० मध्ये छतीसिंगपुरा या अनंतनाग जवळील गावामध्ये आतंकवादी शिरले आणि त्यांनी ३५ शिखांची हत्या केली. आतंकवाद्यांच्या लक्ष्यावर नेहमीच हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी, ख्रिश्चन हे राहतात परंतु सर्वसामान्य मुसलमानांना त्यांनी कधीही मारलेले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे काश्मिरातील जनतेला आतंकवादी आणि पाकिस्तान हा संदेश देऊ इच्छितात की भारतापेक्षा आम्ही तुमच्या जवळचे आहोत. आम्ही तुमचे संरक्षक आहोत.

आजही हिंदू पर्यटकांची हत्या करण्यामागे आतंकवाद्यांचे आणि पाकिस्तानचे मनसुबे हेच आहेत. काश्मिरातील जनता आणि संपूर्ण देशातील जनता यांच्यामध्ये दरी निर्माण करणे हे त्यांचे प्रथम लक्ष्य आहे. भारत सरकार म्हणते की, काश्मीर हा भारताचा अभिन्न अंग आहे. परंतु पाकिस्तान काश्मिरातील जनतेलाच मानसिकदृष्ट्या भारतापासून तोडण्याचे प्रयत्न करीत आहे. देशामध्ये सुद्धा हिंदू-मुस्लिम अशा पद्धतीची दरी निर्माण करून देशाच्या विकासाला खीळ बसविण्याचे काम पाकिस्तान करीत आहे. ३७० कलम ज्या वेळेला निष्प्रभ करण्यात आले त्यावेळेला पाकिस्तानचा कितीतरी जळफळाट झाला होता. संपूर्ण जगाने सुद्धा याच्यावर चित्रविचित्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. तरीही पोलादी पुरुष नरेंद्र मोदी यांच्यामुळेच हे कार्य होऊ शकले. आताही देशातील जनतेला मोदी आणि अमित शाह यांच्याकडूनच अपेक्षा आहेत. देशातील लोकांच्या मनामध्ये या घटनेमुळे खूप मोठा राग आहे. त्या रागामधील एक पैलू हाही आहे की यापूर्वी काँग्रेसच्या काळामध्ये निरपराध हिंदूंना आपले प्राण गमवावे लागत होते. परंतु आता तर मोदी आणि शाह यांचे शासन आहे. या शासनामध्ये सुद्धा असे का व्हावे? परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की काश्मीरमधील आतंकवाद हा शे दोनशे लोकांचा आतंकवाद नाही तर हा पाकिस्तान पुरस्कृत म्हणजे एका देशाने पोसलेला आतंकवाद आहे.

काश्मीरमध्ये आजपर्यंत अनेक वेळा आतंकवादी हल्ले झालेले आहेत. परंतु यावेळेस पहिल्यांदा काश्मीरमधल्या मशिदींमध्ये सुद्धा मारल्या गेलेल्या हिंदू लोकांबद्दल प्रार्थना करण्यात आलेली आहे. शाळांमधून आणि मदरशांमधून सुद्धा मारले गेलेल्या लोकांबद्दल प्रार्थना करण्यात आलेली आहे. काश्मीरमध्ये विविध जिल्ह्यांमध्ये बंद पाळण्यात आलेला आहे आणि लोकांनी रस्त्यावर येऊन निदर्शने सुद्धा केलेली आहेत. मागच्या सहा वर्षांत काश्मिरातील जनतेला एक स्वतंत्रतेचा श्वास घेता आलेला आहे. त्यांना विकास आणि समृद्धी म्हणजे काय हे पाहता आलेले आहे. परंतु दुर्दैवाने पाकिस्तान या वेळेला यशस्वी झालेला आहे. मोदी आणि शाह हे पाकिस्तानला आणि आतंकवाद्यांना सोडणार नाही हे निश्चितच आहे. देशातील जनतेला याची प्रतीक्षा आहे. परंतु पाकिस्तानने हे लक्षात घेणे आवश्यक आहे की ''अबकी बार जंग छिडी तो नामो निशान नहीं होगा, काश्मीर तो होगा लेकिन पाकिस्तान नहीं होगा.''

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### धर्माच्या नावावर हिंसाचार खपवून घेणार नाही

कधी भारतातला एखादा प्रदेश मिळवण्यासाठी आतंकवाद होतो, तर कधी धर्माच्या नावाखाली आतंकवाद होतो. असामाजिक तत्त्व नवीन नवीन मुद्दे घेऊन हिंसा करायला पाहतात. अशा लोकांवर कठोर कारवाई व्हावी. जातपात, धर्म या नावावर हिंसा करून एकमेकांच्या धर्माविषयी तिरस्कार व तेढ निर्माण करायचा या असामाजिक तत्त्वांचा हा हेतू असू शकतो. मात्र आता सर्व धर्मीयांनी एक होऊन या घटनेचा निषेध करायला हवा आणि दाखवायला हवे की आता धर्माच्या नावावर भारतीय हिंसाचार सहन करणार नाही. भारतीयजनता प्रत्येक संकटात एकजुटीने लढते. ती धर्मनिरपेक्ष आहे हे दाखवून द्यायला हवे. कारण या देशातला प्रत्येक नागरिक कुठल्याही धर्माचा होण्याच्या आधी भारतीय आहे. आपण सारे एक होऊन हे दाखवून देण्याची आज काळाची गरज आहे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

### पाकिस्तानी नागरिकांना सीमेबाहेर काढा

काश्मीर अनेक वर्षांच्या शांततेनंतर पुन्हा अशांत झाला. स्थानिक अतिरेक्यांच्या मदतीशीवाय पहलगामचा हल्ला शक्य नाही हे समजलं. स्थानिक काही लोक अजूनही खातात इथे व गुण गातात पाकिस्तानचे असे आहेत. तेच खरे अतिरेकी आहेत. आता त्यांचा खात्मा करण्याचे धोरण केंद्र सरकारने आखले आहे. त्याचाच एक भाग म्हणून कूटनीती म्हणून भारतात व्हिसा घेऊन आलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी ताबडतोब देश सोडायचा आहे. असा आदेश आल्यावर पोलिस यंत्रणा, संबंधित खात्याचे अधिकारी जागे झाले व आपापल्या क्षेत्रात किती व्हिसाधारक पाकिस्तानी आहेत याचा शोध घेऊ लागले. नागपुरातही तसा शोध झाला आणि वृत्तपत्रात बातमी आली की जवळपास २४०० च्या वर पाकिस्तानी नागरिक नागपुरात आहेत. मुख्य म्हणजे त्यांचा प्रवेश हा आरोग्यसेवेसाठी, नागरिकांच्या आकस्मिक, नैमित्तिक भेटीसाठी झाला आहे. परंतु या मंडळींनी चक्क आपला व्यवसाय इथे टाकला आहे. आता त्यांना पाकिस्तानात जायची इच्छा नाही. आपल्या मुलाबाळांचे कसे होणार ही चिंता आहे. आपण भारतीय किती गाफील असतो नाही? पैसे खाऊन हेतुपुरस्पर दुर्लक्ष करणारे रक्षक, चाकरमाने इथे आहेत की नाही? आपल्या बाजूला नवीन धंदेवाला आला आहे त्याची माहिती बाजूच्या



दुकानदाराला नसते हे दुर्दैव आपलेच ना? स्थानिक आमदार, नगरसेवक, नेते त्यातील काही लोकांच्या मांडीला मांडी लावून ''और कैसे भाईजान'' म्हणणारे आहेत ना? एखाद्या दर्ग्याची जबाबदारी देता देता आपण त्यांना चक्क आयोगच देऊन टाकतो ना? दोन-तीनशेच्यावर मत तुम्हाला मिळत नसताना उगाच आरोग्य शिबिर आपण त्यांच्यासाठीच भरवतो ना? इतके सगळे घडल्यावरही त्यांच्याच दुकानातून आपण वस्तू खरेदी करतो ना? असे कितीतरी प्रश्न मांडता येतील. ज्या कारणासाठी व्हिसा दिला ते पूर्ण झाल्यावर आपल्या देशात न जाता इथे व्यवसाय करणे हे कसे चालू शकते. या निमित्ताने का होईना पोलिस विभाग, नेते मंडळी यांनी आता बिलकूल दयामाया दाखविण्याची गरज नाही. एकेकाला पकडून सीमेबाहेर करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### दहशतवाद्यांची नांगी ठेचा!

पहलगाम येथील हिंदू पर्यटकांच्या हत्येची निंदा करावी तेवढी कमी आहे. छत्रपती संभाजी महाराजांनी आपले प्राण दिले पण हिंदू धर्म बदलविला नाही. त्याचा द्वेष औरंग्याला आला आणि संभाजी राजांचा अमानुष छळ करून मारणारा औरंग्या इथेच शिवरायांच्या महाराष्ट्रात गाडला गेला. त्याच औरंग्याच्या औलादींनी हिंदू पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून मारले. आतंकवादी हे पाकिस्तानातील असल्याने निंदाजनक घटनेचा प्रतिशोध घेताना व्याप्त काश्मीर आता भारताने ताब्यात घेण्याची कारवाई केली पाहिजे. काश्मीर खोऱ्यात असलेली पाकिस्तानी मानसिकता तीव्रतेने भारताला अनुकूल होणे शक्य नाही. हिंदू पर्यटकांवर बेछूट गोळीबार करण्यात आला. तेथील पर्यटकांवर आपत्ती आली असता मदतीला धावून येणारी स्थानिक यंत्रणा उभी नव्हती. पर्यटकांच्या पैशावर डल्ला मारणारी टोळी उभी होती. हिंदूंना काफीर समजणाऱ्या कट्टरपंथीय लोकांचा फक्त काश्मीरमधील पर्यटकांच्या केवळ पैशावर डोळा आहे. मानवतेचे सोंग घेऊन काश्मीर खोरे मानवतावादी असल्याचा पुरोगामी आव आणला गेला आहे. अर्बन नक्षल्यांपासून सावध राहण्याची आवश्यकता आहे. आपण जिथे आहात तिथे आपला हिंदू धर्म संस्कृतीचा मानसन्मान करणाऱ्यांबरोबर त्यांच्या सोबत आपले आर्थिक व्यवहार करा. हेच आपले धर्मरक्षणाचे आजचे कार्य आहे.

पाकिस्तानला सिंधू नदीचे पाणी देणार नाही हा कणखर निर्णय भारताच्या नेतृत्वाने घेतला. कारण सिंधू नदीचे पाणी हिंदुस्थानचे आहे. हिंदुस्थानात अस्थिरता माजविणाऱ्यांना उपासमारीचे चटके बसल्यावर समजेल की आपण हिंदुस्थानच्या उपकारावर जगत आहोत. हिंदुस्थानच्या उपकाराची परतफेड पाकड्यांनी आतंक माजवण्यात केली. पाक समर्थित आतंकवादाने हजारो निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अशा विकृत जमातीची नांगी ठेचण्यासाठी विश्वातील देश भारतासोबत असल्याने भारत आता सिद्ध झाला आहे.

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

# शिरभावीत विक्रमी उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान

## माजी आमदार साळुंखे-पाटील यांनी बांधावरच केला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ एप्रिल-**

शिरभावी (ता.सांगोला) येथील प्रगतशील शेतकरी कांतीलाल फडतरे यांच्या आंब्याच्या बागेला तसेच धनाजी साळुंखे यांच्या मिरची प्लॉटला भेट देऊन माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या. दरम्यान विक्रमी उत्पादन घेतले म्हणून साळुंखे व फडतरे यांचा शेताच्या बांधावरच फेटा, शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी शिरभावीचे शहाजी नलवडे, सखुताई वाघमारे, कृषी सहाय्यक नलवडे, चंद्रकांत शिंदे, सत्यवान फडतरे, संभाजी खेंडकर, भाऊ पवार, अनिल ढोले, विलास नलवडे, पांडुरंग नलवडे, नवनाथ ताटे देशमुख, अर्जुन शिंदे, विष्णू घोरपडे, माऊली पालकर, आदिनाथ घोडके, नवनाथ मोरे, राजेंद्र ताटे देशमुख, अरविंद नलवडे, आप्पासाहेब नलवडे, घोरपडे सर, बाळासो शिंदे, संदीप चव्हाण, शिवाजी खेंडकर, शशिकांत हिलाळ, भाऊ शिंदे, सूर्यकांत जगदाळे, सुरेश साळुंखे, पोपट रणदिवे उपस्थित होते. माळरानावर आणि कमी पाण्यावर येथील बळीराजांनी मोठ्या कष्टाने शेती उत्पादनात आघाडी घेतली आहे. परंतु शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनापासून पात्र असूनही शेतकरी वंचित आहेत. यामधील त्रुटी दूर करण्यासाठी कृषी मंत्री व फलोत्पादन मंत्री यांच्यासमवेत तालुक्यातील शेतकऱ्यांची संयुक्त बैठक बोलावून फलोत्पादन विभागातील त्रुटी दूर करून येथील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे दिपकआबा साळुंखे पाटील यांनी यावेळी मनोगतात सांगितले. दरम्यान शेतीमालाला बाजारपेठ उपलब्ध होत नाही, यामध्ये दलाली करणारे व्यापारी आहेत त्यांच्याकडूनही नुकसान होत असून, शेतकऱ्यांच्या चांगल्या दर्जाच्या शेतीमालाला व्यापारपेठ मिळावी यासह सांगोल्यात पिकणाऱ्या वेगवेगळ्या फळ पिकाला शासनाचे अनुदान मिळावे अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.



धनाजी साळुंखे यांनी २५ गुंठ्यामध्ये मिरची पिकाची लागवड केली आहे. आत्ता बहार सुरू झाला असून सध्या ९ टन मिरची विक्री केली आहे. या पुढील काळात १५ ते १६ टन मिरची उत्पादन होईल असे एकंदरीत २५ टन मिरची विक्री होईल असा अंदाज साळुंखे यांनी वर्तवला आहे. तसेच कांतीलाल फडतरे यांनी माळावरची दगडाची जमीन फोडून सुपीक करून त्यामध्ये १३ एकर आंब्याची बाग लागवड केली आहे. सदरची बाग ही कोकण प्रमाणे फुलली आहे. सर्वसाधारण एकरी ५ लाख रुपये उत्पन्न घेत असल्याची माहिती फडतरे यांनी दिली.

## महत्वाचे...

### श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या लेखा परीक्षण कामाची झाली सुरूवात

**पंढरपूर, दि.२७ एप्रिल -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कामकाज पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ मधील तरतुदीनुसार चालवण्यात येते. या अधिनियम ातील तरतुदीनुसार प्रतिवर्षी शासन नियुक्त लेखापरीक्षकामार्फत लेखा परीक्षण करण्यात येते. त्याचा अहवाल शासनास व धर्मादाय आयुक्त यांना सादर करण्यात येतो. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणाचे कामकाज शासन नियुक्त लेखा परीक्षक यांच्यामार्फत सुरू झाले आहे. लेखापरीक्षणा दरम्यान काही मार्गदर्शक सूचना व सुधारणा सुचित केल्या होत्या. त्याची देखील पूर्तता करण्यात आली आहे. संबंधित लेखा परीक्षक यांच्याकडून अंतिम अहवाल मंदिर समितीस प्राप्त झालेला नाही. संबंधित लेखा परीक्षक यांच्याकडून लेखापरीक्षणाचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर, मंदिर समितीच्या सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात येईल. तदनंतर अधिनियमातील तरतुदीनुसार धर्मादाय आयुक्त मुंबई यांचे निदेश घेऊन व त्याचा अनुपालन अहवाल तयार करून शासनास सादर करण्यात येतो व शासनामार्फत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

### वखारिया विद्यालयाचे स्कॉलरशीप परीक्षेतील दैदीप्यमान यश

**बार्शी, दि. २७ एप्रिल-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयाने ५ वी व ८ वीचे स्कॉलरशिप परीक्षेत एकूण १० विद्यार्थी पात्र ठरल्याने यशाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता ५ वीचा सिद्धेश लंगोटे १५८ गुण मिळवून तर इयत्ता ८ वी मधील चि.आर्यन सचिन बुरगुटे २३४, अलीम रसूल सय्यद १९८, साईराज बुरगुटे १८६, निर्भय दत्तात्रय तंडे १६४, अर्पिता तांबारे १६४, करण माळी १५६, अक्षरा शिरगिरे १५२, गौरी ढेंगळे १४६, आसावरी काळे १४४ गुण मिळवून पात्र झाले आहेत. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शालेय समितीचे चेअरमन प्रकाश बुरगुटे, संचालक मंडळ, विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पालक आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



### भगवंत अभियांत्रिकीमध्ये बीसीए प्रवेश परीक्षा कार्यशाळा

**बार्शी, दि. २७ एप्रिल-**

जेएसपीएम पुणे संचलित बार्शी येथील भगवंत अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संकुल प्रमुख ऋतुराज सावंत यांच्या म ार्गदर्शनाखाली बीसीए प्रवेश परीक्षा करीता मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमासाठी विविध संबंधित विषयातील तज्ञ् मार्गदर्शक उपस्थित होते व विद्यर्थ्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. उद्घाटनाप्रसंगी तज्ञ म्हणून लाभलेले अजित कोळी, शिवाजी खराडे, गजानन वाघमारे, प्राचार्य डॉ. रणजित शिराळ, प्रा. अर्चना आवटे, प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा.शुभम गीते, टीपीओ अभेद चोपडे उपस्थित होते.

# नैसर्गिक वादळाने मंगळवेढा पोलीस स्टेशन इमारतीवरील उडाले पत्रे

## या घटनेत एक पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२७ एप्रिल-**

मंगळवेढा शहरात शनिवारी रात्री अचानक आलेल्या वादळामुळे मंगळवेढा पोलीस ठाण्यातील दुसऱ्या मजल्यावरील जवळपास २५ पत्रे अचानक उडून गायब झाले आहेत. दरम्यान पावसाचे पाणी सदर खोल्यामध्ये आल्याने संगणक, लॅपटॉप व कागदपत्रांचे मोठे नुकसान झाल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले.

शनिवारी रात्री ८ वाजता अचानक शहरात मोठ्या प्रमाणात अक्राळविक्राळ रुप धारण करीत वादळ सुटले. या वादळाने पोलीस स्टेशनच्या दुसऱ्या मजल्यावरील पाच ते सहा खोल्यावरील २५ पत्रे वाऱ्याने अन्यत्र उडून गेलेले आहेत. त्यापैकी केवळ पाच पत्रे पोलीस स्टेशन आवारात उभ्या केलेल्या वाहनांच्या आडोशाला मिळून आले. अन्यत्र पत्रे बेपत्ता असल्याचे सांगण्यात आले. अक्राळविक्राळ वादळामुळे उडालेल्या पत्र्यात एक पोलीस कर्मचारी निंबाळकर हे किरकोळ जखमी झाले आहेत.



त्यांच्या अंगावर भिंतीचा दगड पडल्याने पाठीला मार लागला असल्याचे सांगण्यात आले. ते एका बेपत्ता महिलेचा जबाब घेण्याची प्रक्रीया सुरु असताना ही दुर्दैवी घटना घडली. नुकसानीचा आकडा मिळू शकला नाही. त्यामुळे निश्चित नुकसान किती झाले हे समजू शकले नाही. येथेच महिला समुपदेशन केंद्र चालत असल्याने पत्रे उडाल्यामुळे सदर महिलांची बसण्याची पंचाईत निसर्गाने केली आहे. मुळात पोलीस स्टेशन मध्ये जागा अपुरी असल्यामुळे दुसऱ्या मजल्यावर पोलीस कर्मचाऱ्यांना काम करता यावे या उद्देशाने हे बांधकाम करण्यात आले होते.

# दुधनी रेल्वे गेटजवळ अज्ञात व्यक्तीचा अज्ञात कारणावरून मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ एप्रिल**

अक्कलकोट गाणगापूर रस्त्यावरील दुधनी रेल्वे गेट जवळ रविवारी सकाळी सात ते आठ दरम्यान एक अनोळखी पुरुष जातीचा अंदाजे ३० ते ३५ वर्षाचा व्यक्ती धडक बसून मयत झाला की चालत्या रेल्वेतून पडून मयत झाला आहे. यामुळे घात पातची शक्यता वर्तली जात आहे.या बाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस अधिक तपास करीत आहेत.

या बाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला आहे. सदर मयत अनोळखी पुरुष जातीचा वय ३० ते ३५ वर्ष असून त्यास कोणत्या तरी अज्ञात रेल्वेच्या धडकेत त्याचा मृत्यू झाला असावा अथवा चालत्या रेल्वे मधून पडून मयत झाला असावा अथवा चालत्या रेल्वेतून अन्य अज्ञातांनी ढकलल्यामुळे मयत झाला असावा. याबाबत पोलीस कसून तपासणी करीत आहेत.

मयताचे अंगावरील कपडेवर मारवाडी युवक संघटना असे असल्याने सदर मयत हा हैद्राबाद येथील असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सदर इसम हा कोणाच्या ओळखीचा असल्यास अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशन येथे सपोनि साईनाथ सुरवसे यांचा मोबाईल क्र.९७६६१०५३६६ तसेच श्री. पाटील यांचा मोबाईल क्र. ८३७८८२८८०३ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भावी पत्नीचा विनयभंग; तरूणासह पाच जणांविरूद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२७ एप्रिल**

एका २८ वर्षीय तरूणीस आपले लग्न होणार असल्याचे सांगून एकवीरा माळावरील एका हॉटेलमध्ये नेत तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य करून बदनामी केल्याप्रकरणी सज्जनराव वाघमारे, सुजाता सज्जनराव वाघमारे, राहुल सज्जनराव वाघमारे, प्रविण सज्जनराव वाघमारे, संगीता शिराळे (सर्व रा.धामणगाव ता.बार्शी) आदि पाच जणाविरूद्ध मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्रानुसार यातील पिडीत २८ वर्षीय तरूणी एका हॉस्पिटलमध्ये सिस्टर असून तिचे लग्न आरोपी संगीता शिराळे यांच्या मध्यस्थीने राहुल वाघमारे (रा.धामणगाव ता.बार्शी) यांच्याशी जमवले होते. दि.२ फेब्रुवारी रोजी साखरपुडाही झाला. मार्च २०२५ मध्ये लग्नाची तारीखही ठरवली. साखरपुडयात नवरदेवाला एक तोळा अंगठी व पाहुण्यांना कपडयाचा आहेरही घेतला. दि.१६ फेब्रुवारी रोजी दुपारी २.३० वाजता आरोपी राहुल याने मंगळवेढयात येवून आज व्हॅलेंटाईन डे असल्याने साजरा करूया म्हणत एकवीरा मंदिराचे गार्डनमध्ये बोलावून घेतले. आता आपला साखरपुडा झाला असून भविष्यात आपले लग्न होणार आहे अर्थात आपण नवरा बायको होणार आहोत असे म्हणून पिडीत २८ वर्षीय मुलीला शरीराशी झोंबाझोंबी करून मिठी मारली. त्यावेळी मुलीने नकार देत आपले अजून लग्न झालेले नाही त्यामुळे असे वागणे चुकीचे आहे असे सांगत असतानाही जबरदस्तीने आरोपीने तरूणीस लज्जा उत्पन्न झाली. दि.२७ फेब्रुवारी रोजी १.४५ वाजता त्याने मंगळवेढयात येवून फिर्यादीस कांतारा हॉटेलमध्ये जेवायला घेवून गेला. त्यावेळेसही काही दिवसात आपले लग्न होणार आहे त्यात काय एवढे? असे म्हणत लज्जा वाटेल असे कृत्य केले. घटनेच्या पंधरा दिवसानंतर पिडीतेच्या वडीलांनी वाघमारे कुटुंबियांना फोन करून लग्नाची तारीख ठरवण्याबाबत विचारले असता थोडे दिवस थांबा, नंतर सांगतो असे सांगितले. त्यावेळी मुलाच्या आईने पिडीतेच्या कुटुंबियाना सांगितले की साखरपुडा झाल्यानंतर माझी आई आजारी पडली, त्यातच ती वारली. तुमच्या मुलीच्या वाईट पायगुणामुळे वारली असल्याचा आरोप केला. मुलगी साखरपुडयात लंगडत चालत होती. ती आम्हाला पसंत नाही. बाहेर नोकरी करणाऱ्या मुली चांगल्या नसतात. त्या चारित्र्यहीन व लफडेबाज असतात. त्यामुळे माझ्या मुलाचे लग्न तुमच्या मुलीशी कधीच करणार नसल्याचे त्यांनी सांगितले असल्याचे पिडीतेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची फिर्याद दि.२५ एप्रिल रोजी मंगळवेढा पोलिसात दाखल झाली असून याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

# सोनारी येथे ओन्ली समाज संस्थेकडून मोफत पाणी वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२७ एप्रिल-**

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी यांच्यावतीने श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त महाराष्ट्रातून सोनारी नगरीत येणाऱ्या भाविक भक्ताला ४०० जार पाणी मोफत वाटप करण्यात आले. अतिशय भक्ती भावान कडक उनात लहान बाळांना घेऊन सोनारी नगरीत येऊन भैरवनाथाचे दर्शन घेऊन तहानलेल्या घशाला ओन्ली समाज सेवा बहुउद्देशीय संस्थेकडून ठेवण्यात आलेल्या मोफत पाणी वाटप या ठिकाणी येऊन पाणी पिऊन व भरुन घेऊन जात असताना त्यांच्या चेहऱ्यावर रखरखत्या उन्हात देखील आनंदाचे भाव दिसत होते व मुक्त कंठाने या पाणी वाटप उपक्रमास आशीर्वाद देत होते. गेली दोन वर्ष संस्थेकडून पाणी वाटप करण्यात येत आहे. पाणी वाटप करताना संस्थेतील पदाधिकारी, सदस्य, महिला सदस्य अत्यंत विनम्रपणाने भाविकांशी संवाद साधत पाणी वाटप करतात. अध्यक्ष राहुल वाणी यांनी केलेल्या आव्हानानुसार बार्शी शहरातील मित्र परिवार, व्यापारी, शिक्षक, संस्थेतील सदस्यांनी निधी उपलब्ध करुन दिला त्यांच्या या सहकार्यामुळेच सोनारी येथे भाविक भक्तांना मोफत पाणी वाटप करण्यात आले.



हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष राहुल वाणी, संतोष शेळगावकर, नागनाथ सोनवणे, माणकोजी ताकभाते, अजय तिवारी, अतुल वाणी, सुरेंद्र स्वामी, सायरा मुल्ला, सारीका जाधवर, रागिनी झेंडे, त्रिशाला मिसाळ, रेखा सरवदे, कु. रितेशा झेंडे, सुनील नवले, विजय येवारे, गणेश सातारकर, अमोल जाधव, पिंटू मस्के, अण्णा जाधव, धीरज परदेशी, श्रीमंत चव्हाण, अम ोल शिंदे, सतीश कोळी हे उपस्थित राहून मोलाचे सहकार्य करणारे सोनारी गावचे समाजसेवक नितीन गाढवे, ईश्वर सोनवणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### सांगोल्यात पशुवैद्यक दिनानिमीत्त डॉ. गाढवे यांचे मार्गदर्शन

**सांगोला,दि.२७ एप्रिल-**

२६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात जागतिक पशुवैद्यक दिन म्हणून साजरा केला जातो. सगळ्या पशुंचे मानव जातीवर अनंत उपकार आहेत. मानव जातीचे आरोग्य सुखकर व निरामय रहावे यासाठी संशोधन केले जाते. नवनवीन लस शोधली जाते. मात्र त्या लशीचे लसीकरण सर्वप्रथम पशूवर केले जाते. त्यानंतर ती लस मानवासाठी वापरली जाते अशी माहिती सांगोल्यातील डॉ.सोमेश्वर गाढवे यांनी दिली. यावेळी चैतन्य हास्य क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### संगिता गायकवाड



**अकलूज, दि. २७ एप्रिल-**

यशवंतनगर येथील संगीता ज्ञानदेव गायकवाड यांचे शनिवार, दि. २६ रोजी वयाच्या ६१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. शंकर नगर येथील सोहम् हॉस्पिटल चे डॉ. सौरभ गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पती ज्ञानदेव गायकवाड, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परीवार आहे.

### सुलभा लोंढे



**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

दोंदेनगर शिक्षक सोसायटी येथील सेवानिवृत्त शिक्षिका सुलभा यल्लप्पा लोंढे यांचे शनिवार दि. २६ एप्रिल रोजी अल्पशः आजाराने वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक नात सून व नातवंडे असा परिवार आहे.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दीतील न्यु पाच्छापेठ येथील म्यु. पल घर नं. ८७७, टी पी स्कीम नं.१, सिटी सर्व्हे नं. १०३८९अ/३३+३४/ब, फा. प्लॉट नं.३५ याचे एकुण क्षेत्र ३९८.३ चौ. मीटर यावरील गुत्तीकोंडा कॉम्प्लेक्स या ओनरशीप कॉम्प्लेक्स मधील पहिल्या मजल्यावरील ओनरशिप फ्लॅट नं.१ (1BHK) याचे कारपेट क्षेत्र ३८.३१ चौ. मीटर व एकुण बिल्ट-अप क्षेत्र ६०.३६ चौ. मीटर इतके आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- ओपन स्पेस, दक्षिणेस : फ्लॅट नं.२, पश्चिमेस : पॅसेज व फ्लॅट नं. ४, उत्तरेस :-रस्ता. येणेप्रमाणे चतुःसीमेतील सदनिका /फ्लॅट त्यातील तदंगभुत वस्तूंसह, सोयी सुविधांसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

सदरहु मिळकत श्री. संजय शरद गणेश रा.ए-१०१, मोरेश्वर धाम. प्लॉट नं.३, सेक्टर नं. १९, कामोठे, नवी मुंबई, यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत त्यावरील आय डी बी आय बँक, सोलापूर यांचा कर्जबोजा वगळता निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे, तरीही वर नमूद प्लॉट जागेच्या संदर्भात इतर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. २७/०४/२०२५

सही/-
ॲड. राजरतन द. श्रीराम
ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६
अशिल- १. आर. आर. कांबळे,
२. आर.सी. कांबळे यांचे तर्फे


# तंत्रज्ञानासह व्यवहाराभिमुख शिक्षणावर भर द्या : कोथावदे

## ‘कर्मयोगी’त राज्य तंत्रपरिषद; ७५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ एप्रिल-**

अभियांत्रिकीचे ज्ञान व बदलते तंत्रज्ञान यांची सांगड घालून समाजातील वास्तविक प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यवहाराभिमुख शिक्षणावर भर देण्याचे आवाहन टाटा कन्सल्टन्सीचे अधिकारी दिनेश कोथावदे यांनी केले.

शेळवे (ता.पंढरपूर) येथील कर्मयोगी इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजीमध्ये आयोजीत कर्माटेक २०२५ या राज्यस्तरीय तंत्र परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील, पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, प्रबंधक जी.डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, संयोजक डॉ अभय उत्पात, सहसंयोजक प्रा. दीपक भोसले, अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. व्ही. एकलारकर, डॉ. एस. एम. लंबे, प्रा. अनिल बाबर तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते. संयोजक डॉ. उत्पात यांनी प्रस्तावनेतून तंत्रपरिषदेचा उद्देश सांगितला. विश्वस्त श्री. परिचारक यांनी अभियांत्रिकी ज्ञानाचा वापर हा समाजाभिमुख कामांसाठी तसेच नवीन तंत्रज्ञानाद्वारे चांगल्या कामासाठी करावा असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांचा टेक्निकल स्पर्धेमध्ये सहभाग शिक्षण व इंडस्ट्री यातील दुवा आहे असे सांगितले. या परिषदेमध्ये टेक्निकल प्रेझेंटेशन, आयडिया प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, ब्रिज मोडेल मेकिंग, इलेक्ट्रॉनिक्स क्वीज, प्रोजेक्ट एक्सिबीशन, सी हंट, ग्रीन बिल्डिंग, सर्किट सुडोकू अशा विविध राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी राज्यातील सुमारे ७५० हून अधिक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांना सुमारे पन्नास हजाराहून अधिक रुपयांची बक्षिसे प्रदान करण्यात आली. रियाज नदाफ व भाग्यश्री बोरगी यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. जे. एल. मुडेगावकर यांनी आभार मानले.




**स्पर्धेतील विजेते :** मेकॅनिकल विभाग : आयडिया प्रेझेंटेशन - विजेता: प्राजक्ता पोळ आणि स्वरूप आराध्ये (ऑर्चिड कॉलेज सोलापूर), उपविजेता : राकेश सुतार आणि चंद्रशेखर विजापुरे (स्वेरी कॉलेज पंढरपूर). प्रोजेक्ट एक्जीबिशन - विजेता : संग्राम आसबे आणि ग्रुप (कर्मयोगी पॉलिटेक्निक शेळवे), उपविजेता : रोहित पवार आणि ग्रुप (स्वेरी कॉलेज पंढरपूर). पोस्टर प्रेसेंटेशन - विजेते : गायत्री कटके आणि ग्रुप (सिद्धेश्वर वुमन्स कॉलेज सोलापूर), उपविजेते : ईशा राठोड आणि ग्रुप (सिद्धेश्वर वुमन्स कॉलेज सोलापूर). सिव्हिल विभाग : ब्रिज मॉडेल मेकिंग - विजेते : माधुरी पांढरे आणि ग्रुप (कर्मयोगी इन्स्टिट्यूट शेळवे), उपविजेते : महेंद्र पोटाबत्ती आणि ग्रुप (ऑर्चिड कॉलेज सोलापूर). प्रोजेक्ट एक्जीबिशन - अथर्व रोकडे (कर्मयोगी इन्स्टिट्यूट शेळवे), उपविजेते : नेहा पाटील (कर्मयोगी शेळवे). ग्रीन बिल्डिंग - विजेते : महेश घोडके आणि ग्रुप (कर्मयोगी शेळवे), उपविजेता : वैभवी कुंभारे आणि ग्रुप (ऑर्चिड कॉलेज सोलापूर). इ.अँड टी.सी. : इलेक्ट्रॉनिक्स क्विझ - विजेते : सुभाष बिडारी (ए.जी. पाटील कॉलेज सोलापूर), उपविजेते : सुरज पोगुल (सिंहगड कॉलेज सोलापूर). प्रोजेक्ट एक्झिबिशन - विजेते : स्वरूप आराध्ये आणि ग्रुप (सिंहगड कॉलेज सोलापूर),उपविजेते : केसकर पुष्पांजली आणि ग्रुप (कर्मयोगी शेळवे). सर्किट सुडोकू - विजेते : सुरज पोगुल (सिंहगड कॉलेज सोलापूर), उपविजेते : रोहित कुंभार आणि ग्रुप (कर्मयोगी शेळवे). कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग : प्रोजेक्ट एक्जीबिशन- विजेते : मन्मित माने आणि ग्रुप (ऑर्चिड कॉलेज सोलापूर), उपविजेते : कार्तिकेय बेलमकर आणि ग्रुप (ऑर्चिड कॉलेज सोलापूर). टेक्निकल प्रेझेंटेशन - विजेते : प्रतीक मोहंती आणि ग्रुप (ऑर्चिड कॉलेज सोलापूर), उपविजेते : शालगर स्वयम (ऑर्चिड कॉलेज सोलापूर). सि हंट स्पर्धा - विजेते : अक्षय कोकरे (कर्मयोगी शेळवे), उपविजेते : प्रथमेश माने (कर्मयोगी शेळवे).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# छत्रपती संभाजीनगरचे साई सेवा क्रीडा मंडळ उपांत्य फेरीत

### क्रीडा भारतीची पुरुष गट राज्य निमंत्रित कबड्डी स्पर्धा

**सोलापूर, दि. २७ एप्रिल -**

छत्रपती संभाजीनगरच्या साई सेवा क्रीडा मंडळासह प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्ट्स क्लब पुणे, मिडलाईन स्पोर्ट्स क्लब मुंबई व जय हिंद क्रीडा मंडळ श्रीरामपूर या संघाने राज्य निमंत्रित कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

क्रीडा भारती, छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ व भारतीय मजदूर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा शिंदे चौक येथील शिवस्मारक मैदानावर सुरू आहे. रविवारी सकाळी उपांत्यपूर्व फेरीतील साई सेवा क्रीडा मंडळ छत्रपती संभाजीनगर विरुद्ध स्वराज्य क्रीडा मंडळ भूम हा सामना अत्यंत चुरशीचा झाला. मध्यंतरापर्यंत १३-१३ आणि निर्धारित वेळेत २०-२० अशा बरोबरीनंतर प्रत्येकी पाच चढाईमध्ये छत्रपती संभाजीनगरने ६-५ अशी एका गुणाने बाजी मारली. प्रत्येकी पाच चढाईमध्ये छत्रपती संभाजीनगरने प्रत्येक चढाईत गुण वसूल केले. भूम संघास मात्र, दोन बोनस गुण व व तीन गुण असे पाच गुण मिळाले. संभाजीनगरकडून गणेश चव्हाण, आदेश, समाधान, राहुल व नकुल यांनी गुण नोंदवले. भूमकडून फैज मुगल,निलेश वरे, रोहन कैकान, सुरक्षा मुळे व अनिकेत भारती यांचे प्रयत्न अपुरे पडले. अन्य उपांत्यपूर्व सामन्यात पुण्याच्या प्रकाश तात्या बालवडकर स्पोर्ट्स क्लबने सोलापूरच्या श्रीराम स्पोर्ट्स क्लबवर ५५-२७ असा ३२ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. मिडलाईन स्पोर्ट्स क्लब मुंबईने पुण्याच्या नवजीवन कबड्डी संघावर ४३-१८ शानदार विजय मिळविला. जय हिंद क्रीडा मंडळ श्रीरामपूरने शिवम क्रीडा मंडळ पैठणला ४०-२३ असे नमविले.


**सोलापूर : बालवडकर क्लब पुण्याच्या चढाईपटूची पकड करताना सोलापूरचे खेळाडू.**

#### सोलापूरच्या संघांची अनास्था

या स्पर्धेत राज्यातील १४ व सोलापुरातील सहा संघांना प्रवेश दिला होता. पैकी विघ्नहर्ता स्पोर्ट्स क्लब, स्वराज्य स्पोर्ट्स क्लब, श्रीराम स्पोर्ट्स क्लब व श्रीकृष्ण स्पोर्ट्स क्लब हे संघ सहभागी होते. परंतु शंभुराजे कुमठे व अंजुमन क्रीडा मंडळ हे संघ अनुपस्थित होते. पैकी श्रीराम स्पोर्ट्स क्लबने बाद फेरीत प्रवेश केला होता.

# पुष्प अकादमीने साऊथ सोलापूरला नमविले

### रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : राठोड सामनावीर

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत पुष्प जिमखाना क्रिकेट अकादमीने साऊथ सोलापूर आपटे ग्रुप ब संघाचा १ गडी राखून पराभव केला.

येथील रेल्वेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या साऊथ सोलापूरचा डाव ११७ धावांत आटोपला. विययी ११८ धावांचे लक्ष्य पुष्पने ९ गडी गमावित गाठले. अष्टपैलू कामगिरी करणारा मयूर राठोड (नाबाद २० व ३ बळी) सामन्याचा मानकरी ठरला. त्यास प्रवीण देशेट्टी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून सचिन गायकवाड व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले

**संक्षिप्त धावफलक :** साऊथ सोलापूर आपटे ग्रुप (ब): २८.५ षटकांत सर्व बाद ११७ (आमीर शेख ४५, चरण डिकोंडा १२, मोहम्मद जलाल ११ धावा, मयूर राठोड व रोहित बिराजदार ३ बळी,




अभिजित सिंग २ बळी, सत्यजित गवळी १ बळी) पराभूत विरुद्ध पुष्प जिमखाना क्रिकेट अकॅडमी : २७.५ षटकांत ९ बाद ११८ (अभिजित सिंग २२, मयूर राठोड नाबाद २०, जगदीश जाधव १८ धावा, जय गुंड ३ बळी, आमीर शेख व सुहान माकानदार २ बळी.

**आजचा सामना :-** मॉडेल क्रिकेट अकॅडमी (ब) विरुद्ध बिजापूर सी सी

# विद्यापीठाचा महिला सॉफ्टबॉल संघ नेल्लोरला रवाना



**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठाचा सॉफ्टबॉल महिला संघाचे सराव शिबिर श्री सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर घेण्यात आले. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धाचे आयोजन विक्रम युनिव्हर्सिटी नेल्लोर (आंध्र प्रदेश) येथे होणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी विद्यापीठ संघ जाहीर करण्यात आला आहे. या संघास प्रा. विजय तरंगे आणि प्रा. संतोष गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. या संघास विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, क्रीडा संचालक आणि प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, मागास समाज सेवा मंडळाचे उपाध्यक्ष विवेक सुभाष चव्हाण,सैनिक स्कूलचे प्राचार्य रवी चव्हाण आणि सुरज जाधव यांनी शुभेच्छा दिल्या

**संघ :** श्वेता येरगुंटला, दिपाली स्वामी, जगदेवी पणशेट्टी (सर्व वालचंद कॉलेज) प्राची कापसे, वैष्णवी जत्ती, लावण्य आडम (डीएव्ही वेलणकर कॉमर्स) गायत्री काळे, वैष्णवी कानडे (एमआयटी इंजीनियरिंग, बार्शी) समीक्षा मुंडे, (माऊली, वडाळा) माहेश्वरी लोखंडे (संगमेश्वर कॉलेज), आरती आगाशे (लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय) संध्या जाधव (श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी) भाग्यश्री शरणार्थी (वसुंधरा कला महाविद्यालय सोलापूर).

# सिंथेटिक ट्रॅकसाठी वाढीव निधी द्या

### क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची पालकमंत्री गोरे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील नियोजत सिंथेटिक ट्रॅकसाठी वाढीव तीन कोटीचा निधी मंजूर करा आणि व्यायाशाळा व क्रीडांगण विकासासाठी मागील दोन वर्षाचे अनुदान द्या, अशी मागणी सोलापूर शहर-जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना केली आहे. तसे निवेदन पालकमंत्री श्री गोरे



यांना जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव यांनी दिले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महासंघाच्या महिला जिल्हाध्यक्ष प्रा. सुवर्णा कांबळे, जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी, शहर सचिव प्रा. प्रमोद चुंगे, खजिनदार डॉ. उज्वल मलजी, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहसचिव जयंत मोरे, सौ पेठे, राष्ट्रीय खेळाडू विनोद भैरगुंडे आदी उपस्थित होते

# शालेय राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत जोशी हायस्कूल करकंबचा धायगुडे अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २७ एप्रिल-**

छत्रसाल स्टेडियम मॉडेल टाउन दिल्ली येथे झालेल्या ६८व्या शालेय राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत १७ वर्षाखालील ६५ किलो वजन गटांमध्ये रामभाऊ जोशी हायस्कूल करकंबचा विद्यार्थी पैलवान पवन बालाजी धायगुडे याने संपूर्ण भारतामध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

पहिल्या सामन्यात त्याने छत्तीसगडचा पैलवान दिवाकर यांच्यासोबत एकतर्फी विजय, दुसऱ्या सामन्यात आंध्र प्रदेशचा पैलवान जपपल्ली या पैलवानाविरुद्ध १०-० असे गुण प्राप्त करून विजय मिळवला.सेमी फायनलमध्ये अत्यंत अटीतटीची स्पर्धा झाली.दिल्लीचा पैलवान प्रिन्स याच्यासोबत ९-४ या गुणांनी पवनने विजय मिळवला व अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामन्यापूर्वी पवनच्या उजव्या हाताला दुखापत झाली असताना सुद्धा अंतिम सामन्यात उत्तर प्रदेशचा पैलवान मोनू याला चित करून अंतिम सामन्यात यश मिळवले. मागील एक महिन्यापूर्वी पवनचा अपघात झाला होता.त्यातून स्वतःला सावरत त्याने हे यश प्राप्त केले.या यशामध्ये पवनचे वडील बालाजी (राजू) धायगुडे यांचा



वाटा आहे. पैलवान पवन हा अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. या यशायाबद्दल पैलवान पवनचे दयानंद शिक्षण संस्था नवी दिल्ली अध्यक्ष पद्मश्री पूनम सूरी,सोलापूरचे स्थानीय सचिव महेशजी चोप्रा, प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे, मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे आदींनी अभिनंदन केले.

# सोलापूरच्या 'रागिणी महाराष्ट्र'ची विजयी सलामी

## उत्तरप्रदेशचा ६ गडी राखून पराभव



### महिलांची निमंत्रित क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर :** उडपी येथे सुरू झालेल्या महिलांच्या निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत रागिनी महाराष्ट्राने उत्तरप्रदेशचा सहा गडी राखून पराभव करीत विजयी सलामी दिली. त्यांचा दुसरा सामना सोमवारी कर्नाटका अर्बन संघाबरोबर होईल.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना उतर प्रदेशने ५ बाद १३० धावा केल्या. रागिणी क्लबकडून कर्णधार मयुरी कदम हिने चार व हरणीने एक गडी बाद केला. विजयी १३१ धावांचे लक्ष्य रागिनीने ४ गडी गमावित गाठले. यात श्रेया रापेल्लीने (६३) शानदार अर्धशतक झळकाविले. साक्षी लामकाने २२ व सिंचन्ना कृष्णा हिने १६ करीत संघाच्या विजयात साथ दिली.

**रागिणी महाराष्ट्र संघ असा :** मयुरी कदम (कर्णधार), श्रेया रापेल्ली, साक्षी लामकाने, वृक्षाली पवार, अक्षता सावंत, श्रुति चन्ना (सर्व सोलापूर), अपुर्वा रोकडे, कविता, सिंचन्ना कृष्णा, अनु, हरिनी, लावण्या. संघ व्यवस्थापक - मल्लिनाथ याळगी

# दलितमित्र कदम गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त १ मेपासून कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२७ एप्रिल-**

येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दलितमित्र स्व. कदम गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि.१ ते ४ मे या काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुजीत कदम यांनी दिली.



गुरुवार दि.१ मे रोजी दुपारी ४.३० वा. पुतळयाचे पूजन व सर्व शाखांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण,अमृत महोत्सव लोगो अनावरण कार्यक्रम आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड, उद्योगपती पवनभैय्या महाडिक, लतिफ तांबोळी, अजीत जगताप, प्रदिप खांडेकर, ॲड.सुजीत कदम, डॉ.सुभाष कदम आदींच्या उपस्थितीत होईल. सायंकाळी ६.३० वा. शिवशंभो महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त चंदाताई तिवाडी यांचे भारूड होईल. शुक्रवार दि.२ मे रोजी मंगळवेढा मायनिंग प्रा.लि. कार्यालयाचे उदघाटन व डॉ.माणिकराव साळुंखे यांच्या विज्ञान दिवस भाषणाच्या पुस्तिकेचे प्रकाशन पुणेचे उदयोगपती प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते, खजिनदार राम नेहरवे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. सकाळी ७ वा. स्व.कदम गुरुजी स्मारक ते स्व.ताड आप्पा मळा या मार्गावर कृषी-क्रीडा ज्योत दौड काढण्यात येईल. शुक्रवार दि.२ मे रोजी सायंकाळी ४ वा. कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन खरेदी विक्री संघाचे चेअरमन सिध्देश्वर आवताडे यांच्या हस्ते होईल. सायंकाळी ६.३० वा. कवी संमेलनाचे उदघाटन तहसीलदार मदन जाधव यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी संचालिका प्रा. तेजस्विनी कदम आहेत. कवीसंमेलनामध्ये आबेद शेख, गुंजन पाटील, इंद्रजित घुले, शिवाजी सातपुते, तालीब सोलापुरी, शिवाजी बंडगर आदींचा सहभाग आहे. शनिवार दि.३ मे रोजी सकाळी ९.३० वा. शिक्षणतज्ञ डॉ.ह.ना. जगताप यांचे २१ व्या शतकातील शिक्षकांची दिशा या विषयावर व सायंकाळी ६.३० वा. आनंदाच्या वाटा या विषयावर डॉ.संजय कळमकर यांचे व्याख्यान होईल. रविवार दि.४ मे रोजी सकाळी ९.०० वा. मंगळवेढयातील समस्त भजनी मंडळांचा,हनुमान भजनी मंडळ,आंबेचिंचोली व स्पंदन ॲकेडमी,बेगमपूर यांचा भजनाचा कार्यक्रम होईल.दुपारी १२.०० स्व.दलितमित्र कदम गुरुजी यांच्या पुतळयावर पुष्पवृष्टीचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२.३० वा. महाप्रसाद होईल. दुपारी २.०० वा. संस्थेतील सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ व आदर्श शिक्षक शिक्षकेतर पुरस्कार वितरण सोहळा होत आहे. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष ॲड.सुजीत कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संचालिका डॉ. मिनाक्षी कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी महाडिक, उपप्राचार्या तेजस्विनी कदम, सहसचिव श्रीधर भोसले, संचालिका अजिता भोसले, खजिनदार राम नेहरवे, संचालक ॲड.शिवाजी पाटील, यतिराज वाकळे, ए.डी.भालदार यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ.आर. एस.गायकवाड, फार्मसीचे प्राचार्य डॉ.आर. आय.जाधव, ज्युनिअरचे प्राचार्य आर. एस.काशिद, वेळापूरचे प्राचार्य आर.बी. पवार, बेगमपूरचे प्राचार्य के.सी.भोसले, भोसेचे प्राचार्य जे.डी.आलदर, नरखेडचे मुख्याध्यापक ए.डी.शिंदे, आंबेचिंचोलीचे मुख्याध्यापक एस.व्ही.बाबर, उपमुख्याध्यापक एस.एम. नागणे, वेळापूरचे उपमुख्याध्यापक पी.एम. शिवशरण आदी परिश्रम घेत आहेत.

### मारोळीत अनैतिक संबधातून तरुणाचा खून; दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२६ एप्रिल**

मारोळी येथे अनैतिक संबंधातून एका २९ वर्षीय तरुणाचा खून करण्यात आला असुन या प्रकरणी सुभाष होनमुखे, संजय होनमुखे या दोघाविरुद्ध पोलीसांनी गुन्हा दाखल करून दोघांना आटक केली आहे. यातील ३२ वर्षीय विवाहित महिलेचे मयत सागर इंगोले (रा. सलगर बुद्रुक) यांचे गेल्या दोन वर्षापासून अनैतिक संबंध होते. या घटनेतून २६ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजता मारोळी गावात आरोपी पती व दिराने मयताच्या डोकीत काठीने मारून गंभीर जखमी करून खून केला आसल्याची फिर्याद मयताचे वडील मनोहर इंगोले ( रा. सलगर बू.) यांनी पोलिसात दिल्यावर वरील दोघा आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे करीत आहेत. दरम्यान दोन्ही आरोपीला तात्काळ अटक करण्यात आले.




# विभागीय स्पर्धेत टेबल टेनिस संघटनेच्या खेळाडूंची कामगिरी

### बार्शीचा हर्षवर्धन तिवारी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल**

विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. पश्चिम महाराष्ट्र व कोकण आयोजित या स्पर्धेत ११ वर्षांखालील मुलांच्या गटात बार्शीच्या हर्षवर्धन तिवारी याने प्रथम व १३ वर्षांखालील मुलांच्या गटात दुसरा क्रमांक मिळविला. कामगिरी केलेल्या सर्व खेळाडूंना झेड. एम. पुणेकर व बार्शीचे प्रशिक्षक गणेश स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंचे सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, डॉ नितीन तोष्णीवाल, मनीष रावत यांनी अभिनंदन केले.

**विविध गटात द्वितीय क्रमांक मिळविलेले खेळाडू :** ११ वर्षे मुली : शिवानी सानप, १५ वर्षे मुले : वेदांत खळदे. मुली : वेदांकिता पाटील. १७ वर्षे मुले : ओंकार मुळे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### पहलगाम : दक्षिण आफ्रिका भारताच्या पाठीशी

**जोहान्सबर्ग :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी येथे भारतीय वाणिज्य दूतावासाने आयोजित केलेल्या सभेत दक्षिण आफ्रिकेच्या वरिष्ठ राजनयिक अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात भारताला पाठिंबा दर्शविला. शुक्रवारी ज्यू आणि हिंदू समुदायांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वक्त्यांनी या हल्ल्याबद्दल आपला संताप व्यक्त केला आणि मृत आणि जखमी झालेल्यांच्या कुटुंबीयांप्रति शोक व्यक्त केला. रब्बी अहरोन झुलबर्ग यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र निषेध केला. आम्हाला दहशतवादाचे परिणाम चांगलेच माहीत आहेत. आज आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या तुटलेल्या जगाला जोडण्यासाठी, द्वेषाच्या ऐवजी सामंजस्य, प्रेम आणि आशेने एक होऊन काम करूया, असे झुलबर्ग यांनी प्रार्थनेत म्हटले. हा हल्ला म्हणजे भ्याड कृत्य आहे, ज्याचा निःसंदिग्धपणे निषेध केला पाहिजे, असे महावाणिज्य दूत महेश कुमार यांनी सांगितले. हा हल्ला सामान्य नागरिक, अल्पसंख्यक समुदाय आणि जम्मू आणि काश्मीरमधील अभ्यागतांना लक्ष्य करण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे.

### शस्त्रास्त्रे तस्कराला अटक सात पिस्तूल, गोळ्या जप्त

**चंदिगड:** पाकिस्तानशी धागेदोरे असलेल्या शस्त्रास्त्रे तस्कराला पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याजवळून सात पिस्तुल, चार जीवंत काडतूस आणि दीड लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी अभिषेक कुमारला अटक केली. कुमारचे तार ऑस्ट्रेलियास्थित तस्कर जोधबिर सिंगसोबत जुळलेले आहेत. त्याचा हवाला कांडमध्येही सहभाग असल्याचे उघड झाले आहे. अभिषेक कुमार याच्याविरोधात अमृतसर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याच्या साथीदारांचा शोध घेण्यासाठी कसून चौकशी केली जात आहे.

### वाल्मीक कराडला तुरुंगात हृदयविकाराचा तीव्र झटका

**बीड :** माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय आणि सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला बीड तुरुंगात हृदयविकाराचा तीव्र झटका आला आहे. त्याच्यावर तुरुंगातच उपचार सुरू आहेत. शुक्रवारी वाल्मीकने प्रकृती ठीक नसल्याची तक्रार केल्यानंतर तुरुंगात डॉक्टरला बोलावण्यात आले. तपासणी केल्यानंतर शनिवारी त्याची साखरेची पातळी कमी झाली आणि हृदयविकाराचा झटका आला. सोबत अर्धांगवायूचा परिणामही दिसून आला. सध्या त्याच्यावर बीड तुरुंगातच उपचार सुरू आहेत. वेळ पडल्यास त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून ९ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात वाल्मीक कराड मुख्य आरोपी असून त्याच्यासह सुदर्शन घुले, विष्णू चाटे, जयराम चाटे, महेश केदार, सुधीर सांगळे आणि प्रतीक घुले मकोका अंतर्गत तुरुंगात आहे.

### भारताच्या भीतीने पाकिस्तानात पळापळ

**इस्लामाबाद:** भारत कधीही हल्ला करू शकतो, या भितीने पाकिस्तानातील राजकारणी आणि लष्करी अधिकाऱ्यांचे कुटुंबीय देश सोडून पलायन करीत आहेत. लष्करप्रमुख असिम मुनीर यांच्या कुटुंबाने दोन दिवसांपूर्वीच देश सोडला असून आता भारताला धमकी देणारे बिलावल भुट्टो यांचे नातेवाईक कॅनडाला पळाल्याचे वृत्त आहे. मुनीर यांचे कुटुंबीय खासगी विमानाने ब्रिटन आणि अमेरिकेतील न्यू जर्सी येथे गेले आहेत. त्यामुळे कठीण प्रसंगी जनतेला संकटात सोडून पाकिस्तानी पलायन करीत आहेत.

### पाणी रोखल्यास अणुबॉम्ब तयार

**लाहोर:** पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी यांनी भारताला अणु युद्धाची थेट धमकी दिली आहे. भारताने पाणी रोखल्यास आमच्याकडे १३० अणुबॉम्ब तयार असल्याचे वक्तव्य अब्बासी यांनी केले आहे. पाकिस्तानकडे असलेली घोरी, बाबर, शाहीन ही क्षेपणास्त्रे आणि १३० अणुबॉम्ब भारतासाठीच ठेवले आहेत. सिंधू पाणी वाटप करार स्थगित करून आमचे पाणी तोडण्याचा प्रयत्न केल्यास गंभीर परिणाम होतील. आम्ही अण्वस्त्रे काही प्रदर्शनासाठी ठेवली नाहीत. तसेच सैन्य आणि लष्करी साधने शोभेसाठी नाहीत, अशी धमकीही त्यांनी दिली.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ४०.० | २४.६ |
| अमरावती | ४२.८ | २६.३ |
| भंडारा | ४१.० | २६.४ |
| बुलडाणा | ३७.६ | २७.० |
| चंद्रपूर | ४२.० | -.- |
| गडचिरोली | ४२.२ | २४.६ |
| गोंदिया | ४०.९ | २७.० |
| नागपूर | ४२.६ | २७.५ |
| वर्धा | ४२.६ | २८.९ |
| वाशीम | ४१.२ | -.- |
| यवतमाळ | ४२.४ | २८.४ |

# स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर प्रथमच कटेझरीत आली बस

**धानोरा, २७ एप्रिल**

धानोरा मुख्यालयापासून मुरूमगावसमोर १० किलोमीटर अंतरावर असलेल्या कटेझरी नंबर १ येथे स्वातंत्र्याला ७८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर २६ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ गडचिरोली आगारातील बस पहिल्यांदा सोडण्यात आली. बस पाहून गावकऱ्यांना खूप आनंद झाला. कटेझरी गावातील नागरिकांनी ढोल-ताशांच्या गेरात बसचे स्वागत केले. अतिदुर्गम भागातील जनतेसाठी हा सर्वांत आनंदाचा क्षण होता, कारण आतापर्यंत या गावातील लोकांनी बस पहिलीच नव्हती.



प्रथमच गावात आलेल्या बसचे स्वागत करताना नागरिक

परिसरातील अनेक गावांत बसचे साधन नसल्याने नागरिक शिक्षण, आरोग्य अशा अनेक सुविधांपासून वंचित राहत असत. अनेक दिवसांपासून गावातील व परिसरातील नागरिकांनी पोलिस मदत केंद्र कटेझरी येथे जाऊन निवेदन दिले. त्यानंतर पोलिस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी अजय भोसले यांनी पाठपुरावा करून शेवटी बस सुरू केली. बस गावात आली, तेव्हा गावातील महिला-पुरुष ढोल वाजवत आणि नाचत असल्याचे दिसून आले. यावेळी वाहन चालक सुरेंद्र कुडावले व वाहक शंकर कुलमेथे यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पोलिस उपअधीक्षक जगदीश पांडे, पोलिस उपनिरीक्षक अजय भोसले, पोलिस उपनिरीक्षक विशाल नल्लावार, पोलिस उपनिरीक्षक विक्रांत तलोदे, सरपंच पल्लवी कोल्हे, गणपत कोल्हे, गणेश कोल्हे पोलिस मदत केंद्रातील जवान व गावातील नागरिक उपस्थित होते. *(तभा वृत्तसेवा)*

# सिंदीकरांना गडकरींची सुवर्णभेट


## अक्षय्य तृतीयेला मारुती सुझुकीची पहिली खेप ● लॉजिस्टिक पार्कचा श्रीगणेशा

**नरेंद्र सुरकार**

**सिंदी रेल्वे, २७ एप्रिल**

संपूर्ण विदर्भाचे लक्ष वेधणाऱ्या आणि २५० एकरात निर्मित मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्कमध्ये अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर २७० मारुती सुझुकीची पहिली खेप येत आहे. त्यामुळे पोळा सिटीची बेकारी संपण्याची चिन्हे दिसायला लागली आहेत.

मागील दहा वर्षांच्या काळात विदर्भपूत्र नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील तिसरे ड्रायपोर्ट येथे जन्माला घातले. आज त्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे काम प्रगती पथावर आहे. त्या प्रकल्पाच्या बाजूलाच एक वर्षापूर्वी गडकरी यांनी माजी खासदार रामदास तडस, डॉ. पंकज भोयर आदींसह भारतील अनेक नामांकित उद्योजकांच्या उपस्थितीत मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्कची पायाभरणी केली होती.



भारतमाला-१ योजनेसाठी अधिग्रहित जमिनीपैकी २५० एकरात उभारल्या जाणाऱ्या या भव्य प्रकल्पाचे काम रात्रंदिवस सुरू आहे. दोन दिवसांत या प्रकल्पात मारुती आणि सुझूकी कंपनीच्या २७० कारची पहिली खेप येणार आहे. त्या वाहनांचे नंतर विदर्भाच्या सात जिल्ह्यांत वितरण केले जाईल, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

या प्रकल्पाचे बांधकाम जे. पी. आर. बालाजी कंपनीतर्फे सुरू आहे. सिंदी ते सेलडोह मार्गावरील बापूराव बोंगाडे व जगन्नाथ लाजूरकर यांच्या शेताजवळ चौक उभारण्याचे काम सुरू असून, त्या चौकातून ड्रायपोर्टच्या पश्चिम दिशेचे प्रवेशद्वार असणार आहे. अब्जावधी रुपयांच्या या प्रकल्पात डेल्टा कार्पोरेशनचा सहभाग आहे. शिवाय त्या कंपनीचा केमन आयलॅण्डसोबत करार असल्यामुळे येथून जागतिक दर्जाची दळणवळण सुविधा उपलब्ध होईल, असे डेल्टाच्या संचालिका तनीषा पालिवाल म्हणाल्या.

येथे स्थापित या प्रकल्पाचा एन.एच.एल.एन.एल. सोबत करार असून, गडकरी यांनी त्यात नॅशनल हाय-वे ॲथॉरिटी ऑफ इंडियाची हिस्सेदारी ठेवली असल्याने हा प्रकल्प विदर्भाचा संपूर्ण कायापालट करेल, असा विश्वास प्रकल्पाचे कार्यकारी उपाध्यक्ष कॅप्टन सुमंथ दास यांनी व्यक्त केला. सध्या इमारतींचे बांधकाम, रस्ते तयार करणे, वीज खांबांची उभारणी, आवश्यक निवारा आदींची कामें झपाट्याने सुरू आहेत.

# लाडक्या बहिणींना २१०० देऊ असे कुणीच बोलले नाही

## १५०० पुरेसे, मंत्री नरहळी झिरवाळ यांनी केले स्पष्ट

**जळगाव, २७ एप्रिल**

सरकार आल्यास लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ, असे आश्वासन महायुतीने दिले होते. त्याचा फायदाही निवडणुकीत झाला. पण, २१०० रुपये देऊ, असे कुणीच बोलले नाही, असे वक्तव्य अन्न आणि औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवळ यांनी केले आहे.



एप्रिल महिना संपत आला तरी अजूनही लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळाले नाहीत. २१०० रुपयांबाबत वेगवेगळी वक्तव्ये येत आहेत. अर्थमंत्री अजित पवार यांनी बजेट पाहून निर्णय घेऊ, असे म्हटले तर झिरवळ यांनी घूमजाव केले आहे. राज्याची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने २१०० रुपये देण्याच्या स्थितीत अर्थविभाग नाही. दुसरीकडे विरोधकांनी मात्र, २१०० रुपयांवरून सरकारला धारेवर धरले आहे. आश्वासन कधी पूर्ण करणार, याची सातत्याने विचारणा करण्यात येत आहे. लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरली. महायुतीचे घटक पक्ष भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयामध्ये या योजनेचा वाटा महत्त्वाचा ठरला. *(वृत्तसंस्था)*

### मे महिना सुरू होण्यापूर्वी जमा होणार १५००

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता महिना संपण्यापूर्वी खात्यात जमा होईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी पुणे येथे पत्रकारांसोबत बोलताना दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ज्या महिलांच्या कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्यांनाच पहिलेपासून निधी दिला जातो, असे तटकरे यांनी सांगितले.

# मुंबईतील ईडी कार्यालयाच्या इमारतीला भीषण आग

### जीवितहानी नाही

**मुंबई, २७ एप्रिल**

दक्षिण मुंबईतील अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीचे कार्यालय असलेल्या इमारतीत रविवारी पहाटे भीषण आग लागली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बॅलार्ड इस्टेट परिसरातील कैसर-इ-हिंद इमारतीला पहाटे २.३१ च्या सुमारास आग लागली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ईडीचे कार्यालय असलेल्या पाच मजली इमारतीच्या चौथ्या मजल्यावर लागलेली आग अनेक तास धगधगत होती. मात्र, नंतर अग्निशमन दलाने त्यावर नियंत्रण मिळविण्यात यश प्राप्त केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली आणि फर्निचर, कपाट आणि इलेक्ट्रिक उपकरणांचे नुकसान झाले. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. आग विझविण्यासाठी आठ अग्निशमन बंब, सहा जेटी, पाण्याचे टँकर आणि इतर उपकरणे तैनात करण्यात आली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# पैसे उकळण्यासाठी 'लव्ह जिहाद'चा बनाव

**मुझफ्फरनगर, २७ एप्रिल**

एका व्यक्तीला 'लव्ह जिहाद' प्रकरणात गुंतवून त्याच्याकडून १ लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ही घटना कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या लाधोवाला परिसरात घडली, जिथे एका महिलेने आरोप केला की हिंदू बनून असलेल्या एका व्यक्तीने तिच्यावर बलात्कार केला आणि हिंदू म्हणून बळजबरीने दुसऱ्या धर्मात धर्मांतरित केले. त्याने लग्नाच्या बहाण्याने व्हिडीओ देखील बनवला. विभागीय अधिकारी राजू कुमार यांनी पत्रकारांना सांगितले की, तपासात 'लव्ह जिहाद' प्रकरण बनावट असल्याचे समोर आले आहे. राजू कुमार म्हणाले, आरोपी शाहनवाज, सदकत आणि महिला आरोपी यांनी बाबर ऊर्फ ??सोनूकडून १ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम उकळण्याच्या कटात सामील असल्याचे आढळून आले. पोलिस सध्या खोटा एफआयआर दाखल करणाऱ्या महिलेचा शोध घेत आहेत. महिलेच्या तक्रारीच्या आधारे २१ एप्रिल रोजी बाबर ऊर्फ सोनूवर बलात्कार, धर्म परिवर्तन आणि विवाहाचे आमिष दाखवून व्हिडीओ बनवल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शाहनवाज आणि सदकत यांच्या संगनमताने खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे तपासात उघड झाले. परिणामी बाबर ऊर्फ ??सोनूकडून १,२५,००० रुपये उकळण्यात आले, असे राजू कुमार यांनी सांगितले. शाहनवाज आणि सदकत यांना शनिवारी अटक करण्यात आली आणि त्यांच्याकडून २५,००० रुपये जप्त करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

### माओवाद्यांनी लपवून ठेवलेली स्फोटके जप्त

**धमतरी :** छत्तीसगडच्या धमतरी जिल्ह्यातील जंगलात माओवाद्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवलेली नऊ स्फोटके सुरक्षा कर्मचाऱ्यांनी जप्त केल्याची माहिती पोलिसांनी रविवारी दिली. जिल्हा राखीव रक्षक (डीआरजी) आणि छत्तीसगड सशस्त्र दल (सीएएफ) यांच्या संयुक्त पथकाने शनिवारी खल्लारी पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या चामेडा आणि सालेभात गावांच्या जंगलात स्फोटकांचा शोध लावला, असे धमतरीचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक मनीषकर चंद्रा यांनी सांगितले. जिल्हा मुख्यालयापासून सुमारे १०० किमी अंतरावर असलेल्या जंगलात नक्षलवाद्यांच्या उपस्थितीबद्दल मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. जंगलाला वेढा घालून पथकाने शोध घेतला तेव्हा तीन कूकर बॉम्ब, दुधाच्या पावडरच्या बॉक्समध्ये ठेवलेले तीन आयईडी, दोन पाईप बॉम्ब आणि एक टिफिन बॉम्ब, एक वॉकी-टॉकी, औषधे, भांडी, खाद्यान्न आणि दैनंदिन वापराचे इतर साहित्य जप्त केले.



काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे अलिकडेच भीषण दहशतवादी हल्ला झाला. यात २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. मात्र, अशा भ्याड हल्ल्यांना न घाबरता पर्यटक अजूनही पृथ्वीवरील या नंदनवनाचे सौंदर्य न्याहाळत आहेत. श्रीनगरच्या दल सरोवरात रविवारी अनेक पर्यटकांनी नौकाविहाराचा आनंद घेतला

### आणि ओवैसी यांना सर्वपक्षीय बैठकीसाठी बोलावले गेले

**जम्मू-काश्मीरच्या** पहलगाम येथे निःष्पाप हिंदू पर्यटकांच्या अतिरेक्यांनी केलेल्या निर्घृण हत्याकांडाच्या पृष्ठभूमीवर राजधानी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीचे आयोजन संसदीय कामकाज मंत्रालयाच्या वतीने करण्यात आले. सर्वपक्षीय बैठकीसाठी राजकीय पक्षांना बोलावण्यासाठी एक निकष ठरवण्यात आला. लोकसभा वा राज्यसभेत ज्या पक्षाचे किमान पाच सदस्य आहेत, अशा पक्षांना या बैठकीचे निमंत्रण पाठवण्यात आले. संसदेच्या दोन्ही सभागृहात एक वा दोन सदस्य असणारे डझनभरापेक्षाही जास्त पक्ष आहेत. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असे समजते.

बैठकीच्या या निकषात एमआयएमचे असदुद्दिन ओवैसी बसत नव्हते, कारण लोकसभेत एमआयएमचे ओवैसी हे एकमेव सदस्य आहेत. त्यामुळे त्यांना या बैठकीचे निमंत्रण नव्हते. आपल्याला बैठकीचे निमंत्रण न मिळाल्यामुळे ओवैसी यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली. ओवैसी यांची या बैठकीतील अनुपस्थिती अनेक वादाला तोंड फोडेल, हे लक्षात आल्यानंतर गृहमंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप केल्यामुळे त्यांना या बैठकीचे निमंत्रण पाठवण्यात आले. गृहमंत्री अमित शाह यांच्या कार्यालयातून ओवैसी यांना बैठकीत उपस्थित राहण्यासाठी दूरध्वनी करण्यात आला. त्यानुसार ओवैसी या बैठकीला उपस्थित राहिले आणि त्यांनी पहलगाम येथील पर्यटकांच्या हत्याकांडाचा आपल्या पक्षातर्फे निषेधही केला. सर्व मुस्लिमांनीही या घटनेचा निषेध करावा, असे आवाहन त्यांनी केले. एवढेच नाही तर, दुसऱ्या दिवशी शुक्रवारी नमाजाला जाताना सर्वांनी काळ्या फिती लावून जाण्याचे आवाहनही त्यांनी केले. संसदभवनाला लागून असणाऱ्या मशिदीत जातीने उपस्थित राहून ओवैसी यांनी स्वतः नमाजासाठी आलेल्या मुस्लिमांना काळ्या फिती वाटल्या, यातून एक चांगला संदेश देशात गेला.

### श्रीनगरला झाली लोकलेखा समितीची बैठक

**पहलगाम** येथे पर्यटकांवर पाकसमर्थित अतिरेक्यांनी २२ एप्रिलला केलेल्या बेछुट गोळीबारात २८ पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले. विशेष म्हणजे, या दिवशी संसदेची लोकलेखा समिती श्रीनगरमध्ये होती. २१ ते २३ एप्रिल या काळात के. सी. वेणुगोपाल यांच्या अध्यक्षतेखाली लोकलेखा समितीची ही बैठक श्रीनगरला झाली. या बैठकीला समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. श्रीनगरमधील परिस्थिती लक्षात घेता या बैठकीसाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती. २२ एप्रिलला श्रीनगरपासून १०० किमी अंतरावर असलेल्या पहलगाम येथे ही दुर्दैवी घटना घडली. लोकलेखा समितीच्या बैठकीत विविध मंत्रालयांच्या सीएजी अहवालांवर चर्चा करण्यात आली. या समितीने गुलमर्ग येथेही भेट दिली तसेच श्रीनगरमधील विविध पर्यटनस्थळांना भेट देत तेथील आनंद लुटला. २२ एप्रिलच्या गोळीबाराच्या घटनेनंतर ही बैठक गुंडाळण्यात आली आणि सर्व सदस्य तातडीने दिल्लीला परतले.




### आपची झाकली मूठ सव्वा लाखाची

**नवी दिल्ली** महानगरपालिकेत पुन्हा एकदा भाजपाची सत्ता आली. भाजपाचे राजा इकबालसिंह महापौर म्हणून तर जयभगवान यादव उपमहापौर म्हणून निवडून आले. यामुळे आता दिल्ली महानगरपालिकेत भाजपाचे, दिल्ली सरकारमध्येही भाजपाचे तसेच केंद्रातही भाजपाचे सरकार आहे. परिणामी दिल्लीत भाजपाचे डबल इंजिनचे नाही तर ट्रिपल इंजिनचे सरकार आले आहे. एरव्ही सामान्य परिस्थिती असती तर भाजपाने दिल्ली महानगरपालिकेतील विजयाचा जोरदार जल्लोष केला असता. पण यावेळी परिस्थिती वेगळी होती. पहलगाम येथे पर्यटकांच्या झालेल्या हत्याकांडामुळे देशभर शोकाचे तसेच क्षोभाचे वातावरण होते तसेच पोप फ्रान्सिस यांच्या निधनामुळे तीन दिवसांचा राष्ट्रीय शोकही जाहीर करण्यात आला होता. त्यामुळे भाजपाने यावेळी या विजयाचा जल्लोष करण्याचे टाळले.

दिल्ली महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीवर आम आदमी पक्षाने बहिष्कार घातला होता. आपने आपले उमेदवार निवडणुकीत उतरवले असते तरी यावेळी भाजपाचा विजय झाला असता. कारण, महापालिकेत भाजपाचे संख्याबळ जास्त आहे. आपला पराभव होणार यांचा अंदाज असल्यामुळेच आपने निवडणुकीवर बहिष्कार घालून झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवली, असे म्हणायला हरकत नाही.

### भाजपाचे निशिकांत दुबे पुन्हा एकदा चर्चेत

**बिहारमधून** निवडून आलेले निशिकांत दुबे भाजपाचे आक्रमक खासदार म्हणून ओळखले जातात. लोकसभेतील त्यांची भाषणेही अतिशय प्रभावी असतात. चर्चेत राहण्याची हातोटी त्यांना साधली आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी सर्वोच्च न्यायालयावर जोरदार टीका केली होती. सर्वोच्च न्यायालय आता कायदेही बनवत असेल, संसदेची गरजच काय, बंद करून टाका संसद, असे दुबे यांनी संतप्तपणे म्हटले होते. तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा यांच्याशी झालेला दुबे यांचा वादही चांगलाच गाजला होता. पहलगाम येथे २२ एप्रिलला दहशतवादी हल्ला झाला, त्याच्या दहा दिवस आधी जम्मू-काश्मिरातील गुलमर्ग येथे निशिकांत दुबे यांनी आपल्या विवाहाचा रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन साजरा केला. या कार्यक्रमाला सर्वपक्षीय खासदारांना आमंत्रित करण्यात आले होते. गुलमर्ग येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हा कार्यक्रम कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत पार पडला. मात्र, पहलगाम येथील दहशतवादी घटनेनंतर गुलमर्ग येथे साजरा झालेला दुबे यांचा कौटुंबिक कार्यक्रम कारण नसताना चर्चेचा विषय ठरला. विशेष म्हणजे, भाजपाच्या वर्तुळातही याची चर्चा सुरू आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला नसता, तर गुलमर्ग येथे त्यांनी साजरा केलेला कौटुंबिक कार्यक्रम हा चर्चेचा विषय झाला नसता. काही का असेना, पुन्हा एकदा यानिमित्ताने निशिकांत दुबे चर्चेचा विषय झाले. राजकारणी माणसाला यापेक्षा आणखी काय हवे असते.

● दिल्लीवाला



# भाषेतील वैविद्यामुळे विनोद निर्मिती : नारायण पुरी

### वीरशैव व्हिजन बसव व्याख्यानमालेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

भाषा ही प्रवाही असते. जिवंत शब्द घेऊन ती वाहत असते. प्रत्येक मैलागणिक भाषा बदलत असते. त्या प्रत्येक भाषेत शब्दांचे वैवीध्य असते. त्या वैविध्यामुळे विनोद निर्मिती होते असे प्रतिपादन हास्य कवी नारायण पुरी (छ. संभाजीनगर) यांनी केले.

वीरशैव व्हिजन बसव व्याख्यानमालेचे समारोपाचे पुष्प 'हास्य धारा' या विषयावर गुंफताना ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर माजी विरोधी पक्षनेता अमोल शिंदे, माजी पोलीस उपायुक्त दीपक आर्वे, श्री सिद्धेश्वर बँकेचे संचालक सिद्धेश्वर मुनाळे, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार उपस्थित होते. यावेळी श्री पुरी यांनी 'काटा', प्रेमाचा जांगडगुत्ता, इष्क प्रितीची या कविता सादर करण्याबरोबरच कौटुंबिक, सामाजिक व राजकीय प्रसंगावर मार्मिक भाष्य केले.

याप्रसंगी अरविंद जोशी, महावीर दुरुगकर, दशरथ वडतिले, दत्ता थोरे, संजय साखरे, अरुण पाटील, सोमेश्वर याबाजी, आनंद दुलंगे, नागेश बडदाळ, राजेश नीला, मनोज पाटील, गौरीशंकर अतनुरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजशेखर बुरकुले यांनी केले. विजयकुमार बिराजदार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन महेश कोटीवाले यांनी तर आभार प्रदर्शन राहुल बिराजदार यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समिती सचिव अविनाश हत्तरकी, अमित कलशेट्टी, सोमनाथ चौधरी, बसवराज जमखंडी, शिव कलशेट्टी, सिद्धेश्वर कोरे, संगमेश्वर स्वामी, अमोल कोटगोंडे, यांनी परिश्रम घेतले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या लोककल्याणकारी राज्यकर्त्या : डॉ. कोळेकर

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती : मसाप व विद्यापीठ संयुक्त विद्यमाने काव्य स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

मध्ययुगीन सरंजामी कालखंडाच्या भूपृष्ठावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी लोककल्याणकारी राज्याची आधुनिक संकल्पना राबविली. त्यांचे प्रशासन आणि धोरणातून भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासाला वैभवाचे रूप मिळाले, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे संचालक प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. सात रस्ता येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीप्रित्यर्थ विद्यापीठातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व



महाराष्ट्र साहित्य परिषदेची सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुण्य पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर: एक थोर व्यक्तिमत्व व महान कार्य या विषयावर काव्यवाचन स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. देवराव मुंडे होते. व्यासपीठावर मसापच्या सोलापूर शाखेचे प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर, सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांची उपस्थिती होती. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजनसह दीप प्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य प्रा. देवराव मुंडे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. नरेंद्र काटीकर यांनी मसाप सोलापूर शाखेचे विविधांगी कार्यक्रम-उपक्रम विशद करताना विद्यापीठाच्या बरोबर या स्पर्धे सह इतर कार्यक्रमांचे नियोजन विशद करीत, उपस्थित विद्यार्थी व नागरिक स्पर्धकांचे स्वागत केले. स्पर्धेत युवा, नागरिक, नवकवींनी उस्फूर्त सहभाग दिला. परीक्षक म्हणून जेष्ठ कवी गोविंद काळे आणि कथा लेखिका व कवयित्री संध्या धर्माधिकारी यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वीसाठी डॉ. नरेंद्र काटीकर, डॉ. शिवाजी शिंदे, वंदना कुलकर्णी, डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण, प्रा. भीमगोंडा पाटील, श्री. शुभम कोरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी मसाप कार्यकारिणी सदस्य डॉ. अर्जुन व्हटकर, बद्दीउज्मा बिराजदार, फैय्याज शेख यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन वंदना कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रा. भीमगोंडा पाटील यांनी मानले.

# सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर मांळुब्रा गावानजिक रस्ता रोको



**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

मंळुब्रा (ता.तुळजापुर) शिवारातील सौर उर्जा प्रकल्यावर काम करणाऱ्या २८ वर्षीय तरुण कामगाराचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. त्याची दखल सौर उर्जा प्रकल्पाची कंपनी घेत नाही व मयताच्या नातेवाईकांना मदत मिळावी, या मागणीसाठी रविवारी भर दुपारी दोन वाजता गावकऱ्यांसह नातेवाईकानी सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर मांळुब्रा गावानजिक तास भर रस्ता रोको आंदोलन केले

शनिवारी सकाळी साडे अकरा वाजता मांळुब्रा शिवारातील सौर उर्ज़ा प्रकल्पावर उत्तम गौतम वडणे हा काम करीत असताना विजेचा शॉक लागून तो गंभीर जखमी झाला. त्यास उपचारार्थ दवाखान्यात दाखल केले असता मयत घोषीत केले. मयत उत्तम वडणे याचे पश्चात आई, वडील, पती व १ मुलगी असा परिवार आहे. त्याच्या मृत्युची दखल सौर उर्जा कंपनीने घेतली नाही. नातेवाईक गावकरी व कंपनीचे अधिकारी यांच्यात बोलणे सुरू होते. मयताच्या कुटुबाला आर्थिक मदत कंपनीने करावी, अशी मागणी केली. ताम लवाडी पोलिस प्रशासनाने मार्ग काढू, असे अश्वासन दिल्यानंतर रस्ता रोको आंदोलन स्थगित केले. यावेळी गजानन, विशाल, सुभाष व साहेबराव वडणे आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...



**सोलापूर : छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष गवळी यांचे चिरंजीव सौरभ गवळी याने आयर्लंडमधील लिंबरीक विद्यापीठामध्ये मास्टर इन कॉम्प्युटर सायन्स हा अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

### लोकसेवा हक्क अधिनियमाच्या दशकपूर्तीनिमित्त आज राज्यस्तरीय सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. २७ एप्रिल**

सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची ''दशकपूर्ती'' आणि ''प्रथम सेवा हक्क दिन'' निमित्त राज्यस्तरीय सोहळा सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथेदुपारी एक वाजता होणाऱ्या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार व मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात ,हे या अधिनियमाचे उद्दिष्ट आहे.



### गांव वस्ती अभियान अंतर्गत मन की बात व लाभार्थींचा सन्मान

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

गांव वस्ती अभियान अंतर्गत मन की बात व लाभार्थी सन्मान भद्रावती पेठ श्री मार्कंडेय रुग्णालय पाठीमागे दुस्सा वाडा येथे आयोजित केला होता. शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्य पूर्व मंडल अध्यक्ष अक्षय अंजीखाने यांच्या हस्ते मन की बात आणि लड़की बहिण योजनेच्या लाभार्थी मीनाक्षी नाडगम व मीना चौगुले यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी श्री अंजीखाने यांचे स्वागत सिद्धाराम ख्याडे यांनी केले. यावेळी विश्वनाथ प्याटी यांचा सत्कार साईनाथ आन्दोल यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रम ाप्रसंगी, सुनील घाटे, राजू भंडारे, नीलेश यलसंगी, सुनील यलसंगी, मोतीलाल गोने, श्रीनिवास म्हेत्रे, विशाल आंकद, कृष्ण म्याकल आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजू भंडारे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रशांत पल्ली, प्रसाद पल्ली यांनी केले.



### पालिका मलेरिया विभागाच्या वतीने रॅलीद्वारे जनजागृती

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

जागतिक हिवताप दिन सोलापूर महानगरपालिका नागरी हिवताप योजना मलेरिया विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. मलेरिया विभागाच्या वतीने शहरातील प्रमुख मार्गावरून जनजागृती रॅली काढण्यात आली.संपूर्ण जगभरात जागतिक मलेरिया दिन दरवर्षी जागतिक स्तरावर मलेरियाविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि या प्राणघातक आजाराविरुद्ध लढण्याच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी साजरा केला जातो. यानिमित्त सोलापूर महानगरपालिका नागरी हिवताप योजना मलेरिया विभागाच्या वतीने शहरातील प्रमुख मार्गावरून जनजागृती रॅली काढण्यात आली. महानगरपालिका नागरी हिवताप योजना विभागाच्या प्रमुख स्वाती अनपट यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरवात करण्यात आली. मलेरिया आजाराचा प्रसार रोखणे व डासांबाबत जनजागृती करण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेवून रॅलीचा समारोप करण्यात आला.

### २ मे पासून आर्यवीर दल प्रशिक्षण शिबीर

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

आर्य समाजातर्फे दि. २ ते ८ मेपर्यंत आर्यवीर दल प्रशिक्षण शिबिराचे आयोजन डी.ए.व्ही. कॉलेज वसतिगृह येथे करण्यात आले आहे. शिबिरामध्ये सकाळी ५ ते रात्री ९.३० पर्यंतच्या दिनचर्येमधून सुदृढ व चपळ शरीरासाठी व्यायाम, योगासने, प्राणायाम, लाठी-काठी, बंदुक चालविण्याचे प्रशिक्षण, कराटे, विविध खेळ आदींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासोबतच सस्वर वेदमंत्र उच्चारण, महत्वाचे श्लोक पाठांतर करुन घेतले जाणार आहेत.



**कसबा गणपतीला आंब्याची आरास**

सोलापूर : अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर मानाचा कसबा गणपतीला १२५ डझन आंब्याची आरास करण्यात आली.



**पावसाची हजेरी**

सोलापूर : शहरात रविवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली. दत्त चौक परिसरात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्रे : केवल तिवारी)



# पहलगाम घटनेचा करमाळ्यात निषेध

**करमाळा, दि.२७ एप्रिल-**

पहलगाम घटनेच्या निषेधार्थ करमाळा शहर आणि तालुक्यातील मशिदीत शुक्रवारी मुस्लीमांनी दंडाला काळ्या पट्ट्या बांधून नमाज पुर्ण केली. यावेळी घटनेत मृत्यू झालेल्या निष्पाप नागरिकांबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दहशतवाद्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी भारतरत्न डॉ ए.पी. जे. अब्दुल कलाम फाऊंडेशन व सकल मुस्लीम समाजाच्या वतीने केली आहे. यावेळी मौलाना म ोहसीन, अबु रेहान, मौलाना सिकंदर, मौलाना अनवर, मौलाना सय्यद अली, मौलाना मोहम्मद फारुख रझा, सकल मुस्लीम समाजचे जम ीर सय्यद, रमजान बेग, सुरज शेख, इकबाल, मजहर नालबंद, समीर बागवान, आल्लाऊदिन शेख, मुस्तकीम पठाण, इम्तियाज पठाण अरबाज बेग शाहीद बेग कलीम शेख, फिरोज बेग, कलंदर शेख, आलीम शेख, नजम शेख, अनवर शेख, अकीब सय्यद, हाजी ईम्रान, आजीम, शेख, अस्लम बेग, कबीर, सद्दाम कुरेशी, अफजल शेख, जाकीर वस्ताद, अरबाज घोडके, जाकीर पठाण, अशरफ तांबोली, आदीसह मुस्लीम बांधव उपस्थित होते.

# जैन कासार प्रतिष्ठान घेणार एका मुलास दत्तक

### डॉ. मधुकर लोखंडे यांनी स्वीकारले पालकत्व

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न असते. मात्र परिस्थितीमुळे ते घेता येत नाही. अशा मुलांसाठी जैन कासार प्रतिष्ठान नेहमीच धावून येते. प्रतिष्ठानच्या माध्यम ातून सेवानिवृत्त अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. मधुकर लोखंडे यांनी मीनाक्षी मधुकर लोखंडे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून संपूर्ण खर्च उचलून त्या मुलाच्या उच्च शिक्षणास चांगलीच गती दिली आहे.

जैन कासार प्रतिष्ठानच्या शैक्षणिक फंडअंतर्गत ही योजना गरीब मुलांसाठी तारकच आहे. दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना



**डॉ. मधुकर लोखंडे व मिनाक्षी लोखंडे यांनी शिष्यवृत्तीचा धनादेश जैन कासार प्रतिष्ठानचे बाबुराव तंगा व महावीर दुरुगकर यांच्या कडे सुपुर्द केला.**

शिष्यवृत्ती दिली जाते. पुढील वर्षापासून विद्यार्थी दत्तक हा उपक्रम राबविण्यात येत असून प्रतिकूल परिस्थितीमधून शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्यास शिक्षण पूर्ण होईपर्यंत एका पालकांना एक विद्यार्थी दत्तक योजनेत चार वर्षे शिष्यवृत्ती दत्तक घेतलेल्या पालकांच्या वतीने दिली जाणार आहे. डॉ. लोखंडे हे गेली दहा वर्षे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मदत करीत होते. जैन कासार प्रतिष्ठानच्या उपक्रम चांगला असून या माध्यमातून त्यांनी आता एक विद्यार्थी दत्तक घेऊन शिष्यवृत्ती देणार आहेत. जैन कासार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष बाबुराव तंगा व चिंतामणी शिष्यवृत्तीचे संयोजक महावीर दुरुगकर यांच्याकडे सम्म तीपत्र देऊन धनादेश दिला. यावेळी मीनाक्षी लोखंडे, किर्ती लोखंडे उपस्थित होत्या. प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकूमचंद हेसे यांच्या संकल्पनेतून दत्तक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना राबविली जात असून, यासाठी समाजातील दानशूर बांधवांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, संजय कंदले, उपाध्यक्षा माणिकताई व्यवहारे, कांतीलाल नळे, विनायक टोणगे, प्रा. धन्यकुमार बिराजदार आदींनी केले आहे.

# तिरडीच्या काठयांचा वृक्षारोपणासाठी केला वापर

## बाळेचे निसर्गप्रेमी दीपक करकी यांचा अभिनव उपक्रम : अंधश्रद्धा सोडून निसर्गाची पूजा

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

अंधश्रद्धांना मातीना गाडून निसर्ग प्रतिच्या श्रद्धेचे करण्यासाठी काम अनेक निसर्ग प्रेमी करीत असतात. बाळे येथील एका अशाच निसर्गप्रेमी चक्क मृतदेहाचा तिरडीच्या टाकून दिलेल्या काट्यांचा वापर वृक्षारोपण केलेल्या झाडांच्या आधारासाठी करण्याचा उपक्रम राबविला आहे..



निसर्गाला सोबत मानून त्यांच्या संवर्धसाठी झटणारे फार कमी आहेत. बाळे येथील निसर्गप्रेमी दीपक करकी यांनी अशीच चळवळ सुरू केली आहे. यांनी मृतदेहाच्या तिरडीच्या काट्यांचा वापर करून आठ झाडांचे वृक्षारोपण केले आहे. यामध्ये चार लिंबाची आणि चार करंज झाडाचे वृक्षारोपण केले आहे. या झाडाला दररोज पाणी घालण्याचे काम एकत्व सोशल फाउंडेशन बाळे सदस्य चेतन झाडे हे करत आहेत.

एके दिवशी रविवारी दीपक करकी यांनी पक्ष्यांना पाणी ठेवण्यासाठी उत्तर सोलापूर येथील खेड या गावांमध्ये स्मशानभूमीत येथे एका पिंपळाच्या झाडाला मातीचे भांडी पक्ष्यांना पाणी ठेवण्यासाठी गेले असता त्यांना स्मशानभूमी शेजारी मृतदेहाचा तिरडीच्या काठ्यांचा खच पडलेला दिसला. आणि अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे वाकली होती. या काठ्यांचा वापर झाडांच्या आधारासाठी केले जाऊ शकतो, असे त्यांना सुचले त्यामुळे त्यांनी त्यातील त्या काट्यांचा अनेक परिसरात काठीचा आधार देण्याचे काम करण्यात सुरुवात केली.

**स्मशानभूमीतील वस्तू घरी आणलेली चालत नाही**

स्मशानभूमीत अंत्यविधीला गेलेला माणूस घरी हात पाय धूऊन आलेला चालतो, मात्र स्मशानभूमीतील एखाद्या गोष्टी घरी आणली की माणसाला ती चालत नाही मृतदेहाच्या तिरडीच्या काठया अनेक गोष्टीसाठी वापरतात येतात. करकी यांनी त्याचा वापर वृक्षारोपणासाठी आधार देण्यासाठी केला आहे.

# भगवान परशुराम जयंतीनिमित्त मंगळवारी जुळे सोलापुरात मिरवणूक

### पुण्यातील व स्थानीक पुरोहीत करणार मंत्रघोष

### लेझीम पथकासह निघणार शोभायात्रा

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

जुळे सोलापूरात भगवान परशुराम जयंती निमित्त मंगळवार दिनांक २९ एप्रिल रोजी भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्यावतीने भव्य मिरवणूक व शोभायात्रा निघणार असल्याची माहिती उत्सव समितीचे अध्यक्ष सुधीर कुलकर्णी यांनी दिली.



यावर्षी प्रथमच जुळे सोलापूरात हा उत्सव स्वतंत्ररित्या होत आहे. ब्रह्मगर्जना, सहयोग संस्थेसह अन्य संस्थांचे यासाठी सहकार्य आहे. मंगळवारी सकाळी आठ वाजता केएलई मैदानावर भव्य सभामदिरात पुणेच्या व स्थानिक पुरोहीतांच्या मंत्रघोषात पवमान व रूद्राभिषिकाने पूजन होईल. सायंकाळी साडेपाच वाजता केएलईच्या मैदानावरून मिरवणूक व शोभायात्रा निघेल. यामध्ये लेझीम पथक आहे. डीमार्ट, पाण्याची टाकी, कुमठेकर हॉस्पीटल, भंडारी ग्राऊंड, दावत चौक मार्गे केएलई मैदानावर मिरवणूक विसर्जीत होईल.यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन म हिलाध्यक्षा सायली जोशी, युवक अध्यक्ष निखील देशपांडे, स्वागत अध्य़क्ष श्रीकांत कुलकर्णी, विक्रम ढोनसळे, जयतीर्थ पडगानूर यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नंदीबसवेश्वर मंदिराचा बुधवारी जिर्णोद्धार, कळसारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बुधवार (दि. ३०) एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता होटगी रोडवरील मजरेवाडी येथील राजीव गांधी नगरातील श्री नंदीबसवेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार व कळसारोहणाचा कार्यक्रम हुबळी, अक्कलकोटचे श्री ष. ब्र. डॉ. राजशेखर शिवाचार्य महास्वामी व सोलापूर मठाचे सदगुरू श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती नंदीबसवेश्वर मंदिर समितीच्यावतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. यावेळी खा. प्रणिती शिंदे, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, एमके फाऊंडेशनचे महादेव कोगनुरे, अप्पासाहेब हत्तुरे, श्रीशैल हत्तुरे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शिवशरण दारफळे, शिवसेनेचे शहराध्यक्ष अमोल शिंदे, भीमाशंकर म्हेत्रे, केगाव बु. चे सरपंच श्रीशैल आहेरवाडी, केगाव खु. सरपंच बसवराज बगले, राजशेखर सगरे, सिद्धाराम बाके, संतोष मुडवे, राजशेखर अल्दी, डॉ. प्रकाश माने, गुरलिंग अचलेर उपस्थित राहणार आहेत. मंगळवार २९ रोजी रात्री भजन कार्यक्रम व जागरण, बुधवार ३० रोजी सकाळी कळस, महारूद्राभिषेक, सव्वा सात वा. मान्यवरांच्या हस्ते कळसारोहण. आठ वाजता धर्मसभा त्यानंतर साडेनऊ ते चार वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप असणार आहे. तरी या कार्यक्रमाचा भाविकांना लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# बाजार समितीसाठी ९६.२४ टक्के मतदान

### सोलापूर बाजार समिती उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत कैद

### सिद्धेश्वर कारखान्याच्या सभागृहात मतमोजणी व अंतिम निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचे मतदान शहर व जिल्ह्यातील विविध ८ मतदान केंद्रांवर एकूण ९६.२४ टक्के इतके झाले. राज्यात विक्रमी आर्थिक व्यवहारांसाठी अग्रगण्य असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर आपलाच झेंडा राहावा, यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांनी बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत चुरशीने मतदान केले आहे. रविवार (दि. २७) एप्रिल रोजी सोलापूर शहर जिल्हा तसेच राज्याचे लक्ष लागलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक निवडणुकीच्या मतदानाला सुरुवात झाली. सकाळपासूनच मतदान केंद्रावरील गर्दी पाहता मोठ्या चुरशीने मतदान झाले. त्यामुळे बाजार समितीच्या निवडणुकीत सोसायटी मतदारसंघापेक्षा ग्रामपंचायतीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ संचालकपदाच्या जागांसाठी सोलापूर



शहरातील सिद्धेश्वर प्रशाला, नान्नज, तिऱ्हे, मंद्रूप, आहेरवाडी, निम्बर्गी, वळसंग, बोरामणी ८ मतदान केंद्रावर रविवार (दि.२७) एप्रिल रोजी सकाळी ८:०० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरेद्वारा जिल्हा उपनिबंधक कार्यालयातून सर्वत्र लक्ष ठेवण्यात आले. सकाळी ८:०० वाजल्यापासून मतदान सुरू झाले. परंतु त्यानंतर गर्दी पाहता पुढील दोन तासात मतदानाची टक्केवारी वाढली. यावेळी प्रथमच भाजप पक्षांतर्गत निवडणूक लागली होती. भाजप पक्षाचेच आमदार आमोरासमोर उभे ठाकले होते. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने, दक्षिणचे नेते सुरेश हसापुरे यांच्या पॅनल विरोधात राज्याचे माजी सहकार मंत्री तथा आ.सुभाष देशमुख आ.विजयकुमार देशमुख यांनी पॅनल उभे केले आहे. भारतीय जनता पार्टीच्या दोन आमदारांमध्ये बाजार समितीसाठी लढत असल्याने कोण जिंकणार याची उत्सुकता संपूर्ण राज्याला लागली आहे.

दरम्यान, बाजार समितीच्या निवडणुकीसाठी



**बाजार समितीच्या निवडणुकीसाठी गटनिहाय झालेले मतदान व टक्केवारी**

| मतदार संघ | एकूण मतदान | झालेले मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| सहकारी संस्था | १,८९५ | १,८६४ | ९८.०६% |
| ग्रामपंचायत | १,१७६ | १,१६० | ९८.६४% |
| व्यापारी | १,२७६ | १,२०३ | ९४.२४% |
| हमाल तोलार | १,०८४ | १,००० | ९२.२५% |
| **एकूण** | **५,४३१** | **५,२२७** | **९६.२४%** |

सोसायटी मतदारसंघातून ११, ग्रामपंचायत मतदार संघातून ४, व्यापारी मतदारसंघातून २ आणि हमाल तोलार मतदारसंघातून १ अशा १८ जागा निवडून द्यायचा आहेत.माजी चेअरमन दिलीप माने यांनी तिऱ्हे मतदान केंद्रावर सकाळी ८:०० वाजता आपल्या मतदानाचा हक्क बजावला. तर निम्बर्गी या मतदान केंद्रावर सुरेश हसापुरे यांनी मतदान केले.उत्तर तालुक्यातील नान्नज या गावी असलेल्या मतदान केंद्रावर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम काका साठे, उमेदवार तथा भाजपचे युवा नेते मनीष देशमुख यांचे बंधू रोहन देशमुख हे ठाण मांडून असल्याचे दिसून आले. तसेच याच मतदान केंद्रावर उमेदवार गणेश वानकर, युवानेते पृथ्वीराज माने, उमेदवार अविनाश मार्तंडे हे सुद्धा ठाण मांडून होते. बाजार समितीचे सर्वाधिक मतदान हे सोलापूर शहरातील सिद्धेश्वर प्रशाला येथे असल्याने या केंद्रावर मतदारांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. व्यापारी मतदारसंघात मुस्लिम समाजातून एकच उमेदवार आहे. परंतु व्यापारी वर्गातून यंदा बंडखोरी झाल्याने लिंगायत समाजातून तीन उमेदवार एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे त्या निकालाकडे ही सर्वांचे लक्ष राहणार आहे.

**मतमोजणी आणि निकालासाठी यंत्रणा सज्ज.**



मतदान केंद्रावर व मतमोजणी येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले आहेत. त्याचे नियंत्रण जिल्हा उपनिबंधक कार्यालय तथा बाजार समिती निवडणूक निर्णय कार्यालय येथे करण्यात आले आहे. प्रत्येक ठिकाणी कॅमेरे लावण्यात आल्याने मतदान व मतमोजणी पारदर्शी होणार आहे. तसेच कोणताही अनुचित व गैरप्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस अधिकारी कर्मचारी तसेच डीबी पथक यांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर सोमवार दि.२८ एप्रिल रोजी सकाळी ८:०० वाजल्यापासून दुपारी बारा वाजेपर्यंत मतमोजणी आणि अंतिम निकाल घोषित करण्यात येणार आहे.

**- किरण गायकवाड, निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सोलापूर**

### निंबर्गी मतदान केंद्रावर हसापुरे, पाटील यांच्यात झाला वाद

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी मतदान होत होते. दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गी मतदान केंद्रात "पोलिंग एजंट शिवाय कोणाला बसू देऊ नका" असे सांगितल्यानंतर हा वाद वाढत गेला. माझ्या मुलाला तू बाहेर काढतोस का ? असे म्हणत सुरेश हसापुरे यांनी अप्पासाहेब पाटील यांच्यावर एकेरी उल्लेख केल्यानंतर काँग्रेस नेते तथा बाजार समितीचे माजी संचालक सुरेश हसापुरे आणि भाजपचे नेते तथा माजी संचालक आप्पासाहेब पाटील यांच्यामध्ये शाब्दीक बाचाबाची, हमरीतुमरी झाली. हे दोन्ही नेते एकमेकांच्या अंगावर धावून गेले, त्यामुळे मतदान केंद्रावर काही काळ तणाव निर्माण झाला होता. शेवटी पोलिस आणि इतर नेत्यांनी हस्तक्षेप करत हा वाद मिटविला.

---

## ▶▶ महत्वाचे...

### भाड्याच्या घरातून काढल्याचा राग मनात धरून मारहाण

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

पूर्वीचे भाडेकरू लक्ष्मी हलसुरे यांना भाड्याच्या घरातून काढल्याचा राग मनात धरून फिर्यादीच्या पत्नीस दगडाने मारून जखमी केले. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी विनोद संभाजी आकाडे (वय-३६,रा.कळके वस्ती,कारंबा रोड,सोलापूर) हे त्यांच्या घरी असताना संशयित आरोपी किरण सुनील आखाडे (रा.मेगाणे नगर) हा तिथे आला.व पूर्वीचे भाडेकरू यांना भाड्याच्या घरातून काढण्याचा राग मनात धरून फिर्यादीची पत्नी विद्या हिला दगड भिरकावून मारून जखमी केले.तसेच घरासमोर पडलेली लोखंडी शेगडी फिर्यादीच्या डाव्या खांद्यावर मारून जखमी केले.फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.अधिक तपास पोलीस हवालदार घुगे हे करत आहेत.



### रिक्षा घेण्यासाठी माहेरून पैसे आणण्यासाठी छळ

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

रिक्षा घेण्यासाठी माहेरून पैसे घेऊन ये असे म्हणत शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी घराच्या बाहेर हाकलून दिल्याप्रकरणी सासरकडील मंडळीवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेची हकीकत अशी की ,फिर्यादी सुनीता आकाश जाधव (वय-२६,रा.सेटलमेंट फ्री कॉलनी सोलापूर) या सासरी नांदत असताना पती आकाश याने रिक्षा घेण्यासाठी माहेरून पैसे घेऊ नये म्हणून तगादा लावला होता.तसेच सासू रुक्मिणी,जाऊ अंजली (रा.सर्वजण सेटलमेंट कॉलनी) यांनी सुद्धा सुनेचा छळ केला.मारहाण करून लहान मुलासहित घराच्या बाहेर हाकलून दिले.सलगर वस्ती पोलीस ठाण्यात पतीसह सर्वांवर गुन्हा दाखल झाला आहे.

### बँक कॉलनीसह अमोल नगरात रस्त्याची मागणी

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

जुळे सोलापूर भागातील अमोल नगर, लोखंडवाल पार्क तसेच बँक कॉलनीत रस्त्याची दुर्दशा झाली असून रस्ता करण्याची मागणी नागरिकातून होत आहे. येथे मुलभूत सुविधांचीच वाणवा आहे. रस्ते, ड्रेनेज लाईन तसेच पथदिवे आदी सुविधांपासून येथील नागरिक वंचित आहेत.

---

## अतिरिक्त शिक्षकांमुळे रिक्त पदे झाली कमी

### भरतीच्या दुसऱ्या टप्प्यात मिळणार नाही एकही शिक्षक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त शिक्षकांची रिक्त पदावर नियुक्ती केल्याने शिक्षकांची रिक्त पदे कमी झाली. शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्यातून सोलापूर जिल्हा परिषदेला एकही शिक्षक मिळणार नसल्यामुळे भावी शिक्षक नाराज झाले आहेत.

राज्यात पहिल्या व रूपांतरित जागेमध्ये ८० टक्के पद भरतीला मान्यता दिली होती. ७० टक्के पद भरती पूर्ण झाली आहे. अद्याप १० टक्के पद भरती होणार आहे. मात्र, सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये व खासगी प्राथमिक शाळेत अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांचे समायोजन केल्याने अनेक रिक्त पदे भरली गेली आहेत. त्यामुळे दहा टक्के पद भरतीमध्ये शिक्षकांच्या जागा उपलब्ध नसल्याने बऱ्याच जिल्हा परिषदेत जागा भरण्यात येणार नाहीत. त्यामुळे भावी शिक्षकांचे नुकसान होणार आहे. शाळांतील शिक्षकांची १२ हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. शासनाने पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरती प्रक्रियेचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. मात्र, हा टप्पा पूर्ण करत असताना अनेक शैक्षणिक संस्थांतील पदे रिक्त आहेत. त्याची माहिती राज्यातील बऱ्याच संस्थांनी लपविल्यामुळे बरेच रिक्त जागांची माहिती पुढे आली नाही. त्यामुळे अशा रिक्त जागांची माहिती शासनाने पुन्हा मागवावी, अशी मागणी भावी शिक्षकांतून होत आहे.

**भावी शिक्षक नाराज**

जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये रिक्त असलेल्या पदावर अतिरिक्त शिक्षकांना नियुक्ती दिली आहे. शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्यातून जिल्ह्यास एकही शिक्षक मिळणार नाही. त्यामुळे भावी शिक्षक नाराज झाले आहेत. राज्यात बारा हजारांपेक्षा जास्त शिक्षकांच्या जागा रिक्त असून, शासनाने त्या जागा भरल्यास भावी शिक्षकांना न्याय मिळणार आहे.

**- सौरभ खुर्द, अभियोग्यताधारक, सोलापूर**

---

## सहा वर्षात घटल्या सतराशे शाळा

### विद्यार्थ्यांची घटती संख्या चिंताजनक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

राज्यात मागील सहा वर्षांत लाखो विद्यार्थी आणि एक हजार ७०५ शाळांची संख्या घटली आहे. ही संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने चिंतेची बाब आहे. शाळा आणि विद्यार्थ्यांची संख्या घटू नये, यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.

मागील सहा वर्षांत लाखो विद्यार्थी आणि दीड हजारांपेक्षा जास्त शाळांची संख्या कमी झाल्याची आकडेवारी यू-डायस प्लस अहवालातून समोर आली आहे. त्यामुळे शिक्षकांनी वेळीच सावध होण्याची गरज आहे. मात्र, याकडे शासनासह शिक्षक दुर्लक्ष करत आहेत. गेल्या काही वर्षांपासून शासनाकडून शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत.



**पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम राबवावा**

गेल्या काही वर्षात राज्यात दीड हजारांपेक्षा जास्त शाळा अत्यंत चिंताजनक आहे. शिक्षकांवर विविध उपक्रमांचा भार आणि ऑनलाईन कामे मोठ्या प्रमाणात दिल्याने विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांना पुरेसा वेळ मिळत नाही. शासनाने पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष उपक्रम आणि शिकविण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल, यासाठी प्रयत्न करावेत.

**- बसवराज गुरव, जिल्हाध्यक्ष, शिक्षक समिती कन्नड**

त्यामुळे विद्यार्थी आणि शाळांची पटसंख्या वाढणे आवश्यक असताना ती घटत असल्याने शिक्षकांवर उपासमारीची वेळ येण्यास उशीर लागणार नाही. गेल्या काही वर्षांपासून राज्यातील शाळा आणि विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने घटत आहे. त्यामुळे शासनाने वेळीच सावध होऊन योग्य त्या उपाययोजना करुन शाळा, विद्यार्थी टिकविले पाहिजेत.

**विद्यार्थी संख्या कमी झाल्याचे कारण यू-डायस**

यू-डायसनुसार विद्यार्थी संख्या कमी झाल्याचे कारण यू-डायस म्हणजे, अनेकवेळा विद्यार्थी नोंदणी आणि अपडेट करण्याच्या प्रक्रियेत अडचणी येतात. जसे की विद्यार्थ्यांचे प्रमोशन, दुसऱ्या शाळेतून येणारे विद्यार्थी आणि आधार कार्ड जुळवणे. या प्रक्रियेत तांत्रिक अडचणी आणि चुकांमुळे विद्यार्थी संख्या अचूकपणे नोंदवली जात नाही. तसेच इनव्हॅलिड विद्यार्थी संख्या मोठी आहे. त्यामुळे मागील काही वर्षात लाखो विद्यार्थ्यांची संख्या घटल्याचे दिसत आहे.

**- निलेश देशमुख, राज्य सरचिटणीस, शिक्षक सहकार संघटना**

त्यासाठी शासनाने ठोस पाऊल उचलणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील काळातही शाळांच्या संख्येत घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

## जिल्ह्यात ठेकेदार वाढले मात्र वाळू अद्यापही मिळेना!

### 3 जणांना दिला ठेका तर ९ ठेक्यांचे काम अंतिम टप्प्यात

### सर्वसामान्य नागरिक मात्र आले घायकुतीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

२०२४-२५ या गतवर्षात जिल्ह्यात वाळू लिलाव ठेकेदारांनी घेतले नसल्याने जिल्ह्यातील नागरिकांना बांधकामासाठी वाळूच मिळाली नाही, तर काहीजणांनी बाजूच्या कर्नाटक राज्यातून महागडी वाळू आणून आपले बांधकाम उरकले, तर काहींनी क्रश सॅन्ड अन् खडीवर आपल्या घराची बांधकामे केली, दरम्यान, जिल्ह्यातील अनेक नागरिकांची वाळूची मागणी वाढल्याचे पाहून यंदा जिल्हा प्रशासनाकडून आजतागायत ३ ठेके ई-टेंडर प्रक्रियेतून दिले आहेत तर अजून ९ ठिकाणचे ठेके देण्याची प्रक्रिया काही दिवसात पूर्ण होईल आणि सर्वसामान्य नागरिकांना मुबलक वाळू मिळेल, असा आशावाद जिल्हा प्रशासनाकडून व्यक्त होत होता. मात्र वाळू लिलावाचे ठेके वाढूनही वाळूची स्थिती जैसे थेच असल्याने सर्वसामान्य नागरिकांतून नाराजीचा सूर निघत आहे.

वाळू ठेका घेण्याची प्रक्रियाही अवघड झाल्याने पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यापूर्वी खाणकाम



आराखडा तयार करावा लागतो, पर्यावरण, पिण्याचे पाणी उपलब्धतेवर परिणाम होत असल्यास वाळू गट निश्चित करू नये, रेल्वे पूल, रस्ते पुलाच्या दोन्ही बाजूने ६०० मीटर अंतर सोडून चालू गट निश्चित करावा लागतो. या सर्व गोष्टींचा अहवाल तहसीलदारांनी तयार करून प्रांताकडे द्यावा लागतो. यानंतर त्या प्रस्तावास हरित लवादाची मान्यता घेवून वाळू लिलाव प्रक्रिया राबविण्यात येते. यामुळे अजूनही ९ ठेकेदारांना वाळू ठेके अधिकृतपणे दिले नाहीत. आता वाळू ठेक्यांचे काम पाहणारे उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांचीच बदली झाल्याने नवीन अधिकारी येईपर्यंत ही प्रक्रिया लांबतच राहणार आहे. एकंदरीत, वाळूच जिल्ह्यात मिळत नसल्याने परराज्यातून वाळू आणून सामान्य माणसांना सिमेंटचे घर बांधणे अतिमहाग होत आहे. यामुळे जिल्ह्यातील वाळू ठेके गतीने देण्याची गरज आहे.

अवैध वाळू उपसा, पर्यावरणाचे बिघडत असलेले संतुलन, हरित लवादाने यांत्रिकी बोटीने वाळू उपशावर घातलेली बंदी या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने काही वर्षांपूर्वी वाळू लिलावाचा सुधारित शासन निर्णय काढला होता. या निर्णयात अनेक कडक अटी असल्याने लिलावात ठेकेदार भागच घेत नव्हते. यानंतर या लिलावातील काही अटी शासनस्तरावरून शिथील झाल्यानंतर या वर्षापासून वाळू लिलाव प्रक्रिया सुरू झाल्याचे दिसून येत आहे. आता ठेके वाढू लागल्याने शहर जिल्ह्यातील नागरिकांना फक्त समाधान वाटू लागले आहे.

**अवैध वाळू उपसा सुरूच?**

जिल्ह्यात सध्या ३ ठेके चालू असले तरी त्यांच्याकडून गाळमिश्रीत वाळू मिळत असल्याने काही वाळू एजंट, ठेकेदार हे चांगल्या नदीस्पॉटवरून अवैध वाळू उपसा करून काही बांधकाम व्यावसायिक, बांधकाम काढलेल्या नागरिकांना विकत असल्याचे पालकमंत्री गोरे यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी वाळू तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे आदेश काढले आहेत. इतकेच नाहीतर वाळू तस्करांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. यामुळे अवैध वाळू उपसा कमी झाल्याचे दिसून येत आहे.

**शासकीय कामांनाही येणार गती**

रमाई घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास, इंदिरा आवास यासह इतरही योजनेतून गरिबांना घरकुले मंजूर होतात. मात्र वाळूच मिळणे अशक्य असल्याने बहुतांश कामे अपुरीच राहिली आहेत. तर काही ठिकाणी क्रशसॅन्डचा वापर करून कामे सुरू आहेत. आता वाळू उपलब्ध होण्यास सुरुवात झाली तर बांधकामांचा दर्जाही सुधारणार आहे आणि शासकीय योजनांच्या बांधकामांनाही गती येणार आहे.

**वाळूबरोबर क्रश सँड, खडीचे दरही भरमसाठ**

आपल्याकडे वाळू सहजासहजी मिळणे कठीण बाब असल्याने परराज्यातून येणारी वाळू ते व्यावसायिक तब्बल १० ते १२ हजार रुपये ब्रास अशा चढ्या दराने वाळूची विक्री करत आहेत. ज्या व्यावसायिकांना तातडीने कामे करावयाची आहेत ते हा ज्यादा दर देऊन वाळू घेत आहेत. वाळू मिळत नसल्याने बांधकामधारक व्यावसायिक नागरिक हे वाळूला पर्याय म्हणून क्रश सॅन्ड, डस्टचा वापर करताना दिसू लागले आहेत. याचेही दर भरमसाठ वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांना सिमेंटचे घर बांधणे कठीण झाले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११००

**भुंकती तीं द्यावी भुंको ।**
**आपण त्यांचे नये शिकों ।।**

आपण कसेही वागलो तरी आपणाला नांव ठेवणारे असतातच. आपण कोणाच्या वाट्याला जायचेच नाही, असे ठरवले तरी स्वत: होऊन आपल्या वाट्याला येणारे असतात. त्यामुळे एखाद्याने आपणाला नांव ठेवले म्हणून किंवा एखादा आपल्या वाट्याला आला म्हणून आपण आपला सन्मार्ग बदलण्याचे कारण नाही, किंवा एखादा नांव ठेवतो म्हणून आपण त्याला नांव ठेवणे, एखादा विरोध करतो म्हणून त्याला विरोध करणे योग्य नव्हे. याचा अर्थ अन्याय सहन करावा असा नाही.



प्रसंगानुरुप योग्य ती भूमिका घ्यावी लागते, त्याला संतोचाही विरोध नसतो. पण कोणीतरी शिवीगाळ करतो, बडबड करतो, म्हणून आपण त्याच्याप्रमाणे करणे अपेक्षित नाही. आपण त्याच्याप्रमाणे करीत गेलो तर त्याच्यात आणि आपल्यात फरक काय राहणार? कोणाला काय व किती भुंकझिंर्यचे ते भूंकू द्यावे, त्याच्याप्रमाणे आपण भूंकू नये. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**भुंकतीं ती द्यावी भुंको।**
**आपण त्यांचे नये शिकों।।**

जाणूनबुजून भांडण तंटा करणारी, खोडसाळपणे कांहीतरी उकरून काढणारी अनेक माणसं समाजात आहेत. त्यांना इतरांना अडचणीत आणण्याची किंवा इतरांना कमी लेखण्याची, इतरांना त्रस्त करण्याची एक प्रकारची खाजच असते. दूरवर जाण्यापेक्षा आपणाला आपल्या आवती भोवतीच्या अनेक कुटुंबातही अशी खाज असणारे दिसून येतात. सुन कितीही चांगली वागली तरी एखादी सासू नांव ठेवल्याशिवाय राहात नाही. सुन बोलली तर फार बोलते का? नाही बोलली तर तुझे तोंड माती गेली का? कांही केले तर असे का केलेस? नाही केले तर असे का केले नाहीस? अशा विविध प्रश्नांच्या माध्यमातून कांही सासूंचे भुंकणे चालूच राहते. सासू भुंकते म्हणून सुनेने भुंकणे सुरु केले तर संसाराची राख रांगोळी झाल्याशिवाय राहात नाही.दुसऱ्याचे ऐकून न घेणारे, दुसऱ्याचे मोठेपण सहन न करणारे आणि मी म्हणजेच सर्वस्व म्हणणारे लोकच भुंकणारे असतात. चांगली माणसं भुंकाभुंकीचे काम करीत नाहीत. मीपणा आणि जळाऊवृत्ती भुंकण्याची सवय निर्माण करते. ज्ञानोबा-तुकोबांचे भक्त समजणाऱ्यांना आपण कोण आहोत? याचा खरा परिचय होत असल्याने त्यांच्याकडे मी ला स्थान उरत नाही. जेथे मीच नाही, तेथे जळाऊ वृत्ती निर्माण होण्याचा प्रश्नच नाही. याचाच अर्थ असा होतो की, भुंकणाऱ्याच्या पंक्तीला आपण बसणारच नाही. आपणाला भुंकण्याची सवय तर जडूच नये. पण ज्याला जडली आहे, त्याची सवय मोडण्याचे कौशल्य आपणास प्राप्त व्हावे, ही ज्ञानोबा-तुकोबा चरणी प्रार्थना.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २८ एप्रिल २०२५ | संत टिपरीवालेबाबा पु.ति. |
| विक्रम संवत् २०८१ | आष्टी, जि. वर्धा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा (२१.१२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - भरणी (२१.३८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - आयुष्यमान (२०.०२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - किंस्तुघ्न (११.०५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# डॉ. बाबासाहेबांचे विचार समाजासमोर येणे अभिमानास्पद

## कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा; छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये राष्ट्रीय परिषद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

सामाजिक, न्याय, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर भारतीय समाज उभा असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजासमोर येणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी सांगितले.

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज मध्ये विद्यार्थी विकास विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. दामा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस प्रा. महेश माने सोलापूर विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. प्रभाकर कोळेकर डॉ. केदारनाथ काळवणे डॉ. संजय गायकवाड प्राचार्य डॉ. मधुकर पवार आधीची प्रमुख उपस्थिती होती प्रास्ताविक डॉ. युवराज सुरवसे यांनी केले. प्राचार्य डॉ. मधुकर पवार, प्रा. डॉ. युवराज सुरवसे यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक वैचारिक अधिष्ठान या ग्रंथाचे राष्ट्रीय परिषदेत तीन खंड प्रकाशित करण्यात आले.

वालचंद महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत या परिषदेचा समारोप झाला. यावेळी डॉ. किशोर जोगदंड, डॉ. दशरथ रसाळ, विनोद आखाडे, सुजाता हावळे यांनी शोधनिबंधाचे वाचन केले. तर प्राध्यापक प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी दुसऱ्या सत्रात बीजी भाषण करून लोकशाही बळकट करण्यासाठी आदर्श मूल्यांची अंमलबजावणी करण्याची गरज यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमास प्राचार्य मंजुश्री पाटील, प्रा. सचिन गायकवाड, सिनेट सदस्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रा. डॉ. शीला स्वामी प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे, प्रा.डॉ. विकास शिंदे, प्रा. डॉ. राणी मोटे, प्रा. डॉ. सज्जन पवार, प्रा. डॉ. विष्णू वाघमारे, प्रा. डॉ. धनंजय मोगले, प्रा. डॉ मनोज कसबे, प्रा. डॉ. दरेप्पा बताले, प्रा. रेवण बैरुंणगीकर, प्रा. डॉ. किशोर थोरे प्रा. संतोष गवळी, प्रा.डॉ. वाल्मीक कीर्तीकर, प्रा.डॉ. नागेश गायकवाड, प्रा. डॉ. अभिमन्यू ओहळ, दत्ता भोसले उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सोनाली गिरी व प्रा. लक्ष्मी रेड्डी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अरुण सोनकांबळे यांनी मानले.

# डबल मर्डर प्रकरणी आरोपीस उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

खानदानी दुश्मनीतून दोघांचा खून केला व एकास गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपी हनुमंत बोराडे यांच्या जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन. आर. बोरकर यांच्यासमोर होऊन न्यायमूर्तींनी आरोपी हनुमंत बोराडे याची जामीनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

मयत कृष्णा पाटील व आरोपी बोराडे यांच्यात खानदानी दुश्मनी आहे. आरोपींनी पूर्व वैमनस्यातून कृष्णा पाटील यास जीवे ठार मारण्याचा कट केला व कट रचल्याप्रमाणे कृष्णा पाटील, माणिक सातपुते व सुदाम चव्हाण असे तिघे मोटरसायकल वरून बार्शी कडून ताडसौंदने गावाकडे जात असताना आरोपींनी त्यांच्या मोटरसायकलला समोरून जोरात धडक देऊन खाली पाडून डोळ्यात चटणी टाकून धारदार शस्त्राने डोकीत, पोटावर, हातावर पायावर ,सपासप वार करून कृष्णा पाटील व माणिक सातपुते या दोघांचा खून केला व सुदाम चव्हाण यास गंभीर जखमी करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला, या आरोपाखाली आरोपी हनुमंत बोराडे यास अटक करण्यात आलेली होती. बार्शी सत्र न्यायालयाने आरोपी हनुमंत बोराडे यांचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्याने मुंबई उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत धाव घेऊन जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन.आर.बोरकर यांच्यासमोर झाली. आरोपीचे वकील व सरकारी वकीलांचा युक्तिवाद होऊन न्यायमूर्तींनी आरोपी हनुमंत बोराडे याची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. वीरा शिंदे यांनी काम पाहिले.

# आस्था संस्थेतर्फे स्वामी भक्तांना थंड पेयाचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने १५०० भक्तांना आमरस (माझा) बॉटल वाटप थंड पेय वाटप करण्यात आले.

आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने अक्कलकोट या ठिकाणी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त अक्कलकोट या ठिकाणी स्वामी समर्थ महाराजांची पालखीचे आगमन झाल्यानंतर पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली व श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पालखीतील भक्तांना मंदार पुजारी, मोहित महाराज आनंद तालिकोटी, सुहास छंचुरे, वेदांत तालिकोटी यांच्या हस्ते थंड पेयचे वाटप करण्यात आले. दरम्यान यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांची पालखी मिरवणूक फत्तेसिंह सिंह चौक मेन रोड समाधी रोड व तसेच सुभाष गल्ली या मार्गी काढण्यात आली. यावेळी सिद्धू बेऊर, पिंटू कस्तुरे, योगेश कुंदुर अनिल काळे, गणेश ठेसे, सुरज छंचुरे, उदय छंचुरे, महेश नागणसुरे, सागर शिरशाड, सागर यलवार राज स्वामी आदींचे सहकार्य लाभले.

# राजराजेश्वरी शाळेला उपक्रमशील शाळा पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेला जगद्गुरु महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानतर्फे उपक्रमशील शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रमुख अतिथी जि. प. मुख्यकार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, आहार तज्ञ डॉ. सोनाली घोंगडे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. शैलेश पाटील, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, उत्सव समिती अध्यक्ष सुनील रामशेट्टी, सचिव तम्मा कडगंची, संयोजक मल्लेश पुरवंत आदी मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भगवान परशुराम जयंतीनिमित्त उद्या मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

येथील भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्यावतीने भगवान परशुराम जयंती निमित्त मंगळवार दिनांक २९ एप्रिल रोजी सोलापूर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावर्षीच्या मिरवणुकीचे विशेष म्हणजे या मिरवणुकीचे चित्रीकरण करून पूर्ण महाराष्ट्रभर पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती भगवान परशुराम जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बी.जी. कुलकर्णी आणि महिला अध्यक्षा डॉ. माधुरी दबडे यांनी दिली आहे.



मंगळवारी दुपारी तीन वाजता दत्त चौकापासून मिरवणुकीस सुरुवात होणार आहे. ही मिरवणूक तेथून नवी पेठ, मेकॅनिकी चौक, सरस्वती चौक मार्गे चार पुतळा येथे पोहोचणार आहे. त्या ठिकाणी सायंकाळी सहा तीस वाजता भगवान परशुराम यांच्या मूर्तीची वेद प्रतिष्ठानचे अध्यक्ष ऋषिकेश दादेगावकर आणि गोविंद गवई यांच्या नेतृत्वाखाली ५१ पूर्वहितांच्या मंत्र घोषात प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री साडेनऊ वाजेपर्यंत सोलापूर शहरातील सर्व समाजातील नागरिकांना दर्शनाचा लाभ घेता येईल. तसेच त्याच ठिकाणी दर्शनानंतर प्रसाद म्हणून कैरीची डाळ आणि पन्हे वाटप करण्यात येणार आहे.

या मिरवणुकीत सुमारे २०० ते २५० युवक युवतींचे लेझीम पथक, महिलांची भजनी मंडळ आणि जवळपास ६०० नागरिक एकाच पोशाखात मिरवणुकीत सहभागी होणार. याशिवाय या मिरवणुकीत नाट्य, संगीत, साहित्य, कला, डॉक्टर, वकील, इंजिनियर, व्यावसायिक, राजकीय पक्ष, विविध संघटनांचे पदाधिकारी, समाजातील सर्व क्षेत्रातील अनेक व्यक्ती सहभागी होणार असून भव्य दिव्य अशी ही मिरवणूक निघणार आहे, अशी माहिती या जन्मोत्सवाच्या निमित्ताने स्थापन करण्यात आलेल्या स्वागत समितीचे अध्यक्ष प्रमोद तमन्नवार यांनी दिली. तरी सोलापूर शहरातील सर्व नागरिकांनी मंगळवारी २९ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता निघणाऱ्या भगवान परशुराम जन्मोत्सव मिरवणुकीत सहभागी व्हावे असे आवाहन उत्सव समिती अध्यक्ष बी.जी. कुलकर्णी आणि महिला अध्यक्ष डॉ. माधुरी दबडे यांनी केले आहे.

# जिल्हा व सत्र न्यायालयात लिपिक पदावर अनिल पाटील रुजू

**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**



शेतकरी कुटुंबातील अनिल कामगोंडा पाटील राहणार तडवळ यांनी सोलापूर न्यायालयात लिपिक पदाला गवसनी घातली आहे. महत्वाचे म्हणजे अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून त्यांनी दिवस रात्र शाळेत अभ्यास करून हे पद प्राप्त केले आहे.

पाटील यांचे प्राथमिक शिक्षण श्री जय शंकर प्रशाला तडवळ तालुका अक्कलकोट येथे झाले. त्यानंतर त्यांनी सोलापूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेज येथे रात्र शिक्षण करत टंकलेखक व लघुलेखक परीक्षा उत्तीर्ण केली. दरम्यान, पुणे येथील वकील पी.नारायण यांच्याकडे चार वर्ष नोकरी केली. त्यावेळी पाटील यांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. कष्ट व अभ्यास यात सातत्य राखल्यामुळे जिल्हा व सत्र न्यायालयाची ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे अनिल पाटील यांनी सांगितले. त्यांच्या यशामध्ये त्यांचे काका शिवाजी पाटील व दिलीप पाटील यांचे मोठे योगदान लाभले आहे.

# इस्रायल आणि भारत

**एका टीव्ही चॅनलवर बातमी पाहिली की इस्रायली राष्ट्रप्रमुखांनी आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करून त्यांच्याशी २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर हल्ल्याबाबत त्यांच्याशी चर्चा केली.**

------------------



या दोन राष्ट्रप्रमुखात या फोनवर नेमकी काय चर्चा झाली त्याचा कोणताही तपशील या बातमीत दिला गेला नाही. अर्थात ते सद्यस्थितीत साहजिकच आहे. अशा परिस्थितीत अशा पद्धतीने आपल्या देशाशी संपर्क साधणारा इस्रायल हा काही एकमेव देश नाही आणि पहिला देशही नाही. त्याआधीच अमेरिका, रशिया, सौदी अरेबिया सारख्या वेगवेगळ्या भूगोलातले, वेगवेगळ्या राजकीय-आर्थिक-सामाजिक-धार्मिक पार्श्वभूमीच्या देशांनी या पहलगाम प्रकरणात आपल्या देशाला नि:संदिग्ध पाठींबा जाहीर केला आहे. त्यामुळे त्या अर्थाने या टीव्ही चॅनेल वरील इस्रायल बाबतच्या या बातमीने एक राष्ट्रप्रेमी भारतीय नागरीक म्हणून बरे वाटले असले तरी फारसे आश्चर्य वाटले नाही. मात्र ही बातमी ऐकल्या पासून एक प्रश्न माझ्या मनात घुमू लागला आहे. हा प्रश्न किंवा मुद्दा म्हणजे इस्रायल आणि आपला देश भारत या दोघात किती बाबतीत साम्य आहे आणि त्याचवेळी किती मुद्द्यांवर आणि किती प्रमाणात फरक आहे. इस्रायल आणि भारत या दोन देशातले पहिले आणि अत्यंत महत्त्वाचे साम्य म्हणजे इस्रायल आणि भारत हे दोन्ही देश असे आहेत की त्यांच्या आजूबाजूचे देश त्यांचे हितशत्रू आहेत. या दोन्ही देशांचे त्यांचे भौगोलिक शेजारी त्यांना युद्ध, कट, कारवाई, हल्ले अशा सगळ्या तऱ्हेने त्रास देत असतात. तसेच या दोन्ही देशांच्या त्यांच्या त्यांच्या शेजारी देशांचे असे वागणे हे काहीवेळा त्यांच्या स्वत:च्या डोक्याने असते; तर काहीवेळा त्यांना दुसऱ्या कोणीतरी भरीला घातलेले असते. त्यातही त्यांना अशा तऱ्हेने भरीला घालणारे देश काहीवेळा भौगोलिकदृष्ट्या त्यांच्या आजूबाजूचे असतात तर अनेकदा त्यांच्या पासून भौगोलिक दृष्ट्या खूप लांब असतात. इस्रायल आणि भारत यांच्यातले अजून एक साम्य म्हणजे या दोन्ही देशांचे अलिकडच्या काळातील उगमाचे स्वरूप हे धार्मिक मुद्द्यावर अवलंबून आहे. अलिकडच्या काळातील असे म्हणायचे कारण म्हणजे इस्रायलला एक स्वतंत्र देश म्हणून भौगोलिक स्थान अवघ्या काही दशकांपूर्वी मिळाले आहे. ज्यू धर्मीय व्यक्तींचे हे राष्ट्रस्थान ही तुलनेने अलीकडची घटना आहे. असाच काहीसा प्रकार एका वेगळ्या अर्थाने आपल्या देशाबावतही आहे. एक राष्ट्र म्हणून आपल्या देशाला कित्येक शतकांचा इतिहास आहे. पण १९४७ साली इंग्रजी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवताना हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशा दोन राष्ट्रांत फाळणी होऊन आपल्या सगळ्यांच्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. आणि अशा फाळणीचा पाया फक्त किंवा निव्वळ भूगोल हा नव्हता ; तर या फाळणीचा मुख्य निकष धर्म हा होता. या अर्थाने इस्रायल आणि आपला देश भारत या दोन राष्ट्रांत साम्य आहे. अशा धर्माधिष्ठित साम्याचा अजून एक पैलू आहे. तो म्हणजे एकवेळ इस्रायल आणि आपला देश हिंदुस्थान हा धार्मिक पैलू विसरले किंवा विसरायला तयार असले तरी या दोन्ही राष्ट्रांचे उपद्रवी शेजारी हा पैलू कधीही विसरत नाहीत आणि विसरायला तयार नाहीत. आणि तयार नसतातही. अगदी आत्ता पहलगाम हल्ल्यानंतर अनेक वाहिन्यांवर दाखवण्यात आलेल्या पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांचे व्हिडिओ इथे आणि याबाबत आवर्जून आठवण्याजोगे आहेत. इस्रायल आणि आपला देश भारत यांत असणाऱ्या साम्याचा तिसरा मुद्दा म्हणजे या दोन्ही देशांच्या बदलत्या सकारात्मक आर्थिक व राजकीय परिस्थितीचा प्रवास हा बऱ्याच अंशी समान, निदान समांतर आहे. आणि या दोन देशांची प्रगती हा त्यांच्या शेजारी राष्ट्रांचा अनेकदा असूयेचा विषय आहे. तसेच इतका त्रास देऊनही इस्रायल आणि आपला देश भारत प्रगती पथावर रहातात हे या दोन देशातले महत्त्वाचे साम्य आहे. आपल्या भारताच्या याबाबतच्या प्रवासाचे आपण सारेच साथीदार आणि साक्षीदार आहोत. इस्रायलच्या याबाबतच्या प्रवासाचे प्रत्ययकारी वर्णन आदरणीय ना.ह. पालकर यांच्या इस्रायल : छळाकडून बळाकडे या पुस्तकात वाचायला मिळते. मला तर अनेकदा वाटतें की इस्रायल आणि आपला देश भारत या दोन्ही देशांच्या अलिकडच्या काळातील इतिहासाचे वर्णन छळाकडून बळाकडे अशाच शब्दात सहजच करता येईल. इस्रायल आणि आपला देश भारत यांच्यात असणारे चौथे साम्य (काही प्रमाणात फरकही ) म्हणजे अमेरिका या महासत्तेशी असणारे संबंध! इस्रायल आणि आपला देश भारत यांच्यात अशी काही साम्यस्थळे आठवत असतानाच लक्षात येते की या दोन देशात जशी काही साम्यस्थळे आहेत तशी काही फरक सांगणारीही स्थळ आहेत. इस्रायल आणि आपला देश भारत यांचे जगाच्या नकाशात त्यांचे स्थान भौगोलिक दृष्ट्या वेगवेगळ्या ठिकाणी आहे हा त्यांच्यातील पहिला फरक. इस्रायल आणि आपला देश भारत यांचा देश म्हणून भौगोलिक आकारही कमालीचा वेगवेगळा आहे हा त्यांच्यातील दुसरा फरक.

इस्रायल आणि आपला देश भारत यांच्या अर्थव्यवस्थेचा आकार आणि अर्थव्यवस्थेचे स्वरूप कमालीचे वेगळे आहे हा या दोन देशातील तिसरा फरक. इस्रायल आणि आपला देश भारत यांच्यात असणारा चौथा आणि महत्त्वपूर्ण फरक म्हणजे इस्रायलला फार हलक्यात घेण्याची चूक केवळ त्यांचे शेजारीच देश करत नाहीत असे नव्हें; तर कोणताच देश करत नाहीत. त्यांच्या या प्रतिमेत इस्रायल या देशाच्या मोसाद या केंद्रीय गुप्तहेर संघटनेचा फार मोठा वाटा आहे. इस्रायल विरोधी कृत्ये करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचा छडा लावताना आणि असा छडा लागल्यावर त्यांच्यावर निर्णायक कारवाई करण्याचा त्यांचा दबदबा प्रचंड आहे. म्युनिक ऑलिम्पिकमधे इस्रायली खेळाडूंची निघृण हत्या झाल्यावर तब्बल १८ वर्षे सातत्यपूर्ण तपास आणि कारवाई करूनच तो देश त्याबाबत थांबला हे फार फार अविस्मरणीय आहे. याचा आणि अशा सारख्या प्रतिमेचा धसका असतोच. आपला देश भारत याबाबत इस्रायलशी बरोबरी करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे आणि हा इस्रायल आणि आपला देश भारत यांत असणारा मोठा फरक आहे. अजित डोवाल, आपल्या देशाची गुप्तहेर संघटना, उरी सर्जिकल स्ट्राईक अशा घटना आणि घटनामुळे याबाबतचे इस्रायल आणि आपला देश भारत यांत असणारे अंतर आता कमी होऊ लागले असले तरी ते आणि त्याबाबतचे अंतर आजही मोठे आहे हे निर्विवाद सत्य आहे. अशावेळी Both Perception as well as Performance matter हे आहेच, असतेच आणि उरतेच ! इस्राएल आणि आपला देश भारत यात असणारा पाचवा आणि सगळ्यात महत्त्वाचा फरक म्हणजे जेंव्हा जेंव्हा इस्रायल वर देशाबाहेरील किंवा देश विरोधी घटक हल्ला करतात किंवा या ना त्या स्वरूपात इस्रायल हा देश आणि इस्रायली जनता यांना त्रास देतात तेंव्हा इस्रायल हा देश एकजूट होऊन त्याचा मुकाबला करतात. इस्रायल मधे राहून, त्या देशाच्या राजकारणात-समाजकारणात कार्यरत राहून, अडचणीच्या काळात वेगळा सूर इस्रायलमधे लावला जात नाही.

याबाबत आपल्या देशातील स्थिती कशी आणि काय असते हे सर्वज्ञात आहे. इस्रायल आणि आपला देश भारत यांत असणारा सहावा आणि असाच अत्यंत महत्वाचा फरक म्हणजे इस्रायल जेंव्हा त्यांच्या देशाच्या विरोधी असणाऱ्या घटकांवर युद्धाची कारवाई करते तेंव्हा युद्ध केल्याने आपला देश सर्वार्थाने मागे जाईल असा रडका सूर त्या देशात कधीही लावला जात नाही. उलटपक्षी या ना त्या स्वरूपात युद्धाला तोंड देण्याचा वारंवार प्रसंग त्या देशावर येऊन सुद्धा तो देश समृद्ध आणि संपन्न आहे. आणि म्हणूनच इस्रायली राष्ट्र-प्रमुखांनी आपल्या देशाच्या पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांना पहलगाम प्रकरणी फोन केल्याची बातमी ऐकल्यावर हे लिहावेसे वाटले. इस्रायल आणि आपला देश भारत.

**- चन्द्रशेखर टिळक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्वाचे...



## हजरत शेख नूरुदीन बाबा सेवा मंडळातर्फे स्वामी भक्तांना प्रसाद वाटप

**अक्कलकोट, दि. २७ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अक्कलकोट येथील सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान एकात्मतेचे प्रतिक हजरत शेख नूरुदीन बाबा सेवा मंडळ यांच्या वतीने स्वामी भक्तांना संपूर्ण दिवसभर प्रसाद व थंड पाणी वाटप करण्यात आले. या प्रसादाचा लाभ अनेक स्वामीभक्तांनी व अक्कलकोट वासियांनी घेतला. यावेळी अक्कलकोट नरेश मालोजीराजे भोसले, आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री विजयकुमार देशमुख, अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेंजय भोसले, महेश हिंडोळे, बसलिंगप्पा खेडगी, पत्रकार स्वामीराव गायकवाड, पत्रकार रमेश भंडारी, पुण्याचे स्वामीभक्त नरेश अहिर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. अब्दुलरजाक उर्फ ऐ.के. पिरजादे, सज्यादे अहमदपाशा पिरजादे, लायन्स क्लबचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजशेखर कापसे, पत्रकार विरूपाक्ष कुंभार, कवी होटकर, पत्रकार नंदकुमार जगदाळे, शिवाजी मुसळे, सैफन मिस्त्री, असिमपाशा पिरजादे, वसीमपाशा पिरजादे, नईमपाशा पिरजादे, कुंभार कुटुंबीय, होटकर कुटुंबीय यांनी परिश्रम घेतले.



## बार्शीची ज्ञानपरंपरा वृद्धिंगत करणारे यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालय : डॉ. पालके

**बार्शी, दि.२७ एप्रिल-**

बार्शीचे यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती वाचनालय ज्ञानपरंपरा वृद्धिंगत करणारे तसेच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, आर्थिक वारसा जतन करणारे बलस्थान असल्याचे मत प्राचार्य डॉ. ए.बी. शेख, ग्रंथपाल प्रा. माधव टिपरसे, डॉ. विजयकुमार भांजे, डॉ. राहुल पालके यांनी व्यक्त केले. शिवाजी महाविद्यालयातील या यशवंतराव चव्हाण ग्रंथालयात दुर्मिळ ग्रंथ आहेत जागतिक पुस्तक दिनानिमित्त येथे कार्यक्रम घेण्यात आला. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, शाहीर अमर शेख यांनी बार्शीला एक वेगळे वलय प्राप्त करून दिलेले आहे. बार्शी हे शिक्षण पंढरी म्हणून ओळखले जाते. बार्शीची ओळख यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयानेही होते. या ग्रंथालयात सुमारे दीड लाख पुस्तके आहेत. दरवर्षी चार हजार वाचक या ग्रंथालयाला भेट देतात. ग्रंथसंपदा बार्शीचा ठेवा आहे. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृती संग्रहालय ग्रंथालयाची शोभा वाढविते. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संत व समाज सुधारक केंद्र हे भारतातील संत परंपरा व समाजसुधारकांचा परिचय करून देणारे संपन्न दालन आहे. डीएलआरएसी, ई रिसोर्सेस अक्सेस सेंटर, ओपेक, क्यू आर कोड , वाचन कक्ष ही ग्रंथालयाची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.



## रामभाऊ जोशी हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**करकंब, दि. २७ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने आयोजित शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत रामभाऊ जोशी प्रशालेतील इयत्ता आठवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रसाद लोंढे, ऋतुजा ढोबळे, चंदाराणी केदार, सार्थक व्यवहारे या विद्यार्थ्यांनी तर इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत तनिष्का टकले, शरयू टकले, रुद्र मोरे, सोहम गुजरे, कीर्तीराज देशमुख, पवन भोसले या विद्यार्थांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना शिक्षीका मनिषा ढोबळे, शिक्षक संजय पाटील, अभिषेक चोपडे इंग्रजी विभाग,एस.व्ही दहीगिरे मराठी विभाग, एम. के. पुजारी बुद्धीमत्ता, गेस्ट लेक्चरर महादेव व्यवहारे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थांचे दयानंद शिक्षण संस्था सोलापूर स्थानिय सचिव महेश चौप्रा,प्रशासक डॉ.विजयकुमार उबाळे, प्राचार्य हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे यांनी अभिनंदन केले.

## करकंब येथे सकल जैन समाजाच्या वतीने निषेध मोर्चा

**करकंब, दि. २७ एप्रिल-**

मुंबई विलेपार्ले येथील दिगंबर जैन मंदिर पाडल्याचा व पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ करकंब येथे सकल जैन बांधवांच्यावतीने मूक मोर्चा काढून निषेध करण्यात आला.यावेळी राजेश शहा, भारत शहा, दिलीप पुरवत, बाहुबली पुरवत,दिलीप खडके, अंजली पुरवत, वंदना पंत, वरुण पुरवत आदी समाज बांधव उपस्थित होते. करकंब पोलिस स्टेशनला समस्त जैन समाजाच्यावतीने आम्ही मुंबई विलेपार्ले येथील जैन मंदिराच्या अन्यायकारक विध्वंसाच्या निषेधार्थ एकत्र आलो असून ही एक इमारत नव्हती तर शांतता, सहिष्णूता आणि सामुदायिक ऐक्याचे प्रतीक होते. शासनाने कोणत्याही पूर्व सूचना न देता कायदेशीर प्रक्रियेकडे दुर्लक्ष करून दिगंबर जैन मंदिर पाडले. जे संविधानाच्या धर्म स्वातंत्र्याच्या मुलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. आम्ही मागणी करतो की तीस दिवसांच्या आत मंदिराची पुनर्बांधनी करण्यात यावी. जबाबदार अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. भविष्यात धार्मिक स्थळांच्या संरक्षणासाठी कठोर नियम करण्यात यावेत. हा प्रश्न केवळ जैन समाजापुरता मर्यादित नसून संपूर्ण लोकशाही व मूल्यांशी निगडित आहे.अश्या प्रकारचे निवेदन देऊन पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्याचा निषेधही यावेळी करण्यात आला.

# टाळ-मृदुंग अन्‌ ढोलच्या निनादात मिरवणूक

## अक्कलकोटमध्ये विविध गावातील दिंड्यासह नगरप्रदक्षिणा; पुण्यतिथी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ एप्रिल-**

दत्त अवतारी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतिथीनिमित्त शहरातील पालखी मार्गावरून श्री स्वामी समर्थांचा पालखी सोहळा मिरवणूक संपन्न झाला.

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने सायंकाळी ५:३० वाजता मंदिरातून पालखी मिरवणुकीस भक्तीभावाने व अपार श्रद्धेने प्रारंभ झाला. प्रारंभी देवस्थानचे पुरोहित मंदार महाराज पुजारी यांचे हस्ते श्रींची आरती झाली. यानंतर श्री वटवृक्ष मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते पालखी पूजन होऊन प्रस्थान झाले.



पालखी सोहळ्यामध्ये टाळ मृदूंगाचा गजर, सुश्राव्य बँड पथक, दिंडी, व स्वामी नामाचा गजर, तसेच ढाकणी, चिकुर्डा, वडगांव, खामसवाडी, उदतपूर, तावशी, उस्मानाबाद, काटगाव आणि काटी (ता. तुळजापूर) येथून आलेल्या वारकरी दिंडया, ढोल पथक यामुळे पालखी सोहळा रंगला होता. याच बरोबर स्वामी नामाच्या जय जयकाराने सर्व आसमंत दुमदुमून गेला होता. संपूर्ण मंदिरास नयनरम्य अशी आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. पालखी सोहळ्याचे चौकाचौकात भाविकांनी रांगोळी व गुलाबपुष्पांच्या उधळणासह स्वागत करून दर्शन घेतले. फत्तेसिंह चौक, समर्थ चौक, सावरकर चौक, कारंजा चौक मार्गे समाधी मठाकडे पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाले. समाधी मठात पालखीचे पूजन, भजन होऊन कारंजा चौकमार्गे सुभाष गल्ली, भारत गल्ली, देशमुख गल्ली मार्गे वटवृक्ष मंदिरात पालखी विसावली. वटवृक्ष मंदिरात भजन, विडा, चौरी, आरती होऊन शिरा प्रसाद वाटपाने पालखी सोहळ्याची सांगता झाली. स्वामी पुण्यतिथी निमित्त श्रीमंत मालोजी भोसले राजेसाहेब व कुटूंबीय, आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, तहसीलदार विनायक मगर, पो.नि.राजेंद्र टाकणे, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, बसलिंगप्पा खेडगी, मिलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे आदी मान्यवरांनी श्रींचे दर्शन घेतले. तसेच पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील कानाकोपर्यातून स्वामीभक्त अक्कलकोट नगरीत दाखल झाले होते. यावेळी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, संपतराव शिंदे, प्रथमेश इंगळे, दयानंद हिरेमठ, प्रसन्न हत्ते, नागनाथ जेऊरे, प्रमोद हिंडोळे, अमर पाटील, डॉ. मनोहर मोरे, रामचंद्र समाणे, शिवानंद स्वामी, प्रदीप हिंडोळे, राजेंद्र हत्ते, चंद्रकांत सोनटक्के, दीपक जरीपटके, शिवशरण अचलेर, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, संजय पाठक, गिरीश पवार, शशिकांत लिंबीतोटे, श्रीनाथ महानुरे, अक्षय सरदेशमुख, ज्ञानेश्वर भोसले, संतोष जमगे, मंगेश फुटाणे, स्वामीनाथ लोणारी, संतोष पराणे, संजय पवार, प्रसाद सोनार, भीमा मिनगले, मोहन जाधव, गणेश दिवाणजी, शरणप्पा लिंबीतोटे, किरण किरात, योगेश पवार, रवी मलवे, महेश मस्कले, चंद्रकांत गवंडी, गोकुळ गवंडी, सुनील गवंडी, लक्ष्मण घंटे, स्वामीराव मोरे, अशोक घंटे, विजयकुमार कडगंची, मल्लिनाथ बोधले, मेघना शहा, अपर्णा राशीनकर, ज्योती जरीपटके, सुवर्णा जाधव, मंगल फडतरे, कौशल्या जाजू, निंगू हिंडोळे आदी देवस्थानचे पदाधिकारी, भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रताप मंडळाच्या उन्हाळी कला, क्रीडा प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ एप्रिल-**

ग्रामीण भागातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळातील कौशल्याचे प्रशिक्षण मिळावे व विद्यार्थ्यांच्या सुप्त कला कौशल्याचाही विकास व्हावा या हेतूने मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील व अध्यक्षा स्वरूपारांणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप क्रीडा मंडळाच्या मोफत उन्हाळी क्रीडा व कला प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ झाला.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, शंकरनगर येथे आयोजित केलेल्या या प्रशिक्षण शिबिराचे उदघाट्न शंकरनगरचे ग्रामविकास अधिकारी विजयकुमार नवले यांच्या हस्ते झाले. या वेळी मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, सचिव बिभीषण जाधव, वेटलिफ्टिंग खेळातील राष्ट्रीय खेळाडू अक्षय कट्टीमनी, संजय झंजे, संचालक भीमाशंकर पाटील, राहुल गायकवाड, विशाल लिके, खजिनदार सुहास थोरात, सहाय्यक फिरोज तांबोळी, मंडळाचे सदस्य, खेळाडू,कलाकार, पालक उपस्थितीत होते.



प्रस्ताविकात सचिव बिभिषन जाधव म्हणाले या शिबिरातील क्रीडा प्रकारासाठी २५३ खेळाडू व कला प्रकारासाठी ७९ विद्यार्थी असे ३३२ मुलां- मुलींनी सहभाग घेतला आहे. शिबिरामध्ये क्रीडा प्रकारात वेटलिफ्टिंग, हॉलीबॉल, थलेटिक्स, कबड्डी, योगासने या खेळांचे व कला शिबिरामध्ये काच काम (ग्लास पेंटिंग) व माती काम (क्ले वर्क) या कलेचा समावेश आहे. उद्घाटनाप्रसंगी विजयकुमार नवले म्हणाले, प्रताप क्रीडा मंडळाने या परिसरच्या ग्रामीण भागातील खेळाडूंना मागील अनेक वर्षापासून मोफत क्रीडा प्रशिक्षण दिले आहे. ही बाब खेळाडूसाठी भाग्याची असून यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण होतील. हे उन्हाळी क्रीडा व कला शिबीर चार दिवस सकाळी ७.०० ते ९.३० यावेळेत होत असून यामध्ये क्रीडा शिबिरास यशवंत माने देशमुख, खंडाप्पा कोरे, अनिल मोहिते, ए व्ही बनसोडे, एस.व्ही. चव्हाण, डी.ए. सय्यद, टी. वाय. शिंद, एच.डी. साळुंखे, एस.डी.राऊत, बी.बी. पाटील, यू.एम. भिंगे, आर.एस.लोंढे, एच.पी. वाघमोडे, पी.एस. पांढरे, ए. व्ही. बनसोडे, एन. डी. बनजगोळकर, एस.एस.पाटील तर कला प्रशिक्षणासाठी तानाजी काशीद, धन्यकुमार साळवे, विशाल लिके, दत्तात्रय शिंदे, सिद्धनाथ टिंगरे, शामराव कुंभार, शशिकांत पिसे, माधुरी भांगे हे प्रशिक्षण देणार आहेत. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले.



## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे प्रा. शिवाजी कापसे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शिवाजी कापसे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बाडी सदस्य शहाजी डोंगरे, लिगाडे, नवनाथ जगदाळे, विभागीय अधिकारी रयत शिक्षण संस्था सातारा, दिनेश दाभाडे, बाजीराव माने, बाळासाहेब शिरकांडे, स्थानिक स्कूल कमीटी सदस्य संग्रामसिंह जहागिरदार, गणेश पाटील, कदम, बाळासाहेब साळुंखे, वसंतराव शिरकांडे, केशव साळुंखे, माजी सरपंच अमोल मदने, आरिफखान पठाण, अड. वैभव मेथवडे उपस्थित होते. सूत्रसंचालन मानू व लिंगे यांनी केले तर आभार ज्येष्ठ शिक्षक माळी यांनी मानले.

## पंढरपुरातील डॉ. मनोज भायगुडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ एप्रिल-**

रोटरी इंटरनॅशनल मेगा सर्जिकल कॅम्पचे आयोजन भारत सरकार आणि जम्मू काश्मीर सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या कॅम्पसाठी पंढरपूर येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. मनोज भायगुडे उपस्थित राहून हजारो गरीब रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्याबद्दल त्यांचा सत्कार मुंबई येथील उद्योजक अजित कंडरे यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकेचे अध्यक्ष डॉ. श्रीधर यलमार उपस्थित होते. रोटरी इंटरनॅशनलच्या वतीने दोडा आणि किस्तवड जिल्हा प्रशासन आणि आरोग्य वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सहकार्याने दुर्गम भागातील रुग्णांसाठी आठ दिवस मोफत उपचार आरोग्य कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पसाठी मागील पाच वर्षांपासून भायगुडे हे उपस्थित राहतात. मेगा सर्जिकल कॅम्पमध्ये ७५० रुग्णांवर अत्यंत प्रभावीपणे शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्याचप्रमाणे आपणास या कार्यासाठी सरकारच्या वतीने निमंत्रित करण्यात येत असल्याने आपण आपल्या कार्याचा हा सन्मान समजतो असे मत डॉ.मनोज भायगुडे यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे आपण जम्मू कश्मीर येथे आरोग्य शिबीर राहत असतानाच पहेलगाम हल्ला झाला अतिशय दुर्दैवी असा हा हल्ला झालेला असताना आपण तिथेच काश्मीरमध्ये सेवा कॅम्पवरती कार्यरत होतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी रेखा चंद्रराव, कार्तिकेय कंडरे, अभिजीत कंडरे उपस्थित होते.

## भाळवणीत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ एप्रिल-**

भाळवणी (ता. पंढरपूर) येथील महादेव मंदिर ते दलाशी विहीर या रस्त्याचे भूमिपूजन सरपंच रणजीत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना (ठाकरे गट) पंढरपूर विभागाचे जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे होते.



यावेळी सरपंच रणजीत जाधव म्हणाले, या गावचा सर्वात मोठा सण म्हणून गुढीपाडव्याच्या दिवशी गावातून कावड मिरवणुकीचा सण साजरा केला जातो. या कावडीसाठी आवश्यक असणारे पाणी दलाशीच्या विहिरीतून आणून महादेव मंदिरास जलाभाषिक केला जातो. गावातील पाच कावडीच्या करिता रस्ता नव्हता पण पंचायत समिती सदस्य संभाजी शिंदे यांच्या सहकार्यातून या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी राजाराम लोखंडे, रंगनाथ लोखंडे, वसंत लाले, पोपट इंगोले, मधुकर गायकवाड, मुरलीधर लोखंडे, बाळासाहेब गायकवाड, गणेश गवळी, सोन्या शिंदे, सुरज गवळी, धनाजी लोखंडे, बाबासाहेब लोखंडे, सचिन लोखंडे, दीपक शिंदे, शिवाजी लोखंडे, दत्ता लोखंडे, बाळासाहेब लोखंडे, गुंडाप्पा चव्हाण, गणेश मोहिते, सचिन लोखंडे, रनजीत गवळी, सुनील पवार, विलास माने, बाबासाहेब गायकवाड, राजू शिंदे, हनुमंत लोखंडे, प्रसाद वाघमारे, सुनील पवार, अण्णा वाघमारे, चंद्रभागा कारखान्याचे अधिकारी सावंत, अरुण लोखंडे, छोट्या पटेल, बाळू मुजावर उपस्थित होते. आभार प्रवीण शिंदे यांनी मानले.

# दहिगाव येथे विविध विकासकामांचे उद्‌घाटन

### माजी आमदार राम सातपुते यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २७ एप्रिल-**

माजी आमदार तथा भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राम सातपुते यांच्या विशेष प्रयत्नातून मौजे दहिगाव ता. माळशिरस येथील नाकुरे वस्ती फुले वस्ती ते एकशिव रस्ता उद्घाटन सावंतनगर पाटील वस्ती इलेक्ट्रिक डीपी उद्घाटन, बुधावले वस्ती डीपी उद्घाटन सोहळा माळशिरसचे विधानसभेचे माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



> गेल्या ४० वर्षांपासून आम्हा शेतकऱ्यांना डीपी बसवून मिळवा म्हणून आम्ही पुढाऱ्यांकडे प्रयत्न करीत होतो परंतु आम्हाला डीपी मिळाला नव्हता इथल्या पुढाऱ्यांनी ४० वर्ष आमच्या मताचा फक्त वापर केला माजी आमदार राम सातपुते यांच्याकडे आम्ही डीपी बसवण्याबाबत मागणी केली असता दहा दिवसात डीपी बसवतो म्हणून सांगितले आणि खरेच अकराव्या दिवशी डीपी बसवून आमच्या वस्तीवर लाईट लागली.
>
> **- शंकर नाळ, शेतकरी बुधावले वस्ती दहिगाव**

यावेळी शिवप्रसाद समूहाचे शरद मोरे, भाजप ओबीसी जिल्हाध्यक्ष बी वाय राऊत, भाजप किसान सेल जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, भाजप ओबीसी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वावरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष बाजीराव काटकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चेचे जिल्हाध्यक्ष बाबुराव खिलारे, सचिन खिलारे, भाजप नातेपुते मंडल अध्यक्ष संजय देशमुख, माळशिरस मंडल अध्यक्ष मोहिते, पत्रकार भैस, राहुल पाटील, सुभाष पाटील, शंकर नाळे, सुरेश पाटील, राजेंद्र पाटील, गजानन पाटील, शहाजी पाटील, पोपट पाटील, विक्रम पाटील, महेश पाटील, विश्वतेज पाटील, शिवतेज पाटील, शितल पाटील, प्रकाश पाटील, अमोल पाटील, अजित शिरतोडे सुनील बनकर मानसिंग पाटील, सागर पाटील, अमोल किर्दक, पप्पू बुधावले, हर्षद खंडागळे, किरण गोडसे, सचिन किर्दक, महावितरणचे रुपनवर उपस्थित होते.

दहिगाव येथील नाकोरे वस्ती फुले वस्ती ते एकशिव रस्त्यामुळे तेथील लोकांची जाणे येण्याची चांगली सोय होणार आहे त्याचप्रमाणे सावंत पाटील वस्ती व बुधावले वस्ती येथ डीपी बसवल्याने तेथील शेतकऱ्यांचा लाईटचा प्रश्न मिटला आहे

## शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एस.पी. स्कूलचे नेत्रदीपक यश

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २७ एप्रिल-**

शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये संचलित एस.पी.स्कूलचे इ.५वी मधून ३० पैकी २९ व इ.८वी मधून १२पैकी ११ असेएकूण ४२पैकी ४०विद्यार्थी पात्र झाले. यामध्ये इ.पाचवीमधून अभिजीत देशपांडे २५०, विद्या कदम २४०, आरोही भोसले २३०, यशराज व्यवहारे २२८, वेदिका उलभगत २२६, प्रणव चव्हाण २२२, शरण्या सुरवसे २२२, आर्या बाबर २१४, शौर्य सातुरे २१२, प्रांजल नाईकनवरे २१२, रुद्र बोबडे २०६, संस्कार पाटील २०४, सृष्टी भूते २०४, यशराज गुंड २०२, आदर्श वलगे १९६, सयाजी शेवतकर १९६, प्रतिक पाटील १९६, उत्कर्ष झुरळे १९२, विराज पवार १९२, श्रेया मोरे १८८, प्रगती पाटील १८४, प्राजक्ता तोंडले १७४, आराध्या गोदे १६८, शिवराज पाटील १६४, संस्कृती कदम १६४, धनश्री व्यवहारे १६०, सार्थक पवार १५८, सार्थक बेलदर १५२, ऋत्विक करांडे १५२ गुण तसेच इयत्ता आठवीमधून अहिल्या तळेकर २६२, क्षितीज जोशी २४६, समृद्धी काटकर २४४, राणाप्रताप तळेकर २३४, स्वराली जवळेकर २०४, रविराज नायकुडे १९८, कृष्णा खारे १९४, हर्षदा फासे १८२, आदिती शिंदे १७८, श्रीराम खळगे १४८, तन्मय माने १४२ असे गुण मिळवून या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक डॉ. नंदकुमार होनराव, संस्थापक अध्यक्ष डॉ. संतोष वलगे, सचिव अश्वराज वाघ, खजिनदार विक्रम भिंगारे, सहसचिव बाळासाहेब चव्हाण, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना साईनाथ कुंभार,माऊली मोकळे, सचिन डोके, विश्वास जवळेकर, विद्या कोरके, करुणा हजारे, प्रदीप जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ माळशिरसमध्ये कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २७ एप्रिल-**

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ माळशिरस शहरात आज कडकडीत बंद पाळण्यात आला शिवसेना (शिंदे गट) यांच्यावतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते




जम्मू-काश्मीर मधील पहेलगाम येथे पर्यटनासाठी आलेल्या नागरिकांवर अतिरेक्यांनी अंधाधुंद गोळीबार केला या गोळीबारात २७ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला या भ्याड हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याने या हल्ल्याच्या निषेधार्थ शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. अत्यावश्यक सेवा वगळता शहरातील सर्व व्यवसाय बंद होते बंदच्या पार्श्वभूमीवर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## महत्वाचे...




### मंदिर पाडल्याच्या निषेधार्थ मोडनिंब येथे जैन समाजाचा मोर्चा

**मोडनिंब, दि. २७ एप्रिल-**

मुंबईतील विलेपार्ले येथील जैन मंदिर पाडल्याच्या निषेधार्थ मोडनिंब (ता.माढा)येथील सकल जैन समाज रस्त्यावर उतरल्याचे दिसून आले. मोडनिंब शहरातून आक्रोश मोर्चा काढून जैन समाजाने निषेध नोंदवला. विलेपार्लेतील जैन मंदिर पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होऊन मंदिराचे पुनर्निर्माण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. विलेपार्ले येथील जैन मंदिर पडल्याच्या निषेधार्थ रविवारी जैन समाजाच्यावतीने आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शिवशक्ती चौक येथून १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर येथून सकाळी आठ वाजता निघालेला आक्रोश मोर्चा जय भवानी चौक,दत्त चौक, स्टेशन रोड मोडनिंब असा काढण्यात आला. मोर्चात सुकुमार शहा, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, विशाल मेहता, विशाल मेहता, निलेश गुरसाळकर, मिलिंद गांधी, प्रमोद गांधी, अजित खडके, प्रेम गांधी, क्षितिज शहा, अर्णव शहा, रोहित गांधी, अक्षय गांधी, अथर्व खडके, संकेत पुरवत सहभागी झाले होते.



### मोडनिंब येथे श्री स्वामी समर्थांचा पुण्यतिथी सोहळा उत्साहात

**मोडनिंब, दि. २७ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थांचा १४७ वा पुण्यतिथी सोहळा मोडनिंब (ता. माढा) येथील छत्रपती शिवाजी महाराज नगरमधील जोतिबा मंदिर,श्री स्वामी समर्थ मंदिरात पार पडला. श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा... श्री अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त.. सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज कि जय असा नामघोष करत पार पडला. कार्यक्रमास आ. अभिजीत पाटील यांनी उपस्थिती लावली होती. दुपारी १२ वाजता महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी नंतर त्यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती करण्यात आली. आरतीनंतर त्यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधला. आध्यात्मिक व सामाजिक कार्यातून गावाच्या एकतेची आणि संस्कृतीची आरतीनंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे चंद्रकांत गिड्डे, प्रकाश गिड्डे, बाबूराव सुर्वे, एकनाथ सुर्वे, संतोष पाटील, शशीकांत गिड्डे, सुधीर सुर्वे, ॲड. विजय गिड्डे, राज पाटील,शिवाजी गोरे, मयूर नामदे,अभिजीत गिड्डे,सचिन गिड्डे उपस्थित होते.



### हज यात्रेसाठी जाणाऱ्या दुधनीतील दोघांचा सत्कार

**अक्कलकोट दि.२७ एप्रिल**

तालुक्यातील दुधनी येथील सुपुत्र मोहम्मद गौस रफिक नदाफ (क्राईम ब्रांच, पिंपरी-चिंचवड) व मोहम्मद सैफ रफिक नदाफ (पोलीस दल, पुणे शहर) हे सन २०२५ मध्ये हज यात्रेसाठी जाणार असून त्यानिमित्ताने त्यांचा सत्कार अक्कलकोट येथील हजरत दाता शाह कादरी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रम अलाउद्दीन झळकी व आझम शेखजी हाजी मोहम्मद रफिक सैपनसाब नदाफ यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. गुलपोशीच्या या सोहळ्यात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.तसेच संत सोपी दातापीर यांचाही सत्कार आजी रफिक नदाफ यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमास उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये इरफान दावणा, हुसेन बळुर्गी, याकूब मौलाना, मेदिमिया जिडगे, इमामशा मकानदार, सलीम मौलाना, रियाज नदाफ, महमद बांगी, युसुफ नदाफ, बाबू मोमीन, अली जिडगे, मेहराज जीडगे, रफिक नदाफ यांचा समावेश होता.कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी भावी हज यात्रेसाठी शुभेच्छा देत, सामाजिक एकतेचे आणि धार्मिक श्रद्धेचे दर्शन घडवले.

### श्री परशुराम जयंतीनिमित्त सांगोल्यात विविध कार्यक्रम

**सांगोला, दि. २७ एप्रिल-**

श्री परशुराम जयंतीनिमित्त मंगळवार दि.२९ एप्रिल रोजी सांगोल्यात दत्त मंदिर, महादेव गल्ली येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती परशुराम युवा मंच, सांगोला यांनी दिली. यावेळी ॲड. सारंग वांगीकर, डॉ. मानस कमलापूरकर, श्रीकांत हसबनीस, संजय हसबनीस, कौस्तुभ भोसेकर, सचिन बेले, कुमार कुलकर्णी, निलेश ताकभाते, तेजस कुलकर्णी, रवी कुलकर्णी, संस्कार कमलापुरकर, नंदकुमार लऊळकर उपस्थित होते. मंगळवारी सकाळी श्री परशुरामाच्या पादुकाचे पूजन व अभिषेक करण्यात येणार आहे. संध्या.५.३० वा. श्री परशुरामाच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी इयत्ता पहिली ते कॉलेजमधील विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी श्री परशुरामांच्या गोष्टी, कथा यांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रत्येक सहभागी विद्यार्थी यांना बक्षीस म्हणून आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. कार्यक्रम झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी तालुक्यातील व शहरातील सर्व परशुराम भक्तांनी सहकुटुंब या कार्यक्रमास हजर रहावे, असे आवाहन परशुराम युवा मंच यांनी केले आहे.

## मोडनिंबमध्ये वृक्ष संवर्धनासाठी ज्येष्ठांचा पुढाकार

### रेल्वे स्टेशन परिसरात केले वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२६ एप्रिल-**

ज्या वयात शरीर विश्रांती मागतं, त्या वयात काहीजण मात्र नव्या उमेदीने समाजासाठी पुढे सरसावतात. मोडनिंब (ता.माढा) येथील ज्येष्ठ नागरिकांनी असंच काहीसं प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. उन्हाळ्याच्या तडाख्यातही आपल्या गावाच्या रेल्वे स्टेशन परिसरात त्यांनी झाडांना जीवनदान देण्याचा विडाच जणू उचलला आहे. गावातील रेल्वे स्टेशन परिसरात झालेल्या आधुनिकीकरणामुळे सावलीचा अभाव निर्माण झाला. ही उणीव भरून काढण्यासाठी पर्यावरण प्रेमी तानाजी इंगळे आणि संतोष सुर्वे यांच्या पुढाकाराने आणि 'पतंजली योग ग्रुप'च्या सहकार्याने दोन वर्षांपूर्वी वृक्षारोपण करण्यात आले.

रेल्वे प्रशासनही या उपक्रमाला साथ देण्यासाठी पुढे आले. सुमारे पंचवीस ते तीस अधिक झाडांची लागवड झाली,



**फुले, फळे, औषधी गुणधर्म असलेले वृक्ष**

वड, पिंपळ, चाफा, बदाम, अशोक, कडुनिंब, गुलमोहर, जांभूळ, निलगिरी आणि तुळस यांसारख्या विविध झाडांची लागवड करण्यात आली आहे. काही झाडं सावली देतात, काहींनी परिसर फुलवला आहे, तर काहींमधून औषधी गुणधर्म लाभतात. या वृक्षांनी परिसर केवळ हिरवागारच नाही, तर शुद्ध आणि प्रसन्नही केला आहे.

आणि त्यांच्या देखभालीचं संपूर्ण दायित्व गावातील ज्येष्ठांनी स्वीकारलं. सूर्योदयाच्या वेळेस काही, तर सूर्यास्ताच्या वेळेस काही ज्येष्ठ नागरिक झाडांना पाणी घालतात. ही एक प्रकारे त्यांची नित्य साधना आहे. व्यायामाचं निमित्त आणि समाजासाठी काहीतरी देण्याची भावना, या दोन्ही गोष्टी या कार्यातून साध्य होत आहेत. त्यांच्या या निःस्वार्थ सेवेमुळे रोपटी आज फुलू लागली आहेत. त्यांचंही जीवन, आणि या झाडांचंही फुलणं सुरू आहे. या कार्यात सेवानिवृत्त अधिकारी सुरेश जाडकर, सेवानिवृत्त कृषी अधिकारी नागनाथ काळे, रमेश बेंबळकर, सतीश गांधी, विश्वनाथ बेलगुंपे, नागनाथ ओहोळ, शिवाजी जाडकर, हनुमंत चोपडे, सुधाकर रेपाळ, रघुनाथ वास्ते, हनुमंत बुद्धिबळ, मोहन शिंदे या ज्येष्ठांसह शिक्षक संजय ढगे, रविंद्र देबडवार, रमेश खांडके, पर्यावरणप्रेमी संतोष सुर्वे, आनंद माळी, शांताराम गिड्डे, माणिक काळे, विठ्ठल कदम, नाना चवरे, दादा ओहोळ,विलास कांबळे यांचा मोलाचा वाटा आहे.

**झाडांना पाणी देण्यासाठी शक्कल**

छोट्या बाटल्या आणि ड्रम घेऊन पाणी घालण्यासाठी अनेकदा फेऱ्या माराव्या लागत. त्यापेक्षा त्यांनी स्थानिक शक्कल लढवून टाकाऊ बाटल्यांपासून ड्रिपचा पाईप जोडून तयार केलेला साधा पण अफलातून केलेला जुगाड खरोखरच कौतुकास्पद आहे.

घरात नातवंडं हसतात, इथे झाडं फुलतात. शुद्ध हवा आणि सावली मिळावी म्हणून ही धडपड आहे. झाडांना पाणी घालताना आमचाही वेळ चांगला जातो आणि आरोग्याचाही फायदा होतो. शरीराला व्यायाम आणि मनालाही समाधान मिळतं

**- सुरेश जाडकर, सेवानिवृत्त अधिकारी**

ज्येष्ठांची वृक्षप्रेमी धडपड वाखाणण्यासारखी आहे. पाणीपुरवठ्यासाठी त्यांनी छोट्या बाटल्या, ड्रम आणि पाईपच्या साहाय्याने सुंदर जुगाड केला आहे. त्यांच्या या पर्यावरणस्नेहाला आमचा सलाम

**-सुनिल मत्रे, स्टेशन प्रबंधक, मोडनिंब**

## शिष्यवृत्ती परीक्षेत अणदूरच्या शाळेचा डंका

### तब्बल १५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर,दि.२७ एप्रिल-**

गेल्या सहा वर्षापासून जिल्ह्यात अव्वल असलेल्या वत्सलानगर जिल्हा परिषद शाळेने यंदाही मानाचा तुरा रोवला आहे. यंदा तब्बल १५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत गरुड झेप घेतल्याने पालकासह ग्रामस्थातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



या परीक्षेत सृष्टी कांबळे, आदित्य गाढवे, राम कदम, कृष्णाई झंगे, समृद्धी कांबळे, समर्थ निर्मळे, अपेक्षा कबाडे, रुद्रा गिरी, उज्वल पवार, अमित सुरवसे, समृद्धी बनसोडे, समर्थ गोवे, निकत नदाफ, कार्तिक मुळे, पारस पवार हे १५ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा दराडे, बळीराम पांचाळ, भीमराव घोडके, एम बी स्वामी, व्ही व्ही आदम, व्ही आर खलटे, एस डी भागवत, डी जी आदरवाडा, एस डी गिरी या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. नवोदय विद्यालयात प्रवेश मिळणे सहजासहजी अशक्य असून मेहनत तयारी व मार्गदर्शन यांचे खऱ्या अर्थाने फलित असल्याची भावना मुख्याध्यापिका सुरेखा दराडे यांनी व्यक्त केली.या यशाबद्दल सरपंच रामचंद्र दादा आलूरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, डॉ.जितेंद्र कानडे,डॉ. विवेक बिराजदार, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस ॲड.दीपक आलुरे, तंटामुक्त समितीचे उपाध्यक्ष कल्याणी मुळे, अविनाश मोकाशे, प्रबुद्ध कांबळे जय मल्हार पत्रकार संघाचे श्रीकांत अणदूरकर,दयानंद काळुंखे, चंद्रकांत गुड्डू, शिवशंकर तिरगुळे, सचिन तोगी, शिवाजी कांबळे, चंद्रकांत हगलगुंडे यांनी अभिनंदन केले.

## विद्युत तारेच्या धक्क्याने वृद्धाचा मृत्यू; शेजाऱ्यावर गुन्हा

**बार्शी, दि.२७ एप्रिल-**

तालुक्यातील धामणगाव (आ) येथे शेतात लावलेल्या अनधिकृत विद्युत तारेचा धक्का लागून ६५ वर्षीय रघुनाथ निवृत्ती ढोणे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी त्यांच्या पत्नी शोभा ढोणे यांनी शेजारी राहणाऱ्या बाबाराव निवृत्ती ढोणे यांच्यावर बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी शोभा ढोणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास रघुनाथ ढोणे शेतात असताना विद्युत प्रवाह असलेल्या तारेचा स्पर्श होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. संबंधित विद्युत तारा शेजारील बाबाराव ढोणे यांनी शेतात रानटी डुकर आणि वन्य प्राण्यांपासून पीक वाचवण्यासाठी बसवले होते. हे करताना त्यांनी कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नव्हती, तसेच मनुष्यहानी होण्याची शक्यता माहित असूनही हा प्रकार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत बार्शी तालुका पोलिस ठाण्यात मृत्यूस कारणीभूत झाल्याचा गुन्हा नोंद झाला आहे.

## उपळाई (ठो) येथे चावडी वाचन संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ एप्रिल-**

निपुण महाराष्ट्र अंतर्गत दि.२५ एप्रिल रोजी सकाळी ग्रामपंचायत उपळाई (ठो) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ च्यावतीने चावडी वाचन संपन्न झाले. या उपक्रमांतर्गत १०० दिवसांत विद्यार्थ्यांना वाचन लेखनसह संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार ही कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक असल्याने १०० टक्के विद्यार्थ्यांना ७५ टक्के क्षमता प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यावेळी मुख्याध्यापक अनिल काळे माजी सरपंच विजय ठोंगे, ग्रामपंचायत सदस्य जयवंत कदम, संजय भोसले, अंकुश नलवडे, नाबार्डचे आंबरुषी लोकरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता भोंग, उपाध्यक्ष योगिता सदावर्ते, ग्रामसेवक दराडे, तलाठी सुनील सुतार, शाळेतील शिक्षक हरिभाऊ दळवी, सविता जाधव, सुवर्णगौरी गवळी, दिपाली गोरे उपस्थित होते. या



उपक्रमाला सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक श्री.काळे यांनी प्रास्ताविक केले. ग्राम पंचायत सदस्य श्री. कदम यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करुन जी मुले अभ्यासात मागे आहेत ती या उपक्रमातून निश्चित ध्येयापर्यंत जातील, असा विश्वास व्यक्त केला. ग्रामसेवक दराडे यांनी शाळेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबवून शाळा लाईट बिल मुक्त करणार असल्याचे सांगितले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन घेण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पाढे, व्यवहारातील तोंडी उदाहरणे विचारली, अतिशय समर्पक शब्दात मुलांनी उत्तरे दिली. ते ऐकून सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

## बार्शीत नवविवाहितेच्या बॅगची चोरी; पाच तोळयांचे दागिने लंपास

### बसस्थानकावर लुटण्याचा प्रकार थांबेना, सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ एप्रिल-**

बार्शी बसस्थानकावर वारंवार होणाऱ्या चोऱ्या लुट थांबवण्यात पोलीस प्रशासनाला यश येत नसून सध्या बार्शी बसस्थानक चोरट्यांसाठी सॉफ्ट टार्गेट ठरत आहे. दि. २६ एप्रिल रोजी उरळीकांचन येथील नवविवाहीता बहिणीच्या लग्नासाठी गावी निघाली होती. बार्शी बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत श्रद्धा रविंद्र सरक (वय २०) यांच्या मौल्यवान दागिन्यांची बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केली. चोरी झालेल्या दागिन्यांची एकूण किंमत अंदाजे ३ लाख ५६ हजार २०० रुपये इतकी आहे.

श्रद्धा सरक यांचा नुकताच दि. ७ फेब्रुवारी रोजी विवाह झाला असून त्या गावाकडे आपल्या बहिणीच्या लग्नासाठी निघाल्या होत्या. विवाहप्रसंगी मिळालेल्या आणि गावाकडे वापरासाठी नेलेले मौल्यवान सोन्याचे दागिने त्यांनी आपल्या बॅगेत ठेवले होते. २६ एप्रिल रोजी श्रद्धा सरक आपल्या आजी आणि आजोबांसह धाराशीव येथे जात होत्या. पुण्याहून प्रवास करुन दुपारी ३ वाजता ते बार्शी बसस्थानकात पोहोचले. त्यानंतर धाराशीवसाठी दुसऱ्या बसची वाट पाहताना दुपारी ३:२० वा. आपल्याजवळील बॅगेसह बसमध्ये चढल्या व बॅग सीटच्या वरच्या रॅकमध्ये ठेवली. बसमध्ये गर्दी असल्याने आपल्या वयोवृद्ध आजी आजोबांना सीटवर बसवण्यासाठी त्या खाली उतरल्या असता काही क्षणातच बॅग गायब झाल्याचे लक्षात आले. त्यांनी बसमध्ये आणि बसस्थानकावर सर्वत्र शोधाशोध केली मात्र बॅग कुठेही आढळून आली नाही. यानंतर श्रद्धा यांनी बार्शी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात तक्रार दाखल केली. चोरीस गेलेल्या बॅगेत साडेतीन तोळ्याचे सोन्याचे गंठण, एक तोळ्याचे मिनी गंठण, ५ ग्रॅमचे कानातील झुमके व चांदीचे जोडवे होते. बॅग व दागिन्यांची एकूण अंदाजित किंमत ३ लाख ५६ हजार २०० रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेनंतर पोलिसांनी बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणे सुरू केले आहे. गर्दीच्या वेळी सुरक्षेची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. प्रवाशांनी बसस्थानकावर अधिक सुरक्षा यंत्रणा वाढवण्याची आणि गस्त वाढवण्याची मागणी केली आहे.

## अक्कलकोटमध्ये 'हम गया नही जिंदा है' योजनेचे लोकार्पण

### समर्थ नगरी प्रतिष्ठान चा उपक्रम

### मयत व्यक्तीच्या कुटुंबास मदत व आधार देणार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि.२७ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीचे औचित्य साधून येथील समर्थ नगरी प्रतिष्ठानच्या वतीने मयत व्यक्तीच्या गरजवंत कुटुंबास अंत्यसंस्कारासाठी मदत तथा आधार देण्याच्या संकल्पनेतून 'हम गया नही जिंदा है' ही योजना स्वामीचरणी अर्पण करून त्याचे लोकार्पण करण्यात आले. अक्कलकोटसह राज्यभरामध्ये श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे व श्री स्वामीभक्त चोळपा महाराज यांचे वंशज अण्णू




महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामीनाम प्रसाराची सेवा या संस्थेच्या मार्फत केली जाते. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी दिनानिमित्त मयत झालेल्या व्यक्तीच्या गरजवंत कुटुंबास आधार तथा मयताच्या अंत्यसंस्कारासाठी मदत देण्याच्या संकल्पनेतून अक्कलकोटसह राज्यभरामध्ये ही योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या योजनेचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी श्री स्वामीभक्त चोळाप्पा महाराजांचे वंशज वे. शा. सं. अण्णू महाराज व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प्रथमेश इंगळे ,पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, मुख्याधिकारी रमाकांत डाके, प्रतिष्ठित व्यापारी बसवराज माशाळे, जेष्ठ बाबासाहेब निंबाळकर आदिची उपस्थीती होती. या योजनेअंतर्गत मयत झालेल्या व्यक्तीच्या गरजवंत कुटुंबास पाच हजार रुपये अंत्यसंस्कारसेवा तथा आधारनिधी म्हणून घेण्याचे नियोजन केले असल्याचे अण्णू महाराज यानी सांगीतले. याप्रसंगी सिद्राम वाघमोडे, भीमराव धडके , चंद्रप्रकाश उदगिरी , नंदकुमार जगदाळे , सुभाष तारापुरे , कुमार पतंगे , शेखर आडवीतोटे , श्रीकांत झिपरे ,संजय पडनुरे , सुनिल होटकर , सुखदा ग्रामोपाध्ये , अश्विनी शिंपी , कावेरी धरणे , सुवर्ण इंगळे , कोकण विभागातील पत्रकार बांधव , स्वामीभक्त उपस्थित होते .

वास्तविक गरजवंतापर्यंत पोहोचणारी योजना आहे. समर्थ नगरी परिवाराच्या माध्यमातून हम गया नही जिंदा है ही योजना योग्य गरजवंत सर्वसामान्याना आधार देणारी योजना ठरेल.

**- राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक, उत्तर पोलीस ठाणे, अक्कलकोट.**

या योजनेमध्ये नियमावली व काही अटी लागू केल्या आहेत यामुळे ही योजना गरजवंताना लाभदायी व दानशूरांना वरदायी ठरणारी आहे . पुढील काळात राज्यभरामध्ये ही योजना जाईल. श्री स्वामी समर्थ नामप्रसारसेवेसह स्वामींच्या वचनांना सोबत घेऊन जाणारी ही संस्था ठरत आहे.

**- प्रथमेश इंगळे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट**